# केर्ली तर्फवाडी रत्नागिरी जोतिबा रस्ता भूसंपादन प्रकल्पाचा सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल: २०२१

ज्ञानदेव तळुले
महादेव देशमुख
सुभाष कोंबडे

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
ज्ञानमेवामृतम्
Estd.: 1962

**अर्थशास्त्र अधिविभाग**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६००४

(NAAC A++ Grade with CGPA 3.52)

**जुलै २०२१**

## Study Team


| | |
|---|---|
| Dnyandev Talule (SIA Coordinator) | Principal Author and Report Editing |
| Mahadev Deshmukh | FGDs and Field Visits |
| Subhash Kombade | Field/Primary Data Coordination |
| Vijay Kakade | Field Visits |
| Vitthal Thabbe | Field Investigation and Project Office |
| Tanuja Naik | Data Entry and Tabulation |
| Vilas Mankar (GIPE, Pune) | Report Setup and Printing |



**Disclaimer:**

*The entire information and data base that the present report carries are strictly based on the field investigation, FGDs and the field observations of the study team. Neither the information in any form in the present report carries any personal impression nor does it carry any biased mention by any of the member of the study team.*

*University or University Staff shall not be responsible to mishap or damage caused to manpower or property while further applying the results of the consultancy project.*

# केर्ली तर्फवाडी रत्नागिरी जोतिबा रस्ता भूसंपादन प्रकल्पाचा सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल: २०२१

ज्ञानदेव तळुले
महादेव देशमुख
सुभाष कोंबडे

अर्थशास्त्र अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६००४
(NAAC A++ Grade with CGPA 3.52)

जुलै २०२१

# अनुक्रमणिका


| |
|---|
| कार्यकारी सारांश (Executive Summary): |
| प्राक्कथन |
| सापनि अभ्यास पद्धतीतील टप्पे |
| औपचारिक वास्तव |
| परिणामे |
| सारांशात |
| प्रकरण:१: प्रास्ताविक |
| प्रास्ताविक |
| प्रकरण:२: माहिती संकलन व अभ्यास कार्यपद्धती |
| प्रास्ताविक |
| २.१: अभ्यासाची उद्दिष्टे |
| २.२: अभ्यास पद्धती |
| २.३: अभ्यासाची पूर्वपिठीका |
| २.४: सामाजिक परिणाम अहवाल साधने आणि पद्धती |
| २.४.१: सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रिया |
| २.५: सापनि अभ्यास पद्धतीतील टप्पे |
| २.६: प्रकल्प प्रभाव क्षेत्राची पार्श्वभूमी |
| २.६.१: बहुविध स्त्रोत माहिती संकलन |
| २.६.२: प्रकल्पबाधीत, प्रतिगामी-अवगामी भागधारक आणि नियंत्रण समूह |
| २.६.३: विशेष समूह चर्चा (Focused Group Discussions) |
| प्रकरण: ३: रस्ते, महामार्ग, पायाभूत सुविधा व भूसंपादन विषयक विवेचन |
| ३.१: महामार्ग प्रकल्प कामी प्रसंगी अतिरिक्त जमीन अधिग्रहण |
| ३.२: सरकारकरीता धडा |
| ३.३: न्याय्य विस्थापन आणि पुनर्वसनाच्या दिशेने |

| |
|---|
| प्रकरण:४: पन्हाळा तालुक्यातील केर्ली वाडी रत्नागिरी जोतिबा गिरोली रस्ता बांधकाम प्रकल्पग्रस्तांचा प्राथमिक अभ्यास व स्थलवास्तवाचे आकलन |
| पार्श्वभूमी |
| सारणी ४.१: प्रकल्पबाधितांचे गावातील वास्तव्यासंबंधीचे विवरण |
| आलेख 1: प्रकल्पबाधितांचे गावातील वास्तव्या संम्बधीचे विवेचन |
| सारणी ४.२: प्रकल्पबाधितांचे रेशनकार्ड धारण व प्रकारविषयक विवेचन |
| आलेख 2: प्रकल्पबाधिताकडील दारिद्र्य कार्ड धारणाचे विवेचन |
| सारणी ४.३ : मनेरगा अंतर्गत प्रकल्पबाधितांची मजूर म्हणून नोंदणीचे विवेचन |
| आलेख 3: मनरेगा अंतग्रत प्रकल्पबाधितांची मजूर म्हणून नोंदणी |
| सारणी ४.४ : प्रकल्पबाधितांचे रेशनकार्ड धारणाचे प्रकाराचे विवेचन |
| आलेख 4: प्रकल्पबाधितांचा रेशन कार्ड धरणाचा प्रकार |
| सारणी ४.५ : प्रकल्पबाधित कुटुंबाचा प्रकार |
| आलेख 5: प्रकल्पबाधितांच्या कुटुंब प्रकारचे विवरण |
| सारणी ४.६ : एकसदस्यीय महिला कुटुंब विषयक विवरण |
| आलेख 6: एकसदस्यीय महिला कुटुंब विषयक विवरण |
| सारणी ४.७ : प्रकल्पबाधित कुटुंबातील अपंक व्यक्तीविषयी विवेचन |
| आलेख 7: प्रकल्पबाधित कुटुंबातील अपंग व्यक्तीविषयक विवेचन |
| सारणी ४.८ : प्रकल्पधारकाचे नोकरी प्रतिक्षा विषयक विवरण |
| आलेख 8: प्रकल्पबाधीत कुटुंब सदस्यांची नोकरीसाठीची प्रतीक्षा |
| सारणी ४.९ : प्रकल्पबाधित कुटुंबाचे व्यवसाय विषयक विवरण |
| आलेख 9: प्रमुख व्यवसायानुसार प्रकल्पबाधीत कुटुंबाचे विवेचन |
| सारणी ४.१० : प्रकल्पबाधितांचे जमिन मालकी विषयक विवेचन |
| आलेख 10: जमीन मालाकीविषयक प्रकल्पबाधित कुटुंबाचे विवेचन |
| सारणी ४.११ : प्रकल्पबाधितांचे जमिन विक्री विषयक माहिती |
| आलेख 11: प्रकल्पबाधिताच्या जमीनविक्रीचे विवेचन |
| सारणी ४.१२ : प्रकल्पबाधितांचे सिंचन विषयक विवरण |

आलेख 12: प्रकल्पबाधिताकडील सिंचनकामी पाण्याची उपलब्धता
सारणी ४.१३ : प्रकल्पबाधितांचे रहिवास विषयक विवरण
आलेख 13: प्रकल्पबाधिताच्या राहत्या घराच्या मालकीविषयक विवेचन
सारणी ४.१४ : प्रकल्पबाधित कुटुंबाच्या घर प्रकाराचे विवरण
आलेख 14: प्रकल्पबाधितांच्या घराच्या स्वरूपासंम्बनधीचे विवेचन
सारणी ४.१५ : प्रकल्पबाधितांच्या मालकी घर आकारमानाचे विवरण
सारणी ४.१६ : प्रकल्पबाधितांच्या घराचे स्वरूपविषयक विवरण
आलेख 15: प्रकल्पबाधित कुटुंबाच्या राहत्या घराचे स्वरूप
सारणी ४.१७ : प्रकल्पबाधित कुटुंबाच्या राहत्या घराचे स्वरूपविषयक विवरण
आलेख 16: प्रकल्पबाधित कुटुंबाच्या राहत्या घराचे स्वरूप
सारणी ४.१८ : प्रकल्पबाधितांचे राहत्या घराचे स्वरूपविषयक विवरण
आलेख 16(अ): प्रकल्पबाधित कुटुंबाच्या राहत्या घराचे स्वरूप
सारणी ४.१९: प्रकल्पबाधितांचे राहत्या घराचे स्वरूपविषयक विवरण
सारणी ४.२०: प्रकल्पबाधितांचे राहत्या घराचे स्वरूपविषयक विवरण
आलेख 16 (ब): प्रकल्पबाधित कुटुंबाच्या राहत्या घराचे स्वरूप
सारणी ४.२१ : प्रकल्पबाधितांचे राहत्या घराचे स्वरूपविषयक विवरण
सारणी ४.२२ : प्रकल्पबाधितांचे राहत्या घराचे स्वरूपविषयक विवरण
सारणी ४.२३ : प्रकल्पबाधित कुटुंबाचे राहत्या घराचे स्वरूप
सारणी ४.२४ : प्रकल्पबाधित कुटुंबाकडील जीवनावश्यक वस्तूंचे विवरण
आलेख 17: प्रकल्पबाधीत कुटुंबाकडील जीवनावश्यक वस्तूविषयीचे विवरण
सारणी ४.२४ (अ): प्रकल्पबाधितांकडील शुद्ध पाण्याचे विवरण
सारणी ४.२५: प्रकल्पबाधितांचे जमिन विक्री विषयक विवरण
आलेख 18: प्रकल्पबाधितांचे कर्ज विषयक विवेचन
सारणी ४.२७: प्रकल्पबाधितांच्या आजारपण विषयक विवरण

आलेख 19: प्रकल्पबाधीत कुटुंबातील कायमस्वरूपी आजारी असणाऱ्या व्यक्तीविषयीचे
सारणी ४.२८: प्रकल्पबाधितांचे रोजगार विषयक विवरण
आलेख 20: प्रकल्पबाधीत कुटुंबातील मजुरीस जाणाऱ्या व्यक्तिविषयक माहिती
सारणी ४.२९: प्रकल्पबाधितांतवरील जमिन देण्याविषयीच्या सक्ती/दबावाविषयी विवरण
आलेख 21: प्रकल्पबाधितावरील जमीन देण्याविषयीच्या सक्ती/ दबावाविषयक विवरण
सारणी ४.३०: प्रकल्पबाधितांना मिळणाऱ्या समाधानकारक मोबदल्याविषयीचे विवरण
आलेख 22: प्रकल्पबधीताना मिळालेल्या समाधानकारक मोबदल्या विषयीचे विवरण
सारणी ४.३१: प्रकल्पबाधितांच्या फायदा विषयक विवरण
सारणी ४.३१ (अ): प्रकल्पबाधितांचे मोबदलादरात जमिन धारणेचे विवरण
आलेख 23: प्रकल्पाकडून मिळालेल्या पैशातून तेवढीच जमीन किंवा त्याहून अधिक जमीन विकत घेणे शक्य होईल का याविषयीचे प्रकल्पबाधीताचे मत
सारणी ४.३२: प्रकल्पाच्या कामकाजाबाबतचे विवरण
आलेख 24: प्रकल्पाच्या कामकाजाबाबत प्रकल्पबाधीत समाधानी आहेत का याविषयीचे मत
सारणी ४.३३: प्रकल्पबाधितांचे रस्तेकाम त्रुटी विषयक विवरण
आलेख 25: प्रकल्पबाधितांचे रस्त्याच्या कामातील त्रुटी संबंधीचे मत
सारणी ४.३४: प्रकल्पबाधितांचे रस्त्याच्या कामातील त्रुटीमुळे झालेल्या नुकसानी विषयक विवरण
आलेख 26: रस्त्याच्या कामातील त्रुटीमुळे प्रक्ल्पबाधीताचे झालेल्या नुकसाना समधीचे विवेचन
सारणी ४.३५: प्रकल्पबाधितांचे कौटुंबिक विश्लेषण
आलेख 27: प्रकल्पबाधित कुटुंबातील सदस्यांची संख्या
सारणी ४.३६: प्रकल्पबाधितांचे बेरोजगारी विषयक विवरण

आलेख 28: प्रकल्पबाधित कुटुंबातील बेरोजगार सदस्यांचे विवरण (%)
सारणी ४.३६ (अ): प्रकल्पबाधित जमिनीव्यतिरिक्त बाधित मालमत्तेचे विवरण
आलेख 29: प्रकल्पबाधित कुटुंबाचे जमिनीव्यतिरिक्त बाधीत मालमत्तेचे विवरण
सारणी ४.३७: प्रकल्पबाधित कुटुंबाचा सामाजिक व संस्थात्मक सहभाग विषयक विवरण
आलेख 30: प्रकल्पबाधीत कुटुंबाचा सामाजिक व संस्थात्मक सहभाग
सारणी ४.३८: प्रकल्पबाधित कुटुंबाचे पिकासंबंधीचे विवरण
आलेख 31: प्रकल्पबाधित कुटुंबाचे पिकासंबंधीचे विवरण
सारणी ४.३९: प्रकल्पबाधित कुटुंबाचे शेतीच्या अवजार वापरासंबंधीचे विवरण
सारणी ४.४०: प्रकल्पबाधितांकडून शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या आदने विषयक विवरण
आलेख 33: प्रकल्पबाधित कुटुंबाचे उत्पादन वाढीसाठीचे प्रयत्न
सारणी ४.४१: प्रकल्पबाधितांकडील पाण्याच्या स्त्रोतासंबंधीचे विवरण
आलेख 34: प्रक्ल्प्बाधीताकडील पाण्याच्या स्तोत्रासंबंधीचे विवरण
आलेख 35: प्रकल्पबाधिताचे पिकासंबंधीचे विवेचन
सारणी ४.४२: प्रकल्पबाधित कुटुंबाकडील उपभोग्य वस्तू व कृषी भांडवली वस्तू मालकीचे विवरण
आलेख 36: प्रकल्पबाधीत कुटुंबाकडील मालकीच्या वस्तू व साधनाचा तपशील
सारणी ४.४३: प्रकल्पबाधित कुटुंबाचे पशुधन मालकीचे प्रकारानुसार विवरण
आलेख 37: प्रकल्पबाधीत कुटुंबाचे पशुधन मालकीचे प्रकारानुसार विवरण
सारणी ४.४४: प्रकल्पबाधित कुटुंबाचे पशुधनापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे विवरण
सारणी ४.४५ : प्रकल्पबाधितांचे कर्ज विषयक विवरण
आलेख 38: प्रकल्पबाधित कुटुंबाचे कर्जासंबंधीचे विवरण
सारणी ४.४६ : प्रकल्पबाधितांच्या कुटुंबातील आजारांचे विवरण
आलेख 39: प्रकल्पबाधित कुटुंबातील व्यक्तीना असलेल्या आजार संबंधीचे विवरण
सारणी ४.४७: प्रकल्पबाधितांना इतर मार्गापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे विवरण
आलेख 40: प्रकल्पबाधित कुटुंबाना इतर मार्गपासून मिळणारे उत्पन
सारणी ४.४८ : प्रकल्पबाधितांचे पिक विवरण

आलेख 41: प्रकल्पबाधित कुटुंबाचा पिक उत्पनाचा तपशील
सारणी ४.४९ : प्रकल्पबाधितांचे शासनाकडे मागणी विषयक विवरण
आलेख 42: प्रकल्पबाधितांच्या शासनाकडील प्रमुख मागण्या
सारणी ४.५०: प्रकल्पबाधितांना प्रकल्पामुळे होणाऱ्या फायद्यासंबंधीचे विवरण
आलेख 43: प्रकल्प बाधितांचे प्रकल्पामुळे फायद्यासंबंधीचे मत
सारणी ४.५१: प्रकल्पबाधितांकडे प्रकल्पबाधन क्षेत्राच्या पश्चात राहिलेल्या जमिनीचे विवरण
आलेख 45: प्रकल्प बाधीत जमीन जावून शिल्लक राहिलेली जमीन (एकर %)
आलेख 46: प्रकल्प बाधीत जमीन जावून शिल्लक राहिलेली जमीन ( जमीन एकर)
सारणी ४.५२: प्रकल्पबाधित जमिन विषयक विवरण
आलेख 47: प्रकल्पबाधीत जमीन ( जमीन एकर)
सारणी ४.५३: रस्त्याच्या मध्यापासून ३० मिटरप्रमाणे बाधित झालेली जमिन (एकर)
आलेख 48: रस्याच्या मध्यापासून ३० मिटर प्रमाणे बाधीत झालेली जमीन (एकर)
तक्ता ४.५४: प्रकल्पबाधितांनी विकलेल्या जमिनीसंबंधीचे विवरण (एकर)
सारणी ४.५५ : प्रकल्पबाधितांनी विकलेल्या जमिनीपैकी ३० मिटर कक्षेत येणारी जमिन (एकर)
सारणी ४.५६: प्रकल्पबाधित कुटुंबातील सदस्यांचे विवरण
आलेख 49: प्रकल्प बाधीत कुटुंबातील सदस्यांचे विवरण
सारणी ४.५७ : प्रकल्पबाधितांचे वयोगामानुसार कुटुंब सदस्यांचे विवरण
आलेख 50: प्रकल्पबाधितांचे वयोमानानुसार कुटुंब सदस्यांचे विवरण
सारणी ४.५८: प्रकल्पबाधितांच्या जमिनधारणेविषयीचे विवरण
सारणी ४.५९: प्रकल्पबाधितांकडील जमिनीचा एकरी दर
आलेख 51: प्रकल्पबाधित क्षेत्रातील शेतजमिनीची सरासरी बाजार किंमत
सारणी ४.६०: प्रकल्पबाधितांचे रस्त्याच्या कामातील त्रुटीसंबंधीचे विवरण
आलेख 52: प्रकल्पबाधितांचे रस्त्याच्या कामातील त्रुटी संबंधीचे मत
सारणी ४.६१: प्रकल्पबाधितांना प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर झालेल्या नुकसानीसंबंधीचे विवरण
आलेख 53: प्रकल्प बधीताना झालेल्या नुकसाना संबधीचे विवरण

| |
|---|
| प्रकरण: ५: निष्कर्ष,शिफारशी व उपशमन योजना |
| सापनि अभ्यास अहवाला उद्दिष्टनिहाय उपशमन योजना |
| संदर्भसूची |
| परिशिष्ट |
| प्रकल्पबाधित कुटुंब प्रश्नावली |

# कार्यकारी सारांश (Executive Summary):

## I) प्राक्कथन:

कोल्हापूर जिल्ह्याच्या पन्हाळा तालुकयातील जोतिबा डोंगरापासून केर्ली वाडी रत्नागिरी येथून सुरू होणारा सुधारित विकास आराखड्याप्रमाणे बाह्य वळण रस्ता बांधणे प्रस्तावित होते. त्याकामी एकूण २९ खाजगी व संस्थात्मक तथा सरकारी जमिनमालकांची जमिन अधिग्रहण करणे आवश्यक आहे. अर्थात रस्त्याचे काम पूर्ण झाले असल्याने प्रस्तुत प्रकल्पाचे जमिन अधिग्रहणही पूर्ण झाले आहे. कारण प्रस्तुत रस्त्याकरीता प्रकल्पबाधितांनी जमिन बिनशर्त देवू केल्याने अधिग्रहणाचे काम पूर्ण होवून प्रस्तुत रस्ता प्रकल्पही पूर्णपणे पूर्णत्वास गेला आहे. परंतु प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन मोबदले आदा करणे बाकी असल्याने तांत्रिकदृष्ट्या प्रस्तुत प्रकल्प अपूर्ण मानावा लागेल. सापनि अहवालाचे प्रस्तुत प्रकरण संबंधित प्रकल्पबाधितांच्या प्राथमिक माहितीवर बेतले असून या प्रकरणात प्रकल्पबाधितांशी संबंधित सर्व माहिती क्षेत्रभेटीवर आधारित आहे. या सर्व प्रकल्पबाधितांनी सार्वजनिक बांधकाम विभागास सहकार्य केल्याने आपल्या जमिनीची अधिग्रहण प्रक्रिया पूर्ण होवून दिली असून देय असलेली रक्कम आदा करावी अशी विनंती ते करत आहेत. प्रस्तुत प्रकल्पाचे काम २०१८ पासून प्रस्तावित असल्याने व ते पूर्णत्वासही गेले असल्याने प्रकल्पबाधितांना आपल्या प्रकल्पबाधित जमिनीवर स्वत:च्या मालकीचा व्यवसाय करणे अथवा जमिन व्यापारीदृष्ट्या विकसित करणे शक्य नाही. त्यामुळे हे सर्व प्रकल्पबाधित जमिनमालक कोल्हापूर सार्वजनिक बांधकाम विभागाने आपले जमिन शुल्क आदा करावे अशी विनंती करत आहेत.

**याच प्रमुख समस्येचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत प्रकल्पाचा सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास हाती घेतला असून प्रस्तुत अभ्यास मुख्यत्वे खाली नमूद केलेल्या उद्दिष्टपूर्तींवर निर्भर आहे.**

कोल्हापूर जिल्ह्याच्या पन्हाळा तालुकयातील जोतिबा डोंगरापासून केर्ली वाडी रत्नागिरी येथून सुरू होणारा सुधारित विकास आराखड्याप्रमाणे बाह्य वळण रस्ता बांधणे प्रस्तावित होते. त्याकामी एकूण २९ खाजगी व संस्थात्मक तथा सरकारी जमिनमालकांची जमिन अधिग्रहण करणे आवश्यक आहे. अर्थात रस्त्याचे काम पूर्ण झाले असल्याने प्रस्तुत प्रकल्पाचे जमिन अधिग्रहणही पूर्ण झाले आहे. कारण प्रस्तुत रस्त्याकरीता प्रकल्पबाधितांनी जमिन बिनशर्त देवू केल्याने अधिग्रहणाचे काम पूर्ण होवून प्रस्तुत रस्ता प्रकल्पही पूर्णपणे पूर्णत्वास गेला आहे. परंतु प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन मोबदले आदा करणे बाकी असल्याने तांत्रिकदृष्ट्या प्रस्तुत प्रकल्प अपूर्ण मानावा लागेल. सापनि अहवालाचे प्रस्तुत प्रकरण संबंधित प्रकल्पबाधितांच्या प्राथमिक माहितीवर बेतले असून या प्रकरणात प्रकल्पबाधितांशी संबंधित सर्व माहिती क्षेत्रभेटीवर आधारित आहे. या सर्व प्रकल्पबाधितांनी सार्वजनिक बांधकाम विभागास सहकार्य केल्याने आपल्या जमिनीची अधिग्रहण प्रक्रिया पूर्ण होवून दिली असून देय असलेली रक्कम आदा करावी अशी विनंती ते करत आहेत. प्रस्तुत प्रकल्पाचे काम २०१८ पासून प्रस्तावित असल्याने व ते पूर्णत्वासही गेले असल्याने प्रकल्पबाधितांना आपल्या प्रकल्पबाधित जमिनीवर स्वत:च्या मालकीचा व्यवसाय करणे अथवा जमिन व्यापारीदृष्ट्या विकसित करणे शक्य नाही. त्यामुळे हे सर्व प्रकल्पबाधित जमिनमालक कोल्हापूर सार्वजनिक बांधकाम विभागाने आपले जमिन शुल्क आदा करावे अशी विनंती करत आहेत.

### प्रस्तुत अभ्यास मुख्यत्वे खाली नमूद केलेल्या उद्दिष्टपूर्तींवर निर्भर आहे.

- प्रकल्पाचा सामाजिक व आर्थिक परिणाम अभ्यासणे.
- प्रकल्पबाधीत व लाभधारकांवरील संभाव्य आर्थिक व सामाजिक परिणामांची चिकित्सा करणे.
- प्रकल्पबाधीत व लाभधारकांवरील संभाव्य संधी व व्यय तसेच त्याग इत्यादी घटकांची चिकित्सा करणे.

- डिसेंबर २०१३ च्या भूमी अधिग्रहण, पुनर्वसन आणि पुनर्निवास कायद्यातंर्गत अपेक्षित प्रकल्पबाधीतांच्या अधिग्रहित जमिनींच्या मोबदल्याविषयीची चिकित्सा करणे.
- प्रकल्पबाधीत जमिनीच्या बदल्यात जमीन देवू करणे शक्य आहे काय याविषयीची पडताळणी करणे व तसे शक्य नसल्यास योग्य तो मोबदला कसा देता येईल याचा विचार करणे.
- प्रकल्पबाधीतांवरील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक परिणाम अभ्यासणे.
- भूमी अधिग्रहण व जमीन मोबदल्याविषयीचा आढावा घेणे.

वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांद्वारे माहितीचे संकलन, पृथक्करण व विश्लेषण करून प्रस्तुत सापनि अहवाल तयार करण्यात आला आहे. केर्ली तर्फवाडी रत्नागिरी जोतिबा हद्दीतील प्रकल्प प्रभावित कुटुंबाचा योग्य रचना केलेल्या मुलाखत अनुसूचीद्वारे अभ्यास केला आहे. प्रकल्पबाधीत जमीन किंवा इतर हानी झाल्यास प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे प्रकल्पबाधीत झालेल्या कुटुंबावर त्याचा परिणाम शोधण्यासाठी संबंधित कुटुंबाचे प्रश्नावली व स्थळभेट आणि चर्चेद्वारा सर्वेक्षण करण्यात आले.

प्रस्तुत अभ्यासाकरीता प्रकल्पबाधीत कुटुंबाची भूमी अभिलेख व क्षेत्रीय तपासणीवर आधारित अचूकपणे सत्याधारित प्राथमिक माहिती संकलित केली. प्रकल्पबाधीत क्षेत्रातील कुटुंबांचा सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिक संदर्भ ओळखण्यासाठी अभ्यासगटाने प्रत्यक्ष क्षेत्रभेटीवर आधारित खुल्या वातावरणात समूह चर्चा घडवून आणल्या. क्षेत्रभेटीद्वारा संकलित माहितीवर आणि प्रकल्पग्रस्तांबरोबर अधिकची सल्लामसलत करून प्रकल्पाच्या सकारात्मक व नकारात्मक सामाजिक व आर्थिक परिणामांची व्याप्ती आणि तीव्रतेचे मूल्यांकन केले. अधिग्रहित जमिनीच्या

मोबदल्याविषयी वास्तव आकलन व जाणकारी करून घेतली. तसेच सामाजिक प्रभाव व्यवस्थापन योजनेत समाविष्ट करण्यासाठी उपाय सुचविण्याचा प्रयत्न केला आहे. प्रकल्पाचा सामाजिक व आर्थिक व्यय आणि लाभ तसेच जमीन गमावणाऱ्या कुटुंबाच्या उत्पन्न घटीचा धोका आणि अशा प्रस्तावित प्रकल्पबाधीत कुटुंबास आदर्श जमिन मोबदल्याविषयी उभयपक्षी स्वीकारार्ह योजना तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. केर्ली तर्फवाडी रत्नागिरी जोतिबा येथील प्रकल्पबाधीत कुटुंबासोबत प्रत्यक्षपणे चर्चा दिनांक...

| अ. क्र. | स्थळभेटीचा दिनांक |
|---|---|
| १ | दिनांक २५ ते २७ मार्च २०२० |
| २ | दिनांक ०९ ऑक्टोबर २०२० |
| ३ | दिनांक १३ ते २३ ऑक्टोबर २०२० |
| ४ | दिनांक ०१ ते ०५ डिसेंबर २०२० |
| ५ | दिनांक १९ ते २१ डिसेंबर २०२० |

दरम्यान अनेकवेळा आयोजित केलेल्या या बैठकांदरम्यान प्रकल्पबाधीत क्षेत्रातील सापनिचे (यानंतर सामाजिक परिणाम निर्धारण असे वाचावे) मुख्य निष्कर्ष तसेच अंतिम निष्कर्ष, अतिरिक्त माहिती आणि अंतिम सापनि अहवाल इत्यादी विषयावर विचार करण्याबाबत विचारविमर्ष केला गेला. प्रकल्पबाधीत कुटुंबांबरोबरच्या चर्चेचा तपशील (छायाचित्रे इत्यादी बाबी) सदर अहवालात आवश्यक तेथे विश्लेषणासह सादर केला आहे.

प्रस्तुत सामाजिक परिणाम निर्धारण अहवालात वाडी रत्नागिरी व राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चारला जोडणारा उपमार्ग रस्त्याविषयीचा असून त्यामुळे प्रकल्पाबाबत अपेक्षित असलेला सकारात्मक व नकारात्मक बदल तसेच प्रकल्पाचा सामाजिक व आर्थिक परिणाम समजणे, मोजणे आणि त्याकरीता प्रकल्पबाधित व लाभधारकांशी संवाद साधने अत्यंत आवश्यक होते. सामाजिक व आर्थिक नुकसानीचे मोजमाप करण्यासाठी खालील अभ्यास पद्धतीचा अवलंब करण्यात आला. अपेक्षित, सुयोग्य, सत्याधारित व

पृथक्करणक्षम प्राथमिक व द्वितीय माहिती संकलनाकरीता अभ्यासगटासमोर निम्न उर्ध्वृत केलेले प्रमुख संशोधन प्रश्न होते;

१. कुणाकडून कोणत्या घटकांविषयी माहिती संकलित करावी?

२. अपेक्षित माहिती संकलन कसे साध्य करावे?

३. नेमकी कोणत्या प्रकारची माहिती संकलन करणे आवश्यक आहे?

४. संबंधित माहिती संकलन सुयोग्य व अचूकपणे कसे करता येईल?

५. संकलित माहितीच्या सहाय्याने अचूक प्रकल्प परिणाम कसे निश्चित केले जावू शकतात? किंवा तपासले जावू शकतात.

६. प्रलंबित प्रकल्पाचे अचूक परिणाम दर्शविणारी माहिती म्हणजे नेमकी कोणती माहिती व आकडेवारी असू शकेल?

७. संकलित माहितीचे पृथक्करण व विश्लेषण करण्याचा अचूक व सुयोग्य मार्ग अथवा पद्धती कोणत्या असू शकतात?

८. प्रकल्पबाधीतांबरोबरील संवादातून नेमके काय साध्य होवू शकेल?

९. संकलित माहिती व आकडेवारीतून निष्पन्न होणारे निष्कर्ष नेमके कोणत्या उद्दिष्टांची पूर्तता करू शकणारे असतील? .......इत्यादीः

## सापनि अभ्यास पद्धतीतील टप्पेः

प्रस्तुत अभ्यासगटाने जोतिबा देवस्थानापासून सुरू होवून पुढे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चारच्या रस्त्यास जोडणाऱ्या रस्त्याच्या प्रकल्पासाठी सामाजिक परिणाम मूल्यांकनाची योजना आखत असताना सर्वेक्षण मनुष्यबळ निवड आणि प्रशिक्षणामध्ये गुणवत्ता वेळ खर्च केला आहे. सुरूवातीस सर्वेक्षणाचा हेतू, मूल्यांकन एकक, उपलब्ध वेळ, पुढील कामाचे नियोजन आणि इतर संबंधित समस्यांबद्दल जाणून घेणे आवश्यक होते. तद्नुषंगाने सापनि अभ्यासगटाने वाडी रत्नागिरी रस्त्याशी संबंधित बांधकाम अभियंता

तसेच कोल्हापूर उपविभागीय अधिकारी, इतर अधिकारी-कर्मचारी आणि महसूल व सार्वजनिक बांधकाम विभाग अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य तसेच प्रकल्पबाधित जमिनमालक यांच्यासोबत वेळोवेळी चर्चा व सल्लामसलत केली. अशी चर्चा केल्यानंतर लक्षात आले की संबंधित कायदे व नियमांनुसार सापनि प्रक्रियेत मूलभूतपणे तीन घटकांचा समावेश करणे अत्यावश्यक आहे. ते तीन घटक पुढीलप्रमाणे;

१. प्रकल्पबाधीतांवर नकारात्मक परिणाम होऊ शकतात अशा सामाजिक-आर्थिक परिस्थितीचे सविस्तर मूल्यांकन करण्याची आवश्यकता.

२. दुर्बल घटक जसे की महिला, मुले व वयस्क यांचेवर होणारा परिणाम आणि प्रकल्पबाधीत व स्थावर विस्थापन जसे की घर, वृक्षसंपदा, निवारा, जैवनैसर्गिक घटक पशुपक्षी आणि वनसंपदेचे तथा वृक्षसंपदेचे स्खलन व नाश इत्यादी परिणामांचा सविस्तर अभ्यास. आणि.....

३. तद्नुषंगिक किमान अनिष्ट परिणामांसाठी सुयोग्य आर्थिक नुकसान भरपाई विषयक विस्तृत योजना सुचविणे.

## II) औपचारिक वास्तव:

- विकास प्रकल्पकामी जमिन अधिग्रहण करताना प्रकल्प विभागाकडून पुनर्वसनार्थ मूल्य निर्धारण करताना प्रचलित ''रेडिरेकनर'' किंवा ''प्रचलित बाजारभाव'' यापैकी जी किंमत जास्त असेल त्याच्या चारपट मूल्य आदा करणे अपेक्षित आहे. नव्हे तसे भूमि अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास कायदा - २०१३ अन्वये बंधनकारक आहे. परंतु अद्याप आपल्या देशात भूमि/जमिन बाजार (Land Market) मात्र विकसित झालेल्या नसल्याने असे अपेक्षित मूल्य निर्धारण करताना अनेक अडचणी येतात. अर्थात शासनाकरीता/शासनमान्य जमिन बाजार किंमत म्हणजे नजिकच्या भूतकाळात प्रकल्प परिसरात झालेल्या खरेदी-विक्रीचा प्रति नग (एकर/गुंठा) दर होय. अशी किंमत निर्धारित करताना खेरदी-विक्री दस्तऐवज किंवा स्टँप पेपरवर नोंदलेली किंमत होय. परंतु असे करताना

खरेदी व विक्रीदारास संबंधित नोंद किंमतीच्या प्रमाणास स्टँप ड्युटी आदा करावी लागते. महाराष्ट्रात हे प्रमाण नोंद किंमतीच्या सहा टक्के आहे. विशेष म्हणजे सरकारी ''रेडीरेकनर'' पेक्षा कोणत्याही जमिनीचा वास्तव बाजारभाव अधिकच असल्याचे दिसून येते. परंतु खरेदी विक्री व्यवहार करताना ''स्टँप ड्युटी'' कमी असावी म्हणून सरकारी ''रेडीरेकनर'' वर आधारित दस्तनोंदणी करून ''स्टँप ड्युटी'' टाळण्याची प्रवृत्ती दिसून येते. त्यामुळे सरकारमान्य बाजार किंमतीस अशा खरेदी-विक्री व्यवहारपत्राचा आधार असल्यामुळे सरकारी बाजार किंमत व ''रेडीरेकनर'' किंमत यात फारशी तफावत दिसून येत नाही. क्वचित प्रसंगी काही व्यवहार ''रेडीरेकनर'' किंमतीपेक्षा अधिक किंमत नोंदवून त्या प्रमाणात स्टँप ड्युटी आदा करण्याची तयारी दर्शविली जाते. परंतु असे व्यवहारही ''रेडीरेकनर'' पेक्षा अधिक किंमतीस असले तरीही वास्तव व्यवहार किंमत व प्रचलित बाजार किंमतीपेक्षा कमी किंमतीचेच असतात व प्रत्यक्षपणे अधिक किंमत मोजली व घेतली जाते. त्यामुळे जमिन अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास कायदा: २०१३ अन्वये जरी बाजार किंमतीस प्राधान्य असले तरीही जमिनीची वास्तव बाजार किंमत कागदोपत्री सिद्ध करणे कठिण बाब आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकल्पबाधितांच्या जमिनीच्या वास्तव बाजार किंमतीचे आकलन होण्यासाठी सापनि अभ्यासगटाने प्रकल्प परिसरातील कृषी (प्रति एकर) व व्यापारी (प्रति गुंठा) जमिनींचा वास्तव बाजारभाव परिसरातील नागरिकांना विचारला असता आमच्या असे लक्षात आले की, प्रस्तुत प्रकल्प परिसरात शेतजमिन प्रति एकर व व्यापारी जमिन प्रति एकर बाजारभाव अनुक्रमे

| अ. क्र. | प्रकल्पबाधित क्षेत्रातील शेतजमिनीची सरासरी बाजार किंमत | सरासरी बाजारभाव (किंमत) |
|---|---|---|
| १ | मध्यम जमिन | ३४,२०००० |
| २ | बागाईत जमिन | ४८,३३३३३.३३ |
| ३ | सरासरी किंमत | ४१,२१६६६.६७ |

| | | |
|---|---|---|
| ४ | प्रकल्पापूर्वीचा बाजारभाव | १०००००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

असा आहे. परंतु प्रस्तुत वळण रस्ता प्रकल्प नगरपरिषद हद्दीत येत असल्यामुळे प्रकल्प परिसरातील व्यापारी जमिनींची प्रचलित बाजार किंमत गृहित धरणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकल्पबाधितांना पुनर्वसनार्थ अधिग्रहित जमिन मूल्यांकन करताना कोणत्या किंमतीच्या चारपट मूल्य आदा करावे याकरीता व्यवस्थित धोरण निर्धारण करणे आवश्यक आहे. अर्थात याकरीता एकतर प्रकल्प परिसरात नजिकच्या भूतकाळात झालेले उच्च किंमतीचे व्यवहार गृहित धरून त्याच्या चारपट मूल्य आदा करण्याचे धोरण संयुक्तिक असले तरी संपूर्ण राज्याकरीता ग्रामीण व शहरी प्रकल्पांकरीता समान अधिग्रहित जमिन मूल्याचे धोरण अधिक उपयुक्त व अन्याय निवारण करणारे ठरेल.

- प्रकल्पोपरांत परिसरातील जमिनींचे मूल्य भांडवलीकरण (Value Capitalization) होवून भविष्यात प्रचंड किंमतवाढ अपेक्षित असल्यामुळे प्रस्तुत जमिनींचे पुनर्वसन मूल्यांकन करताना राज्य पातळीवर समान व न्यायाचे धोरण असणे आवश्यक आहे.
- सर्वच प्रकल्पबाधितांचे पिढीजात वास्तव्य गावातच असल्याचे दिसते. वाडी रत्नागिरी येथे जोतिबा देवस्थान असून प्रकल्पबाधित आपल्या उदरनिर्वाहासाठी देवस्थानात पुजारी, गुरव इ. कामे करतात. याव्यतिरिक्त प्रसाद व पूजा साहित्य विक्री व्यवसाय करूनही आपल्या उत्पन्नास हातभार लावतात असे दिसून येते. जास्तीत जास्त प्रकल्पबाधित आपल्या परंपरागत शेती व्यतिरिक्त इतरही कामे करून आपला प्रपंच चालवतात. त्यांना योग्य मोबदला मिळावा अशी रास्त अपेक्षा ते व्यक्त करतात किंबहुना तो मिळणे आवश्यकही आहे.
- नोकरीच्या प्रतिक्षेत असलेल्या सदस्यांच्या मते प्रकल्पबाधित झाल्यामुळे पिढ्यानपिढ्या नुकसान झाले व त्याचबरोबर कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन

असलेली शेती गेल्यामुळे बेरोजगार निर्माण झाला असून त्यांना सरकारी नोकरी मिळावी.

- विशेष म्हणजे यापैकी एकाही प्रकल्पबाधिताने प्रस्तुत प्रकल्पास विरोध केलेला नाही. म्हणूनच तात्काळ पुनर्वसन मोबदल्याची आवश्यकता अधोरेखित होते.
- ४५.५ टक्के प्रकल्पबाधितांनी जमिन विक्री होत नसल्याचे सांगितले. शेती उत्पन्नावर उदरनिर्वाह करणे शक्य होत नसल्याने ग्रामीण भागात जमिनीचे खरेदी–विक्री व्यवहार वारंवार होत असल्याचे दिसते.
- ४५.५ टक्के प्रकल्पबाधितांकडे सिंचन सुविधा नाहीत. अशा सर्व प्रकल्पबाधितांची शेती पर्जन्यमानावर अवलंबून असल्याचे दिसून येते.
- एकूणांपैकी ६३.६ टक्के प्रकल्पबाधितांनी संस्थात्मक व बिगर संस्थात्मक अशी दोन्ही स्वरूपाची कर्जे घेतली आहेत.
- प्रकल्पकामी दिलेल्या जमिनीस योग्य मोबदला मिळाला तर ते आपल्या कुटुंबातील आजारी व्यक्तीची योग्य काळजी घेवू शकतील. कारण प्रकल्पात जमिनी गेल्याने त्यांचे उत्पन्न कमी झाले आहे. त्यामुळे जमिनी जावून उत्पन्नाचे साधन कमी झाल्यामुळे अशा कुटुंबांना पुनर्वसन रक्कमेची आवश्यकता अधिक असल्याचे दिसून येते.
- प्रस्तुत प्रकल्पाकरीता जमिन देण्यासाठी कोणताही दबाव नाही असे सर्व प्रकल्पबाधितांनी नमूद केले आहे. अर्थात या सर्व प्रकल्पबाधितांनी स्वेच्छेने आपल्या जमिनी प्रकल्पाकरीता दिल्या आहेत हे विशेष. त्यामुळे जर सर्वच प्रकल्पबाधित आपल्या जमिनी प्रकल्पासाठी देण्यास स्वेच्छेने तयार असतील व पायाभूत विकासकामास मदत करीत असतील तर त्यांच्या प्रकल्पबाधित जमिनीस योग्य मोबदला मिळणे आवश्यक आहे.
- जमिन अधिग्रहणाची व प्रलंबित पुनर्वसन व मोबदल्याची उदाहरणे पाहता देशातील रायसीना गावची जमिन लोकसभा, राष्ट्रपती भवन, नॉर्थ व साऊथ

ब्लॉककरीता १९११ मध्ये ब्रिटिशांनी अधिग्रहित केली होती. परंतु सरकारी कागदपत्रे तपासता अद्यापपर्यंत या शेतकऱ्यांना १९०९ च्या अधिग्रहणाचा मोबदला मिळाला नाही किंवा त्यांचे पुनर्वसन झाले नाही असे दिसून येते. असाच अनुभव महाराष्ट्रातील कोयना प्रकल्पाचे प्रकल्पबाधित शेतकरी १९५७ पासून आजपर्यंत घेत आहेत हे सर्वश्रुत आहेच (Indian Express, 04 August 2011).

- प्रकल्पबाधितांना त्यांच्या प्रकल्पबाधित जमिनीच्या मोबदल्यात किती व कसा मोबदला मिळणार याची त्यांना सार्वजनिक बांधकाम कार्यालयाकडून काहीही माहिती मिळाली नाही. अर्थात यात काहीही आश्चर्य नाही. कारण इतर अनेक प्रकल्पांचे सापनि अहवाल अभ्यास करताना प्रस्तुत अभ्यासगटाचा असाच अनुभव आहे.
- प्रकल्पबाधितांना त्यांनी दिलेल्या जमिनीचा योग्य मोबदला मिळाला तर ते जमिनही खरेदी करू शकतात व पुन्हा उदरनिर्वाहाचे साधन उभे करू शकतात. परंतु दुर्दैवाने एकाही प्रकल्पबाधितास हे माहित नाही की प्रकल्पोपरांत परिसरातील जमिनींचे मूल्य भांडवलीकरण होवून जमिनीच्या बाजार किंमती प्रचंड प्रमाणात वाढणार असल्यामुळे त्यांना प्रकल्पबाधन मोबदल्यात जमिन खरेदी करणे शक्य होणार नाही. कारण जमिन मोबदला ठरविताना व आदा करतानाचा प्रशासकीय अनुभवाचा इतिहास सकारात्मक नसल्याचाच अनुभव आहे.
- अनेक ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा पाण्याच्या चारी तयार केल्या नसल्याने प्रकल्पबाधितांच्या उर्वरित शेतात पावसाचे पाणी जावून प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या कामातील त्रुटी दूर व्हाव्यात ही त्यांची माफक अपेक्षा आहे. कारण प्रस्तुत प्रकल्पक्षेत्र अधिक पर्जन्यमानाच्या प्रदेशात येत

असल्याने पावसाचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे रस्त्याच्या कामातील त्रुटीमुळे पावसाळ्यात प्रकल्पबाधितांच्या शेतांचे नुकसान संभवते.

- मालमत्तांचे मूल्यांकन करताना ते वास्तविक असावे जेणेकरून त्यांना योग्य तो मोबदला मिळेल. अर्थात स्थावर मालमत्तेचे मूल्यांकन करताना प्रस्तुत जमिनीची व स्थावर मालमत्तेची नविन मालमत्ता आहे असेच गृहित धरून मूल्यांकन होणे आवश्यक आहे. कारण प्रस्तुत बाधनामुळे जर नविन स्थावर मालमत्ता निर्माण करावयाची असेल तर त्याकामी चालू किंमतीनुसार खर्च येणार आहे याची जाणिव प्रकल्प पुनर्वसन अधिकाऱ्यास असणे आवश्यक आहे.
- आजारविषयक स्थितीकडे पाहिले असता असे म्हणावे लागेल की अधिग्रहण मोबदला देत असताना तो योग्य व पर्याप्त प्रमाणात असावा जेणेकरून प्रकल्पबाधितांना न्याय मिळेल. कारण आजारपणावरील खर्चाचे प्रमाणही बऱ्यापैकी अधिक असल्याचे दिसून आले. तसेच प्रकल्पकामी उत्पन्नाचा मार्ग असलेली कृषि जमिन गेल्याने त्यांच्यासमोरील खर्चाची समस्या अधिक तीव्र बनू शकते यात शंका नाही.
- प्रत्यक्ष क्षेत्रभेटीदरम्यान सापनि अभ्यासगटाच्या असे लक्षात आले की अनेक ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा पाण्याच्या चारी तयार केल्या नसल्याने प्रकल्पबाधितांच्या उर्वरित शेतात पावसाचे पाणी जावून प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या कामातील त्रुटी दूर व्हाव्यात ही त्यांची माफक अपेक्षा आहे. कारण प्रस्तुत प्रकल्पक्षेत्र अधिक पर्जन्यमानाच्या प्रदेशात येत असल्याने पावसाचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे रस्त्याच्या कामातील त्रुटीमुळे पावसाळ्यात प्रकल्पबाधितांच्या शेतांचे नुकसान संभवते.
- प्रकल्पबाधितांची मुले सरकारी नोकरीत घ्यावे असेही त्यांचे म्हणणे आहे. अर्थात सार्वजनिक बांधकाम खात्यात सकारात्मक विचार करून अर्हतेप्रमाणे

कुटुंबातील एकास नोकरी दिली तर सरकारी तिजोरीवर काही फार मोठा भार पडणार नाही.

- प्रकल्पबाधित त्यांची जमिन पायाभूत सुविधा निर्माण करण्यास व त्याचे लाभ अनेकांना व्हावेत अशा धारणेतून लोककल्याणाच्या भावनेने आपल्या जमिनी प्रकल्पास देतात. प्रकल्पास जमिन दिल्यामुळे त्यांचे पिढ्यानपिढ्याचे व कायमस्वरूपी उदरनिर्वाहाचे साधन निघून जाते व जमिन मालकीही संपुष्टात येते. यामुळे प्रकल्पबाधितांच्या याच पिढीचे नुकसान होत नसून येणाऱ्या अनेक पिढ्यांचे नुकसान होते. त्यामुळे त्याचा विचार करून त्यांना योग्य मोबदला आदा करणे आवश्यक आहे. प्रकल्पबाधनाचा मोबदला देताना प्रकल्पोपरांत जमिनीच्या भांडवली मूल्यवर्धीताचाही विचार होणे आवश्यक आहे.
- अलिकडीलच्या काळातील रस्ते विकास झाल्यानंतर आजूबाजूच्या जमिनीचे भाव वाढल्याचे दिसते व अधिकच्या रोजगार संधीही निर्माण होताना दिसून येतात. यामध्ये बहुसंख्य रोजगार संधी या स्वयंरोजगार स्वरूपाच्या आहेत. परंतु प्रकल्पबाधितांची जमिन प्रकल्पात जाते आणि बहुतेकदा प्रकल्पोपरांत लाभधारक इतर लोक असतात हे देखील वास्तव आहे.
- शिल्लक जमिनीतही प्रस्तुत प्रकल्पबाधित तयार झालेल्या नविन रस्त्याच्या मध्यापासून तीस मिटरपर्यंतच्या जमिनीत कायमस्वरूपी सुधारणा करू शकत नाहीत. त्यामुळे वास्तवातील प्रकल्पबाधन अधिक जमिनीचे झाले असे गृहित धरणे आवश्यक आहे. कारण अशा जमिनीवरही प्रकल्पग्रस्तांची खऱ्या अर्थाने मालकी शिल्लक राहिलेली नाही. त्यामुळे अधिग्रह मोबदला आदा करताना अशा अप्रत्यक्ष अधिग्रहणाचा समावेश मूळ अधिग्रहणात करून सर्वच जमिनीकरीता मोबदला आदा करणे आवश्यक आहे.
- रस्त्याच्या मध्यापासून ३० मिटर प्रमाणे बाधीत झालेली जमिन पाहता ३५.४८ टक्के जमिन ही मात्र एका प्रकल्पबाधिताची गेली असून उर्वरित प्रकल्पबाधितांची

प्रत्येकी एक एकरपेक्षा कमी जमिन प्रकल्पकामी गेल्याचे दिसते. उपरोल्लेख केल्याप्रमाणे प्रकल्पाव्यतिरिक्त रस्त्याच्या मध्यापासून तीस मिटरपर्यंतच्या जमिनीवरही अप्रत्यक्ष अधिग्रहण झाल्याचे मान्य करावे लागेल. कारण अशा जमिनवीर संबंधित प्रकल्पबाधित शेतकरी कायमस्वरूपीच्या सुधारणा करू शकत नाहीत. उदा. रस्त्याच्या कडेला स्वत:च्या जमिनीत घर बांधकाम, विहीर किंवा एखाद्या व्यवसायासाठीही बांधकाम करू शकत नाहीत. त्यामुळे अशा जमिनीच्या अधिग्रहणामुळे शेतकऱ्यांना जमिनीचा वापर करता येत नाही. परंतु प्रकल्प अधिकारी किंवा पुनर्वसन अधिकारी मात्र अशा अप्रत्यक्ष परंतु वास्तव प्रकल्पबाधनाचा विचार करत नाहीत. एकंदरीतच प्रकल्प अधिकारी प्रकल्प अधिग्रहण मोबदला कमी करण्याचा विचार करतात असे इतरही सर्वच प्रकल्पांच्या बाबतीतही दिसून येते. त्यामुळे प्रस्तुत प्रकल्प अधिकाऱ्यांकडूनही वेगळी व आदर्श अपेक्षा करणे शक्य नाही.

- . विशेष म्हणजे रस्ता प्रकल्प झाल्यामुळे कडेच्या जमिनीस अधिक भावाच्या अपेक्षेने प्रकल्पबाधित जमिनमालकांनी जमिन विकली व व्यवसायाच्या अपेक्षेने खरेदी करणाऱ्याने खरेदी केली. परंतु यापैकी एकासही प्रस्तुत जमिनीत कायमस्वरूपी निर्माण किंवा व्यवसायाकरीता या जमिनीचा वापर करता येणार नाही याची पूर्वकल्पना नव्हती. त्यामुळे असे विक्री व्यवहार चुकीचे आहेत असे प्रकल्प अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. परंतु अशा प्रकल्पबाधितांचा विनियोग अधिकार नसलेल्या जमिनीकरीता मोबदला देण्यास मात्र प्रकल्प अधिकारी तयार नाहीत.
- प्रकल्पबाधितांचे सरासरी वय ४६.२ टक्के इतके आहे. एकूण प्रकल्पबाधितांपैकी ५८.५ टक्के इतके प्रकल्पबाधित हे वय वर्शे ५४ च्या आतील आहेत. यावरून एक महत्त्वाची बाब लक्षात घेणे आवश्यक आहे व ती म्हणजे प्रस्तुत तुलनेने तरूण वयोगटात येणाऱ्या प्रकल्पबाधितांचे योग्य पुनर्वसन होणे आवश्यक आहे. कारण या सर्व तरूण वयोगटातील प्रकल्पबाधितांच्या आर्थिक जबाबदाऱ्या

निश्चितपणे अधिक असल्याने पुनर्वसन मेबदला व शक्य असल्यास कुटुंबातील एका व्यक्तीस नोकरीचाही विचार होणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | प्रकल्पबाधित क्षेत्रातील शेतजमिनीची सरासरी बाजार किंमत | सरासरी बाजारभाव (किंमत) |
|---|---|---|
| १ | मध्यम जमिन | ३४,२०००० |
| २ | बागाईत जमिन | ४८,३३३३३.३३ |
| ३ | सरासरी किंमत | ४१,२१६६६.६७ |
| ४ | प्रकल्पापूर्वीचा बाजारभाव | १००००००.०० |

कोणत्याही विकास प्रकल्पोपरांत परिसरातील जमिनींची किंमत वधारते. कारण संबंधित परिसरात जमिनीचे मूल्य भांडवलीकरण होवून किंमत वाढीची प्रक्रिया सुरू होते. असाच अनुभव प्रस्तुत प्रकल्पाच्या बाबतीतही येतो आहे. याचे महत्त्वाचे कारण पायाभूत सुविधा व प्रकल्पोपरांत संबंधित भागाचा व्यापारी स्वरूपाचा विकास घडून येतो. तसेच कोणत्याही भागातील जमिनीच्या बाजार किंमती या संबंधित भागातील सरकारी दरापेक्षा अधिक असतात. परंतु अशा वास्तव बाजार किंमती कागदोपत्री येत नसल्यामुळे पुनर्वसन मोबदला देताना प्रकल्प विभाग संबंधित बाजार किंमतीकडे सोईस्कर दुर्लक्ष करताना दिसून येतात. त्याकरीता प्रस्तुत सापनि अभ्यासगटाने प्रत्येक प्रकल्पबाधितास तसेच परिसरातील इतर लोकांना विचारून प्रकल्पभागातील  जमिनीच्या सरासरी किंमतीचा अंदाज घेण्याचा प्रयत्न केला असता उपरोल्लेखित सारणी मध्ये नमूद केल्याप्रमाणे किंमती मिळाल्या. प्रकल्पपूर्तीपूर्वीच्या किंमतीचा विचार केला तर प्रकल्पोपरांत जमिनीच्या किंमतीत किमान चारपट वृद्धी झाल्याचे दिसून आले. त्यामुळे प्रस्तुत प्रकल्पबाधितांना त्यांच्या बाधित जमिनीचा मोबदला देताना प्रस्तुत बाजार किंमतीचा जरूरपणे विचार केला गेला पाहिजे असे सापनि अभ्यासगटाचे स्पष्ट मत आहे. नव्हे तसे २०१३ च्या भूमि अधिग्रहण, पुनर्वसन व पुनरनिवास कायद्यात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

- रस्त्याच्या कामामध्ये अनेक त्रुटी राहिल्या असल्याची मते प्रकल्पबाधितांनी नोंदवली आहेत. या त्रुटी दूर करून प्रकल्पबाधितांना योगय मोबदला देणे

आवश्यक आहे. ज्या ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा पाणी वाहून जाण्यासाठी पाट काढले नाहीत अशा अनेक ठिकाणी उतारावरचे पाणी प्रकल्पबाधितांच्या उर्वरित शेतात जावून त्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाल्याचे दिसून आले.

- रस्त्याच्या कामामुळे त्यांच्या शेताचे दुतर्फा दोन तुकड्यांत रूपांतर झाल्यामुळे उर्वरित अरूद शेतपट्टीत मशागत करणे अवघड व जिकिरीचे बनले आहे असे नमूद केले. त्यामुळे त्यांना किफायतशीरपणे शेती करता येत नाही. प्रकल्पानंतर प्रकल्पबाधितांच्या उर्वरित मालमत्तेचे प्रकल्पामुळे नुकसान होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक असून जर त्यांचे नुकसान होत असेल तर त्यांना त्याची अतिरिक्त नुकसान भरपाई दिली पाहिजे. अर्थात याकामी सर्व जबाबदारी प्रकल्प विभागाकडे देणे आवश्यक आहे. प्रकल्पबाधितांना कोणताही आर्थिक त्रास व नुकसान होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. कारण प्रकल्पबाधितांनी त्यांच्या उपजिविकेचे एकमेव साधन असलेली शेतजमिन बिनशर्तपणे प्रकल्पास दिली असल्याने एकतर त्यांच्या जमिनीचे योग्य मूल्यांकन होणे आवश्यक आहे. तसेच प्रकल्पोपरांत उर्वरित जमिनीचे नुकसान होणार नाही याकडे लक्ष देण्याची प्रमुख जबाबदारी प्रकल्प विभागाने टाळता कामा नये.

**नवीन आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीनंतर देशात अनेक खाजगी व सार्वजनिक प्रकल्प हाती घेवून विकास प्रक्रिया गतीशील करण्याचे प्रयत्न करण्यात आले. त्याचा एंकदरीत परिणाम देशाच्या विकास/वृद्धी दारावर दिसून आला. परिणामे** खुल्या व्यापार धोरणाच्या अंमलबजावणीच्या पहिल्या टप्प्यात औद्योगिक व एकंदरीतच समग्रलक्षी विकासदर झपाट्याने वाढला. या सर्व प्रक्रियांना गती देताना जे अनेक प्रकल्प हाती घेण्यात आले (उदा. विशेष आर्थिक क्षेत्रे, औद्योगिक महामंडळांचा विस्तार, बहुउद्देशीय सिंचन/जलप्रकल्प, बहुपदरी महामार्ग, शहर व निवासी परिसर विस्तार....इत्यादी) अशा सर्व प्रकल्पांकरीता विविध राज्यांत हजारो हेक्टर शेतजमीनींचे संपादन करण्यात आले (प्रकरण: ०३ व ०४). परंतु जमीन संपादन करताना संबंधित शेतकऱ्यांच्या

रोजगार पुनर्वसनाकडे दुर्लक्ष झाल्याने देशात आर्थिक दरी निर्माण होवून ती सतत वाढत असल्याचे गेल्या तीन दशकांच्या (३० वर्षे) काळात निष्पन्न झाले. परिणामे शेतकरीवर्गाने/जमिन मालक कधी संघटित तर अनेकदा असंघटित स्वरूपाचे लढे उभारले. प्रामुख्याने हे लढे आर्थिक व निवासी पुनर्वसन आणि भूसंपादन मोबदला इत्यादी संदर्भात असल्याचे दिसून येतात. महाराष्ट्रातील मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील तीन लक्ष कोटी रूपये गुंतवणुकीच्या प्रलंबित तेलशुद्धीकरण प्रकल्पाविरोधात तेथील शेतकऱ्यांनी उभारलेले लढे याची ज्वलंत उदाहरणे आहेत. प्रस्तुत प्रकल्प विरोधामुळे महाराष्ट्र शासनाने भूसंपादन मोबदल्याविषयीचे बाजारमूल्याच्या चारपट मूल्य धोरण बदलून समृद्धी महामार्ग विस्थापित जमिन मालक शेतकऱ्यांना प्रती एकर किमान एक कोटी रूपये (१ कोटी) मोबदला देण्याची तयारी दर्शविली. नाणार तेलशुद्धीकरण प्रकल्पाबाबतही राज्य शासनाने असेच धोरण स्विकारण्याची तयारी दर्शविली असल्याचे दिसून आले. नाणार प्रकल्प मार्गी लावण्यासाठी राज्य शासनाने सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल तयार करण्याचे काम गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, पुणे यांचेकडे सोपविले होते.

- उपरोल्लेखित प्रकल्प अथवा प्रकल्पबाधीत शेतजमिन मूल्यांकनाविषयी राज्य सरकारने घेतलेल्या भूमिकेकडे अंगुलीनिर्देश करता असे निष्पन्न होते की ज्या ठिकाणी प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांचा विरोध तीव्र आहे अशा ठिकाणी राज्य सरकार जमिन मूल्याचा पुनर्विचार करून शेतकऱ्यांचा विरोध होणार नाही अशा प्रकारचे मूल्य निर्धारण करते असे दिसून येते. या सर्व बाबींचा व प्रस्तुत अभ्यासगटाने प्रत्यक्ष क्षेत्रभेटीतून अवलोकन केलेल्या बाबींवरून प्रकल्पनिहाय मोबदला, जमिन मूल्यांकन, कमाल जमिन धोरण इत्यादी भिन्न असल्याचे स्पष्ट होते. अर्थात असे प्रकल्पनिहाय भिन्न धोरण प्रकल्पबाधितांच्या दृष्टीने अन्यायकारक आहे.

## परिणामे;

महाराष्ट्रातील रस्ते, महामार्ग, पायाभूत सुविधा अशा इतर भूसंपादन व जमिन मूल्यांकनाविषयीही राज्य सरकारने मुंबई–नागपूर समृद्धी महामार्गाप्रमाणे धोरण अंगिकारण्यास हरकत नसावी. तसेच असे जमिन मूल्यांकन धोरण सर्व प्रकल्प विभाग तथा खात्यात भूमिअधिग्रहणार्थ लागू करून प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला देण्यास हरकत नसावी. याच्या पुष्ट्यर्थ असा युक्तिवाद असू शकतो की स्वेच्छा पुनर्वसन घेणाऱ्या शेतकऱ्यांचे उदरनिर्वाह व रोजगाराचे साधन कायमस्वरूपी संपुष्टात येते. तसेच ज्या प्रकल्पबाधितांना प्रकल्पलाभक्षेत्रात पर्यायी जमिनी देवू केल्या जातात त्यांनाही अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

## सारांशात;

मुंबई–नागपूर समृद्धी महामार्गाकरीता राज्य शासनाने अवलंबिलेल्या अथवा प्रस्तावित/प्रलंबित नाणार तेलशुद्धीकरण प्रकल्पाकरीता अवलंबू इच्छित असलेल्या प्रकल्पबाधीत जमिन मूल्यांकनाचे ''एक कोटी रूपये प्रती एकर'' मूल्याचे धोरण राज्यातील इतर महामार्ग अथवा प्रस्तुत प्रकल्पासारखे बाह्यवळण रस्ते इत्यादींसाठी अवलंबणे प्रकल्पबाधितांच्यादृष्टीने न्यायाचे ठरेल. अर्थात शहरी जमिन भूसंपादन मोबदल्याविषयी जमिन मूल्य धोरण निश्चितपणे ग्रामीण जमिन मूल्य धोरणापेक्षा वेगळे व अधिक किंमतीचे असणे आवश्यक व न्यायाचे असेल. प्रकर्षाने नमूद करणे आवश्यक असलेली विशेष बाब म्हणजे भूसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्निवास कायदा–२०१३ अन्वये प्रकल्पबाधीत जमिन मालकांस जमिनीच्या बदल्यात जमिन देणे प्रस्तावित आहे. आणि जर अशी देययोग्य जमिन उपलब्ध नसेल तर बाजारभावाच्या चारपट रक्कम आदा करावयाची तरतूद आहे. परंतु भारतात जमिन बाजारपेठ (Land Market) किंवा तदसदृश्य व्यवस्था अद्याप निर्माण होवू शकली नाही हे वास्तव मान्य करावे लागते. कारण जमिन बाजार किंमत म्हणजे प्रकल्पबाधन क्षेत्राच्या आसपास नजिकच्या भूतकाळात ज्या दराने जमिनीचे खरेदी–विक्री व्यवहार झाले आहेत तो दर होय. परंतु शहरी तसेच ग्रामीण

कृषी जमिनीचे खरेदी-विक्रीचे व्यवहार होत असताना राज्य सरकारला स्टँप ड्युटीच्या स्वरूपात नोंदणी शुल्क आदा करावे लागते. अशा नोंदणी शुल्काचे (स्टँप ड्युटी) दर देशातील सर्व राज्यात प्रचंड प्रमाणात असल्याने संबंधित दर चुकविण्याकडे खरेदी व विक्रीदारांचा कल असतो. परिणामे प्रत्यक्ष व्यवहार दराने खरेदी-विक्रीचे दस्त नोंदविले जात नसून सरकारी दराने (रेडिरेकनर) दस्त नोंदणीचा मार्ग स्विकारला जातो. जमिनीचा सरकारी दर नेहमीच प्रत्यक्ष बाजारदरापेक्षा कमी असतो. परंतु बाजारदर मात्र कागदोपत्री नोंदीत येत नाही. आणि प्रत्यक्षपणे खरेदी-विक्रीचा नोंदणीकृत दर बाजारभावापेक्षा खूप कमी असतो. अर्थात बाजारभावाच्या चारपट मोबदला आदा करण्याचे धोरण त्यामुळे अपयशी अथवा फोल ठरते. त्यामुळे सापनि अभ्यासगटाने क्षेत्र पाहणी करताना संबंधित भागात जमिनींची प्रत्यक्ष बाजार किंमत किती आहे याचीही माहिती घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा असे लक्षात आले की जमिनीचा बाजारभाव रेडिरेकनरच्या दरापेक्षा खूपच अधिक आहे. परंतु नजिकच्या भूतकाळातील खरेदी-विक्री दस्तऐवजात मात्र याची नोंद होत नाही असेही निदर्शनास आले. पर्यायाने वास्तव बाजारभावाची कल्पना येणे कठीण बनते. म्हणून सापनि अभ्यासगट असे सूचित करतो की; समृद्धी महामार्ग किंवा प्रलंबित नाणार प्रकल्पकामी स्विकारलेले अधिग्रहण मूल्य धोरण राज्यातील इतर सर्व प्रकल्पांकरीता स्विकारल्यास राज्यातील सर्व विकास प्रकल्पकामी समान भूमि अधिग्रहण मूल्याचे धोरण आकारास येणे शक्य होईल.

प्रस्तुत केर्ली तर्फवाडी रत्नागिरी जोतिबा बाह्य वळण रस्ता प्रकल्पाकरीता ते अवलंबिले तर ते राज्यातील विविध/सर्व प्रकारच्या प्रकल्पबाधितांकरीता समान पुनर्वसन मूल्याचे व न्याय्य आर्थिक पुनर्वसनाचे धोरण असेल. अन्यथा विविध प्रकल्पबाधीत जमिनींकरीता विविध मूल्य धोरण प्रकल्पग्रस्तांच्या मनात भेदभावाची भावना निर्माण करणारे व पर्यायाने निम्न मूल्य प्रकल्पबाधितांकरीता अन्यायकारक ठरेल.

# प्रकरण:१
# प्रास्ताविक

## प्रास्ताविक:

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्रमांक पीएलएन-२०१८/सीआर-(१०९९)/नि-३, दिनांक १९/०२/२०१८ अन्वये कोल्हापूर जिल्ह्याच्या पन्हाळा तालुक्यातील केर्ली तर्फ वाडी रत्नागिरी जोतिबा गिरोली अशा जोतिबा डोंगरापासून सुरू होवून पुढे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चारला जावून जोडणाऱ्या उपरस्त्यास मिळणाऱ्या रस्त्याच्या बांधकामास मंजूरी मिळाली आहे. प्रस्तुत रस्ता बांधकामाचा एकूण खर्च नव्वद लक्ष रूपये प्रस्ताविक केला गेला असून याकामी खाजगी, सरकारी व इतर सार्वजनिक असे मिळून एकून २९ सातबारा (७/१२) उताऱ्यांवरील जमिन प्रस्तुत प्रकल्पाकरिता अधिग्रहित करावयाचे प्रस्तावित होते. प्रस्तुत प्रकल्पास मंजुरी मिळाल्यानंतर कोल्हापूर सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयातून निर्गमित झालेल्या निरंक दिनांक पत्रानुसार प्रस्तुत प्रकल्पाच्या प्रकल्पबाधितांस आगावू नुकसान भरपाईस हरकत नसावी असे नमूद केल्याचे दिसते. तसेच सर्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूरच्या कार्यकारी अभियंता कार्यालयाच्या दिनांक ०९/११/२०१८ च्या पत्रान्वये प्रस्तुत प्रकल्पास पुनर्वसन कायदा लागू होत नाही असा दाखला दिल्याचेही निदर्शनास येते. तसेच याच कार्यालयाच्या दिनांक १९/११/२०१८ च्या आणखी एका पत्रान्वये प्रस्तुत प्रकल्पकामी करावयाचे भूसंपादन कायमस्वरूपीचे आवश्यक असल्याचाही उल्लेख आहे. कदाचित याच पत्रामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणत्याही प्रकारचा जमिन पुनर्वसन मोबदला आदा न करता प्रकल्पबाधितांना त्यांच्या जमिन पुनर्वसनाचा विचार न करता प्रकल्प काम पूर्ण करून मोबदला आदा करणे बिनधास्तपणे प्रलंबित ठेवले असावे असे निदर्शनास येते. परंतु उलटपक्षी प्रकलपबाधित जमिनमालक शेतकऱ्यांनी मात्र सार्वजनिक बांधकाम खाते व महसूल खात्याच्या भूमि अभिलेख/भूमि अधिग्रहण व पुनर्वसन अधिकाऱ्यांवर विश्वास ठेवून आपल्या जमिनी प्रकल्पकामी बिनशर्तपणे देवू केल्या असल्याने प्रस्तुत प्रकल्पपूर्तीत कोणताही

कालापव्यय न होता तो इप्सित वेळेत होवू शकला आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रात वेगवेगळ्या प्रकारचे अनेक विकास प्रकल्प असे आहेत की ज्या प्रकल्पांच्या भूमि अधिग्रहण, प्रकल्पबाधितांचा मोबदला व पुनर्वसन प्रलंबनामुळे समस्या निर्माण होवून असे प्रकल्प गेली काही वर्षेच नव्हे तर काही दशके प्रलंबित असल्याने मूळ प्रकल्पव्ययात अनेक पटींनी वाढ झाली आहे. विशेषकरून महाराष्ट्रातील प्रलंबित सिंचन प्रकल्पांची अनेक उदाहरणे आहेत. अशा काही प्रलंबित सिंचन प्रकल्पांचेही सापनि अहवाल अर्थशास्त्र विभागाच्या प्रस्तुत अभ्यासगटाने पूर्ण केले असल्याने आम्हास तसा अनुभव आहे.

प्रस्तुत रस्ता प्रकल्पाच्या बाबतीत मात्र प्रकल्पबाधितांकडून असा काहीच नकारात्मक अनुभव प्रकल्प विभागास आला नाही. उलटपक्षी वाडी रत्नागिरी जोतिबा येथील शेतकऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग व महसूल विभागातील भूमि अधिग्रहण व पुनर्वसनाशी संबंधित अधिकाऱ्यांवर विश्वास ठेवून प्रकल्पपूर्तीकामी आपली जमिन देवू केल्याने प्रस्तुत प्रकल्प किंमतवाढ/भाववाढीचा परिणाम होवून प्रकल्पव्ययात वाढ न होता पूर्णत्वास जावू शकला. परंतु उलटपक्षी या सर्व प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचे त्यांच्या प्रकल्पबाधित जमिनीचे मोबदले देणे मात्र प्रकल्पपूर्ततेनंतरही प्रलंबित असल्याने हे सर्व प्रकल्पबाधित चिंताग्रस्त आहेत. कारण त्यांची आर्थिक परिस्थिती बेताची व उपजिविका कृषीनिर्भर असल्याने व धारणक्षमता अकिफायतशीर असल्यामुळे प्रकल्पकामीच्या भूमि अधिग्रहणाचा त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर दूरगामी परिणाम झाला आहे. त्यामुळे त्यांच्या मूलभूत उदरनिर्वाहाचीच समस्या निर्माण झाली आहे असे दिसून येते. प्रकल्पाचे काम पूर्ण होवूनही प्रकल्पबाधितांना त्यांच्या भूमि अधिग्रहणाचे मोबदले न मिळाल्यामुळे एकप्रकारे फसवणूकीची भावना या सर्व प्रकल्पबाधितांच्या मनात निर्माण झाली आहे असे आम्हास अभ्यादौऱ्याचेवेळी निदर्शनास आले. त्यामुळे या सर्व प्रकल्पबाधितांना तात्काळपणे त्यांच्या अधिग्रहित जमिनीचे मूल्य निर्धारण करून अधिग्रहणाच्या आकारमानाप्रमाणे मोबदले आदा करणे अत्यंत निकडीचे आहे.

याव्यतिरिक्त विशेष महत्त्वाची बाब प्रस्तुत सापनि अभ्यासग्रटाच्या क्षेत्रभेटीवेळी लक्षात आली ती म्हणजे प्रकल्प अधिग्रहणाव्यतिरिक्तचे विनामूल्य अतिरिक्त भूमि अधिग्रहण होय. याचा अन्वयार्थ असा की, प्रस्तुत रस्त्याच्या मध्यापासून दोन्ही बाजूला ३० मिटरपर्यंत (१०० फूट पर्यंतच्या) जमिनीवर प्रकल्पबाधितांचा अधिकार संपुष्टात येतो. परंतु प्रस्तुत कामी ना प्रकल्पबाधितांना प्रकल्प अधिकाऱ्यांनी काही कल्पना दिली होती ना प्रस्तुत अतिरिक्त जमिनीवरील हक्क संपुष्टतेचे मोबदले आदा करण्याचा विचार केला होता. अर्थात यासंबंधी सर्व प्रकल्पबाधितांना अंधारात ठेवून त्यांची एकप्रकारे प्रकल्प विभागाकडून फसवणूकच झाल्याचे दिसून येते. कारण रस्त्याच्या मध्यापासून ३० मिटरपर्यंत दुतर्फा जमिनीवर हे प्रकल्पबाधित कोणत्याही स्वरूपाची कायमस्वरूपी गुंतवणूक किंवा सुधारणा करू शकत नाहीत. आणि तसे केल्यास जर भविष्यात प्रस्तुत रस्त्याचे रूंदीकरण झाले व त्याकामी अधिकचे अधिग्रहण केल्यास ३० मिटरपर्यंतच्या दुतर्फा क्षेत्रातील कोणत्याही सुधारणेचे मोबदले या प्रकल्पबाधितांना मिळणार नाहीत असे आता प्रकल्पपूर्तीनंतर प्रकल्प विभागाचे अधिकारी शेतकऱ्यांना सांगत आहेत. कारण यापैकी काही प्रकल्पबाधितांनी नविन चांगला रस्ता झाल्यामुळे व्यवसायाच्या उद्दिष्टाने व राहण्याकरीता घरे तसेच जनावरांच्या गोठ्यांची कामे हाती घेतली होती. अशा सर्व सुधारणा कामांना प्रकल्प विभागाने/सार्वजनिक बांधकाम विभागाने आता तोंडी हरकती घेतल्या आहेत असे प्रकल्पस्थळी प्रकल्पग्रस्ताशी चर्चा करताना सापनि अभ्यासगटाच्या निदर्शनास आले. जर अशा उर्वरित व प्रकल्पहद्द व्यतिरिक्त अतिरिक्त जमिनीवर प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचा हक्कच राहणार नव्हता तर त्यांना याबाबतची पूर्वकल्पना का दिली नाही हे अनाकलनीय वाटते. अर्थात तशी लेखी कल्पना या सर्व प्रकल्पग्रस्तांना देवून अशा अतिरिक्त भूमि अधिग्रहणाचा मोबदला देय असणे आवश्यक आहेच. वास्तविक पाहता अशा जमिनीचेही मूल्यनिर्धारण करून प्रकल्पबाधितांना मुआवजा आदा करणे न्याय्य ठरले असते.

या सर्व प्रकरणाचा एकच अर्थ निघतो व तो म्हणजे प्रस्तुत प्रकल्पपूर्ततेकरीता वर्तमान अधिग्रहणाच्या मोबदल्यात मध्यबिंदूपासून तीस मिटरपर्यंतच्या जमिनीवर प्रकल्प

विभागाने मोफत मालकीहक्क प्रस्थापित करणे होय. याचाच अर्थ प्रस्तुत प्रकल्पपूर्ततेमुळे प्रकल्पक्षेत्रातील जमिनींच्या मूल्य भांडवलीकरण प्रक्रियेमुळे वधारणाऱ्या किंमती व उपयोगितांपासून प्रकल्पबाधितांना प्रकल्प विभागाकडून वंचित ठेवणे होय.

भूसंपादन, पुनर्वसन व पुनरवसाहत कायदा-२०१३ प्रमाणे प्रत्येक सरकारी अथवा खाजगी व लोककल्याणकारी विकास प्रकल्पकामी करावयाच्या भूमिसंपादनाच्या कार्यात पारदर्शकता असणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्येक प्रकल्पाकामी करावयाच्या भूसंपादनाचे प्रकल्पबाधितांवरील परिणाम तपासणे आवश्यक असल्याने सापनि अहवाल तयार करून घेणे बंधनकारक झाले आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाची त्रयस्थ संस्था म्हणून राज्य शासनाने जुलै २०१६ मध्ये नेमणूक केली असल्याने अद्यापपर्यंत अर्थशास्त्र विभागाकडून अनेक विकास प्रकल्पकामी करावयाच्या जमिन संपादनावरील अभ्यासपूर्ण सापनि अहवाल तयार करण्यात येवून शासनाच्या संबंधित विभागांकडे त्या-त्या वेळी सुपूर्द करण्यात आले आहेत. यातील काही सापनि अहवालांचा आधार प्रकल्पबाधित जमिनमालकांनी (शेतकरी) आपल्यावरील शासकिय पुनर्वसनार्थ अन्याय दूर करण्यकरीता उच्च न्यायालयात तक्रारी दाखल करण्याकरीताचा पुरावा म्हणूनही घेतला आहे याची विशेष नोंद घेणे आवश्यक आहे.

प्रस्तुत सापनि अहवाल प्रामुख्याने प्राथमिक माहितीवर आधारित असून त्याकामी सापनि अभ्यासगटाने अनेकदा प्रकल्पस्थळी भेटी देवून प्रकल्पबाधीत जमिन मालकांशी संवाद साधला आहे. तसेच सर्व जमिन मालकांस प्रकल्पनिहाय एकत्रित बोलावून सघन समूह चर्चांचे (FGDs) आयोजन करण्यात आले होते. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागातील विविध अधिकाऱ्यांच्या कार्यालयासही भेटी देवून संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांकडून विकास प्रकल्पासंबंधित सर्व कागदपत्रे प्राप्त करून घेतली होती. त्याचप्रमाणे सर्व प्रकल्पगंस्ताबरोबरच्या सघन समूह चर्चा (FGDs) व सुनावणीचे आयोजन जोतिबा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभ्यागत निवास प्रांगणात, प्रत्यक्ष प्रकल्पक्षेत्र, वाडी रत्नागिरी प्रकल्पबाधितांच्या घरी व शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागात करण्यात

आले होते. यानंतरच्या टप्प्यात सर्व प्रकल्पग्रस्तांसाठी एक प्रश्नावली तयार करून प्रत्यक्ष प्रकल्पस्थळी जावून प्रकल्पग्रस्तांच्या मुलाखती घेवून प्रश्नावलीतच्या सहाय्याने प्राथमिक माहिती संकलित केली असल्याने प्रस्तुत सापनि अहवाल सत्यतेवर आधारित अशा गुणवत्तापूर्वक प्राथमिक व द्वितीय माहितीवर बेतला आहे. प्रस्तुत प्रकल्प अभ्यासाकरीता सापनि अभ्यासगटाने वाडी रत्नागिरी जोतिबा, सार्वजनिब बांधकाम विभाग कार्यालय इत्यादी ठिकाणी प्राथमिक माहिती संकलनकामी निम्नउर्ध्वृत दिवशी भेटी दिल्या आहेत.

| अ. क्र. | स्थळभेटीचा दिनांक |
|---|---|
| १ | दिनांक २५ ते २७ मार्च २०२० |
| २ | दिनांक ०९ ऑक्टोबर २०२० |
| ३ | दिनांक १३ ते २३ ऑक्टोबर २०२० |
| ४ | दिनांक ०१ ते ०५ डिसेंबर २०२० |
| ५ | दिनांक १९ ते २१ डिसेंबर २०२० |

उपरोल्लेखित कालखंडात सापनि अभ्यासगटाने प्रकल्पबाधित व प्रकल्प अधिकारी यांच्याशी विविध ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देवून अभ्यासाकरीता आवश्यक त्या सर्व गुणवत्तापूर्ण प्राथमिक व द्वितीय माहितीचे संकलन केले आहे. प्रस्तुत माहितीचे संकलनोपरांत पृथक्करण करून विश्लेषण केले असल्याने वास्तवाचा विचार करूनच प्रस्तुत सापनि अहवाल तयार करण्यात आला आहे. तसेच याव्यतिरिक्त काही प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी सापनि अभ्यासगटाशी वेगळेपणाने चर्चा करून आपले विशेष म्हणणे मांडले होते त्याच्याही नोंदी घेवून अहवालात योग्य त्या ठिकाणी अशा नोंदींचा वापर केला आहेच. याव्यतिरिक्त उर्वरित काही प्रकल्पबाधितांनी त्यांचे विशेष लेखी निवेदनेही अभ्यासगटास दिली असल्याने अशा लेखी निवेदनांचाही वापर अभ्यासगटाने सापनि अहवालची गुणवत्ता लक्षात घेवून केला आहे याचीही नोंद घेणे आवश्यक आहे.

# प्रकरण: २
# माहिती संकलन व अभ्यास कार्यपद्धती

## प्रास्ताविक:

प्रस्तुत सापनि अहवालाच्या प्रकरण क्रमांक एकमध्ये नमूद केल्याप्रमाणे पन्हाळा तालुक्यातील वाडी रत्नागिरी केर्ली जोतिबा हा जोतिबा डोंगरावरून सुरू होवून पुढे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चारला जावून मिळणाऱ्या उपरस्त्यास मिळणारा रस्ता असून त्याचे काम दिनांक २९/०१/२०१८ पासूनच्या शासन निर्णयाप्रमाणे सुरू



होवून पूर्ण झालेले आहे. प्रस्तुत रस्त्याचा एकूण खर्च नव्वद लक्ष रूपये प्रस्तावित असून रस्त्याचे कामही पूर्ण झाले आहे.  कारण प्रस्तुत रस्त्याच्या सर्व प्रकल्पबाधितांना त्यांना योग्य प्रकारे जमिन किंवा पुनर्वसन मोबदला मिळेल या सकारात्मक अपेक्षेने पुनर्वसन मोबदल्यापूर्वीच आपल्या जमिनी प्रकल्पाकरीता देवू केल्या आहेत. इतर अनेक प्रकल्पांच्या अनुभवाचा विचार केला तर प्रस्तुत प्रकल्पाच्या प्रकल्पबाधितांनी या प्रकल्पास विरोध करण्याऐवजी प्रकल्प विभागास सहकार्याची तयारी दर्शविली. परंतु प्रकल्प पूर्ण होवूनही या प्रकल्पबाधितांना अद्याप प्रकल्पबाधित जमिनीची नुकसान भरपाई मिळालेली नाही. पर्यायाने ‘‘प्रकल्प मात्र पूर्ण परंतु पुनर्वसनार्थ मोबदला मात्र अद्याप प्रलंबित’’ अशी स्थिती निर्माण झाली आहे. प्रस्तुत विलंबनाचे महत्त्वाचे कारण म्हणजे भूमि अधिग्रहणासंबंधी नव्हे परंतु अधिग्रहित जमिनीच्या मोबदल्यासंबंधी निर्माण झालेली समस्या होय. तसेच प्रकल्प विभाग पातळीवरील प्रशासकीय विलंबामुळे पुनर्वसन मोबदला निश्चित करून आदा करण्याचे काम रेंगाळले आहे. अशा प्रकारच्या

प्रकल्प विभाग निर्मित प्रमुख समस्या मार्गी लावण्यासाठी प्रस्तुत प्रकल्पाचा प्रकल्पपूर्णोपरांत सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास पूर्ण केला असून प्रस्तुत अभ्यास अहवाल प्रामुख्याने निम्नउर्ध्वृत उद्दिष्टपूर्तीवर निर्भर आहे. अर्थात प्रकल्पपूर्णोपरांत सापनि अभ्यास अहवाल तयार करण्याचे प्रस्तुत प्रकल्प हे कदाचित पहिलेच उदाहरण असावे.

## २.१: अभ्यासाची उद्दिष्टे:

प्रस्तुत सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल खाली नमूद केलेल्या उद्दिष्टांवर आधारित आहे.

- प्रकल्पाचा सामाजिक व आर्थिक परिणाम अभ्यासणे.
- प्रकल्पबाधीत व लाभधारकांवरील संभाव्य आर्थिक व सामाजिक परिणामांची चिकित्सा करणे.
- प्रकल्पबाधीत व लाभधारकांवरील संभाव्य संधी व व्यय तसेच त्याग या घटकांची चिकित्सा करणे.
- डिसेंबर २०१३ च्या भूमी अधिग्रहण, पुनर्वसन आणि पुनरनिवास तसेच प्रकल्पबाधीतांच्या अधिग्रहित जमिनींच्या मोबदल्याविषयीची चिकित्सा करणे.
- प्रकल्पबाधीत जमिनीच्या बदल्यात जमीन देवू करणे शक्य आहे काय याविषयीची पडताळणी करणे. अर्थात जमिन देणे शक्य नसेल तर प्रकल्पबाधनाच्या बदल्यात कसे मूल्य निर्धारण व्हावे याचा विचार करणे.
- प्रकल्पबाधीतांवरील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक परिणाम अभ्यासणे.
- भूमी अधिग्रहण व जमीन मोबदल्याविषयीचा आढावा घेणे.

## २.२: अभ्यास पद्धती:

वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांद्वारे माहितीचे संकलन, पृथक्करण व विश्लेषण करून प्रस्तुत सापनि अहवाल तयार करण्यात आला आहे.



जोतिबा देवस्थाननजिक राहणाऱ्या सर्व प्रकल्प प्रभावित कुटुंबाचा योग्य रचना केलेल्या मुलाखत अनुसूचीद्वारे अभ्यास केला. प्रकल्पबाधीत जमीन किंवा इतर हानी झाल्यास प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे प्रकल्पबाधीत झालेल्या कुटुंबावर त्याचा परिणाम शोधण्यासाठी संबंधित कुटुंबाचे प्रश्नावली व स्थळभेट आणि चर्चेद्वारा सर्वेक्षण करण्यात आले. त्यामुळे सापनि अहवाल सत्यतेच्या निकषांवर टिकून पुनर्वसनासाठी मार्गदर्शक ठरू शकतो. अर्थात प्रकल्पबाधितांना त्यांच्या प्रकल्पबाधित जमिनीचा मोबदला आदा करताना अहवालातील निरीक्षणांचा वापर करणे आवश्यक आहे.

## २.३: अभ्यासाची पूर्वपिठीका:

प्रस्तुत अभ्यासाकरीता प्रकल्पबाधीत कुटुंबाची भूमी अभिलेख व क्षेत्रीय तपासणीवर आधारित अचूकपणे सत्याधारित प्राथमिक माहिती संकलित केली आहे. प्रकल्पबाधीत क्षेत्राचा व कुटुंबाचा सामाजिक-आर्थिक



आणि सांस्कृतिक संदर्भ ओळखण्यासाठी अभ्यासगटाने प्रत्यक्ष क्षेत्रभेटीवर आधारित

खुल्या वातावरणात समूह चर्चा घडवून आणल्या. क्षेत्रभेटीद्वारा संकलित माहितीवर आणि प्रकल्पग्रस्तांबरोबर अधिकची सल्लामसलत करून प्रकल्पाच्या सकारात्मक व नकारात्मक सामाजिक व आर्थिक परिणामांची व्याप्ती आणि तीव्रतेचे मूल्यांकन केले आहे. अधिग्रहित जमिनीच्या मोबदल्याविषयी सापनि अभ्यासगटाने वास्तव आकलन व जाणकारी करून घेतली. तसेच सामाजिक प्रभाव व्यवस्थापन योजनेत समाविष्ट करण्यासाठी उपाय सुचविण्याचा प्रयत्न केला आहे. प्रकल्पाचा सामाजिक व आर्थिक व्यय आणि लाभ तसेच जमीन गमावणाऱ्या कुटुंबाच्या उत्पन्न घटीचा धोका आणि अशा प्रस्तावित प्रकल्पबाधीत कुटुंबास आदर्श जमीन मोबदल्याविषयी उभयपक्षी स्वीकारार्ह योजना तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. वाडी रत्नागिरी जोड रस्त्याच्या हद्दीतील सर्व प्रकल्पबाधीत कुटुंबासोबत प्रत्यक्षपणे निम्नउर्ध्वृत वेळापत्रकाप्रमाणे अनेकवेळा चर्चा आयोजित करण्यात आल्या होत्या.

| अ. क्र. | स्थळभेटीचा दिनांक |
|---|---|
| १ | दिनांक २५ ते २७ मार्च २०२० |
| २ | दिनांक ०९ ऑक्टोबर २०२० |
| ३ | दिनांक १३ ते २३ ऑक्टोबर २०२० |
| ४ | दिनांक ०१ ते ०५ डिसेंबर २०२० |
| ५ | दिनांक १९ ते २१ डिसेंबर २०२० |

प्रस्तुत चर्चा जोतिबा देवस्थान परिसरातील सार्वजनिक बांधकाम खात्याचे सरकारी विश्रामगृह व प्रत्यक्ष स्थळभेटीचेवेळी करण्यात आल्या. तसेच प्रकल्पाबाबतची अधिक माहिती प्रकल्प अधिकारी व गावातील जाणकार लोकांकडून जाणून घेण्याचा प्रयत्न केला. तसेच रस्त्याचा



विकास आराखडा व प्रकल्पाचे नकाशाचेही अवलोकन केले. या सर्व बैठकांत प्रकल्पबाधीत क्षेत्रातील सापनिचे (यानंतर सामाजिक परिणाम निर्धारण असे वाचावे) मुख्य निष्कर्ष तसेच अंतिम निष्कर्ष, अतिरिक्त माहिती आणि अंतिम सापनि अहवाल इत्यादी विषयावर विचार करण्याबाबत विचारविमर्ष केला गेला. प्रकल्पबाधीत कुटुंबाबरोबरच्या चर्चेचा तपशील (छायाचित्रे इत्यादी बाबी) सदर अहवालात (प्रस्तुत प्रकरणात) आवश्यक तेथे विश्लेषणासह सादर केले आहे. प्रामुख्याने छायाचित्रांचा समावेश प्रस्तुत प्रकरणात करण्यात आला आहे. कारण वाचकास प्रस्तुत प्रकरणातील माहिती संकलनाविषयीची जाणीव अधिक स्पष्टतेने होवू शकेल. तसेच सर्व प्राथमिक व द्वितीय माहितीच्या आधारे पृथक्करण करून सदर अहवाल तयार करण्यात आला असून सदर अहवालाच्या शेवटच्या प्रकरणात निष्कर्ष, अनुमान व पुनर्वसनार्थ उपशमन योजना सुचविली आहे. उपशमन योजना सुचविताना प्रस्तुत अभ्यास अहवालाच्या उद्दिष्टांचा क्रमवारीने उल्लेख करून त्याबरहुकूम उपशमन सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

## २.४: सामाजिक परिणाम अहवाल साधने आणि पद्धती:

### २.४.१: सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रिया:

प्रस्तुत सामाजिक परिणाम निर्धारण अहवालात वाडी रत्नागिरी व राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चारला जोडणारा उपमार्ग रस्त्याविषयीचा असून त्यामुळे प्रकल्पाबाबत अपेक्षित असलेला सकारात्मक व नकारात्मक बदल तसेच प्रकल्पाचा सामाजिक व आर्थिक परिणाम समजणे, मोजणे आणि त्याकरीता प्रकल्पबाधित व लाभधारकांशी संवाद साधने अत्यंत आवश्यक होते. सामाजिक व आर्थिक नुकसानीचे मोजमाप करण्यासाठी खालील अभ्यास पद्धतीचा अवलंब करण्यात आला. अपेक्षित, सुयोग्य, सत्याधारित व पृथक्करणक्षम प्राथमिक व द्वितीय माहिती संकलनाकरीता अभ्यासगटासमोर निम्न उध्र्वृत केलेले प्रमुख संशोधन प्रश्न होते;

१०. कुणाकडून कोणत्या घटकांविषयी माहिती संकलित करावी?

११. अपेक्षित माहिती संकलन कसे साध्य करावे?

१२. नेमकी कोणत्या प्रकारची माहिती संकलन करणे आवश्यक आहे?

१३. संबंधित माहिती संकलन सुयोग्य व अचूकपणे कसे करता येईल?

१४. संकलित माहितीच्या सहाय्याने अचूक प्रकल्प परिणाम कसे निश्चित केले जावू शकतात? किंवा तपासले जावू शकतात.

१५. प्रलंबित प्रकल्पाचे अचूक परिणाम दर्शविणारी माहिती म्हणजे नेमकी कोणती माहिती व आकडेवारी असू शकेल?

१६. संकलित माहितीचे पृथक्करण व विश्लेषण करण्याचा अचूक व सुयोग्य मार्ग अथवा पद्धती कोणत्या असू शकतात?

१७. प्रकल्पबाधीतांबरोबरील संवादातून नेमके काय साध्य होवू शकेल?

१८. संकलित माहिती व आकडेवारीतून निष्पन्न होणारे निष्कर्ष नेमके कोणत्या उद्दिष्टांची पूर्तता करू शकणारे असतील? .......इत्यादी

## २.५: सापनि अभ्यास पद्धतीतील टप्पे:

प्रस्तुत अभ्यासगटाने जोतिबा देवस्थानापासून सुरू होवून पुढे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चारच्या रस्त्यास जोडणाऱ्या रस्त्याच्या प्रकल्पासाठी सामाजिक परिणाम मूल्यांकनाची योजना आखत असताना सर्वेक्षण मनुष्यबळ निवड आणि प्रशिक्षणामध्ये गुणवत्ता वेळ खर्च केला आहे. सुरूवातीस सर्वेक्षणाचा हेतू, मूल्यांकन एकक, उपलब्ध वेळ, पुढील



कामाचे नियोजन आणि इतर संबंधित समस्यांबद्दल जाणून घेणे आवश्यक होते. तदनुषंगाने सापनि अभ्यासगटाने वाडी रत्नागिरी रस्त्याशी संबंधित बांधकाम अभियंता

तसेच कोल्हापूर उपविभागीय अधिकारी, इतर अधिकारी-कर्मचारी आणि महसूल व सार्वजनिक बांधकाम विभाग अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य तसेच प्रकल्पबाधित जमिनमालक यांच्यासोबत वेळोवेळी चर्चा व सल्लामसलत केली. अशी चर्चा केल्यानंतर लक्षात आले की संबंधित कायदे व नियमांनुसार सापनि प्रक्रियेत मूलभूतपणे तीन घटकांचा समावेश करणे अत्यावश्यक आहे. ते तीन घटक पुढीलप्रमाणे;

१. प्रकल्पबाधीतांवर नकारात्मक परिणाम होऊ शकतात अशा सामाजिक-आर्थिक परिस्थितीचे सविस्तर मूल्यांकन करण्याची आवश्यकता.

२. दुर्बल घटक जसे की महिला, मुले व वयस्क यांचेवर होणारा परिणाम आणि प्रकल्पबाधीत व स्थावर विस्थापन जसे की घर, वृक्षसंपदा, निवारा, जैवनैसर्गिक घटक पशुपक्षी आणि वनसंपदेचे तथा वृक्षसंपदेचे स्खलन व नाश इत्यादी परिणामांचा सविस्तर अभ्यास. आणि.....

३. तदनुषंगिक किमान अनिष्ट परिणामांसाठी सुयोग्य आर्थिक नुकसान भरपाई विषयक विस्तृत योजना सुचविणे.

## २.६: प्रकल्प प्रभाव क्षेत्राची पार्श्वभूमी:

प्रस्तुत जोडरस्ता जोतिबा देवस्थानापासून सुरू होवून पुढे मुख्य रस्त्यास जोडणारा असून प्रस्तुत रस्त्यास जोतिबा परिसरातील एकूण २९ खातेदार जमिनमालकांची व सार्वजनिक किंवा सरकारी ७/१२



उताऱ्यावर असलेली जमिन बाधित व पर्यायाने संबंधित जमीन अधिग्रहित होणार आहे. प्रस्तुत प्रकल्प पूर्ण झालेला असल्याने जमिनीचे अधिग्रहणही पूर्ण झालेले आहे याची नोंद घेणे आवश्यक आहे. परंतु संबंधित प्रकल्पबाधन क्षेत्रात लोकवस्ती मात्र अबाधित

राहते त्यामुळे निवासी पुनर्वसनाचा प्रश्न उद्भवत नाही. वास्तव स्थितीच्या अवलोकनासाठी प्रारंभिक क्षेत्रभेट आयोजित केली आणि क्षेत्र सर्वेक्षण करून अभ्यासगटाने क्षेत्रे, झाडे, सामाजिक व आर्थिक आणि सांस्कृतिक मूलभूत संरचना आणि लोकवस्तीच्या भौगोलिक मर्यादांची चांगल्या प्रकारे माहिती करून घेतली आहे.

## २.६.१: बहुविध स्त्रोत माहिती संकलन:

यानंतरच्या टप्प्यात सापनि अभ्यासगटाने तालुका पन्हाळा (कोल्हापूर) उपविभागीय अधिकारी कार्यालय व महसूल विभागाकडून आणि सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयातून प्रस्तुत प्रकल्पासाठी अधिग्रहित करू इच्छित असलेल्या किंबहुना यापूर्वीच अधिग्रहित झालेल्या जमिनीची माहिती संकलित केली. एकत्रित केलेल्या आकडेवारीची पडताळणी करून प्रकल्पाशी निगडित आवश्यक त्या सर्व माहितीचा आढावा घेतला. प्रस्तुत सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल तयार करण्यासाठी उपरोल्लेखित



प्रकल्पबाधित जमिन मालकांची किती जमीन प्रकल्पबाधीत होते व प्रस्तुत अधिग्रहित जमिनीच्या मोबदल्यात कशा प्रकारे सुयोग्य मोबदला देता येईल याकरीताचे अवलोकन करण्याचा प्रयत्न केला. तसेच लाभार्थी कुटुंबाचा प्राथमिक सांख्यिकीय व सामाजिक आढावा घेतला. तसेच प्रस्तुत प्रकल्पबाधित कुटुंबाचे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक आकलन करून घेवून कुटुंबाविषयी इतर सर्व बाबी जाणून घेतल्या. अन्य माहिती संकलन कामी दुय्यम स्त्रोत माहितीचा वापर करण्यात आला. तसेच प्रकल्पबाधित व प्रकल्प लाभधारक अशा दोन्ही

प्रकारच्या मूलभूत सुविधांविषयीही सर्वेक्षण तथा निरीक्षण करून प्रकल्प, व्यय व लाभविषयक तसेच प्रकल्प आवश्यकतेचे आकलन करून घेण्याचा प्रयत्न केला.



### २.६.२: प्रकल्पबाधीत, प्रतिगामी–अवगामी भागधारक आणि नियंत्रण समूह:

सापनि अभ्यासगटाने उपरोल्लेखित प्रकल्पबाधीत जमिन मालक आणि प्रतिगामी – अवगामी भागधारक इत्यादी घटकांकडून माहिती संकलित करण्यासाठी संरचित प्रश्नावली व मुक्तसंवाद, समूहसंवाद इत्यादी तंत्रांचा अवलंब केला. प्रकल्प प्रभावित कुटुंबाच्या सहभागाचा एक भाग म्हणून सघन समूहचर्चेच्या (FGDs) माध्यमातून उपरोल्लेखित घटकांचा समावेश करण्यात आला. प्रस्तुत रस्ता जोतिबा डोंगरापासून सुरू



होवून तसेच त्यानंतरच्या काही गावांना वळसा घालून मार्गिक होवून पुढे मुख्य राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार रस्त्यास जोडणाऱ्या या रस्त्याचे काम २०१८ पासून अपेक्षित होते. अर्थात आता प्रस्तुत रस्त्याचे काम पूर्ण झालेले आहे. कारण सर्व प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी त्यांना योग्य मोबदला मिळेल या अपेक्षेने आपली जमिन पुरनर्वसनापूर्वीच देवू केली

असल्याने हे शक्य झाले आहे. प्रलंबनाची मुख्य कारणे प्रकल्पबाधीत कुटुंबाकडून करावयाचे भूसंपादन आणि संपादित जमिनीचा मोबदला असेच मर्यादित असताना आमच्या असे इतर अनेक प्रकल्पांबाबत लक्षात आले. परंतु येथे मात्र तसे नाही. तसेच



प्रकल्पबाधितांना विश्वासात घेवून त्यांच्या प्रकल्पबाधित जमिनीच्या मोबदल्यात योग्य मूल्य ठरविणे आवश्यक असल्याने प्रस्तुत रस्त्याकरीता आवश्यक जमिनीच्या मोबदल्याची व्यवस्था होण्याच्या दृष्टीने प्रश्नावली तयार करताना प्रश्नांची विचारपूर्वक योजना केली गेली. प्रकल्प गेली काही वर्षे अर्थात २०१८ पासून अपेक्षित असल्याने प्रकल्पबाधीत व संभाव्य प्रकल्प लाभधारक अशा दोन्ही समूहांचे आर्थिक व सामाजिक नुकसान होवू शकले असते. परंतु उपरोल्लेख केल्याप्रमाणे प्रकल्पाबधितांनी प्रकल्प पुनर्वसनापूर्वीच आपली जमिन देवू केल्याने तसे झाले नाही. त्यामुळे मुख्यत्वे प्रस्तुत प्रकल्पाचे संभाव्य लाभ तपासणे असे होते. तसेच डिसेंबर २०१३ च्या अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास कायद्यान्वये प्रकल्पबाधीतांना त्यांच्या अधिग्रहित जमिनीच्या मोबदल्यात सुयोग्य आर्थिक भरपाई देणेविषयी अभ्यासांती सूचना करणे गरजेचे असल्याने आम्ही प्रस्तुत अभ्यास काटेकोरपणे करण्याचा प्रयत्न केला आहे. संकलित करावयाची प्राथमिक माहिती अचूक, विश्वासार्ह, पृथक्करणक्षम व पर्याप्त असणे अत्यंत आवश्यक होते. तसेच प्राथमिक माहितीद्वारा प्रकल्पबाधीत कुटुंबाचे एकूणच तुलनात्मक कृषी संबंधाचे (Agrarian Relations) किंवा व्यापारी जमिनीच्या संदर्भात मूल्य व भांडवली तोट्याचे आकलन होणेही आवश्यक होते. प्रत्यक्ष क्षेत्र पाहणी करताना असे निदर्शनास आले की, प्रस्तुत प्रकल्पबाधीत एकूण २९ खातेदार असून यापैकी वैयक्तिक

कुटुंबांचा उदरनिर्वाह निवृत्तीवेतन, वेतन, व्यवसाय तसेच शेती उत्पन्नावर निर्भर आहे. पर्यायाने सापनि अभ्यासगटाने कुटुंबाचे सर्वेक्षण (Household Survey) करण्याचे निश्चित केले. म्हणजेच सर्वेक्षणादरम्यान प्रस्तुत कुटुंबांबरोबर विस्तृत चर्चा करून प्रश्नावलीच्या माध्यमातूनही या सर्व



कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले. तसेच मुलाखतीदरम्यान प्रकल्पबाधितांबरोबर प्रकल्पक्षेत्राचा पायी दौरा/पाहणी करून प्रकल्प काम, अधिग्रहण व प्रकल्पाचे फायदे तोटे समजावून घेतले. असे करताना आम्हास उपरोल्लेखित प्रकल्पबाधीत कुटुंबातील



सर्व व्यक्ती तसेच कुटुंबप्रमुखांस प्रत्यक्ष भेटणे शक्य झाले. अशा प्रकारे प्रकल्पबाधीत कुटुंबाचे सर्वेक्षण पूर्ण होवू शकल्याने आम्ही त्यास जनगणना सर्वेक्षण असे संबोधले आहे. प्रस्तुत प्रकल्पबाधीत कुटुंबाचे सखोल सर्वेक्षण तर झालेच परंतु प्रस्तुत कुटुंबांची एकंदरीतच

सामाजिक व आर्थिक स्थिती लक्षात आली. अशा प्रकारे प्रकल्पबाधीत कुटुंबाचे प्रस्तुत अभ्यास अहवालाकरीता प्रत्यक्षपणे घरी जावून सर्वेक्षणाचे काम पूर्ण केले आहे. प्रस्तुत सर्वेक्षणातून प्राप्त प्राथमिक माहितीचे पृथक्करण व विश्लेषण करून अहवालात आवश्यक त्या ठिकाणी सविस्तरपणे निष्कर्ष मांडले आहेत. प्राथमिक माहिती संकलन सर्वेक्षणात अधिकाधिकच नव्हे तर कुटुंबाच्या सर्वच माहितीचा समावेश करू शकल्याने प्रस्तुत अहवाल सत्यतेच्या महत्तम निकषांवर उतरणारा आहे असा युक्तिवाद सापनि अभ्यासगटामार्फत केला जावू शकतो.

## २.६.३: विशेष समूह चर्चा (Focused Group Discussions):

प्रश्नावलीच्या माध्यमातून संकलित प्राथमिक माहितीव्यतिरिक्त प्रकल्प कार्यस्थळी व जोतिबा येथील सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अभ्यागत निवासाच्या प्रांगणात सर्व प्रकल्पबाधितांबरोबर सखोल व मनमोकळ्या वातावरणात चर्चा घडवून आणल्या. त्याचा तपशिल निम्नउर्ध्वृतप्रमाणे वेळापत्रकामध्ये दर्शविला आहे.

| अ. क्र. | स्थळभेटीचा दिनांक |
|---|---|
| १ | दिनांक २५ ते २७ मार्च २०२० |
| २ | दिनांक ०९ ऑक्टोबर २०२० |
| ३ | दिनांक १३ ते २३ ऑक्टोबर २०२० |
| ४ | दिनांक ०१ ते ०५ डिसेंबर २०२० |
| ५ | दिनांक १९ ते २१ डिसेंबर २०२० |

उपरोल्लेखित सारणीत नमूद तारखांदरम्यान सापनि अभ्यासगटाने प्रकल्पबाधीत कुटुंब व प्रकल्प लाभधारक लोकांची अनेकदा प्रत्यक्ष भेट घेवून प्रकल्पबाधीतांबरोबर विशेष समूह चर्चा (FGDs) घडवून आणल्या. यामुळे प्राथमिक सर्वेक्षणातून प्राप्त माहितीचे अधिक आकलन होण्यास मदत झाली. तसेच प्राथमिक माहिती अधोरेखितही होवू शकली. तसेच सर्वेक्षणप्राप्त प्राथमिक माहितीचे पृथक्करण व विश्लेषण अधिक अचूक पद्धतीने होवू शकले आणि विश्लेषणास वास्तवाचा आधार मिळू शकला. कारण सर्वेक्षण

व चर्चेच्या काळात सापनि अभ्यासगटाने वाडी रत्नागिरी जोतिबा परिसरातील सर्व प्रकल्पलाभधारक व प्रकल्पबाधितांच्या भेटी घेवून प्रकल्पाचे लाभ तसेच प्रकल्प अधिग्रहित जमिनींची प्रत्यक्षपणे पाहणी करण्याचे काम पूर्ण केले. कारण डिसेंबर २०१३ च्या ''भूमि अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास'' कायद्यान्वये प्रकल्पबाधीतांना त्यांच्या जमिनीच्या मोबदल्यात जमिन, वसाहत पुनर्वसन किंवा निवास पुनर्वसनार्थ जमिन देणे शक्य नसेल तर जमिनीचा रेडीरेकनर दर किंवा बाजार किंमत यापैकी जे अधिक असेल त्याच्या चारपट मोबदला देय आहे.



क्षेत्रभेटी तसेच जोतिबा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अभ्यागत निवास प्रांगणातील बैठकींव्यतिरिक्त सदर कुटुंबप्रमुखांबरोबर शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागप्रमुख तथा सापनि अभ्यासगट प्रमुखांच्या कार्यालयातही बैठक आयोजित केली होती. या बैठकीतूनही प्रस्तुत प्रकल्पाविषयी अनेक महत्त्वपूर्ण घटकांचे आकलन होवू शकले. तसेच सापनि अभ्यासगटाबरोबरील चर्चा, प्रश्नावली भरताना झालेल्या चर्चा व प्रकल्पस्थळभेटीव्यतिरिक्त यापैकी अनेक प्रकल्पबाधितांनी सापनि अभ्यासगटाबरोबर स्वतंत्रपणे बैठकीत चर्चा केल्या. तसेच आपली लिखित निवेदनेही सादर केली आहेत.

प्रस्तुत सापनि अहवाल तयार करताना या सर्व माहितीचा वापर करून प्रस्तुत सापनि अहवाल अचूक व उपयुक्त कसा होईल याकडे काळजीपूर्वक लक्ष दिले गेले आहे.





# प्रकरण: ३
# रस्ते, महामार्ग, पायाभूत सुविधा व भूसंपादन विषयक विवेचन

पूर्वीच्या काळी भारतीय ग्रामीण समाजात शहरी निवासविषयी फारशी आस्था नव्हती. भारतातील शहरीकरणाचा विस्तार, विकास व लोकांची शहरीकरणाविषयीची ओढ हा गेल्या आठ दशकात विकास पावलेला दृष्टिकोन आहे (Janaki Nair, 2015)[१]. यामुळेच सिंगापूरला आशियाची पहिली आधुनिक शहरी संस्कृती संबोधले गेले. शहरीकरणाच्या विस्तार व विकासाने लोकांच्या आधुनिक आशाआकाक्षांना एक प्रकारे वृद्धिंगत करण्याच्या कामी भूमिका बजावली (Burte 2014, Dutton 2015)[२],[३]. अलिकडच्या काळात शहरीकरणाबरोबर ज्या पायाभूत सुविधांच्या विस्ताराची निकड भासू लागली त्या प्रमाणात गुंतवणूकही वाढत गेली. जुन्या लहान अथवा मध्यम शहरांचे रूपांतर मोठ्या महानगरात होवू लागले. याचे मुख्य कारण म्हणजे बदलत्या आर्थिक विकासाच्या गतीमुळे शहरी भागात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. पर्यायाने मोठ्या प्रमाणात ग्रामीण-शहरी स्थलांतर झाल्यामुळे शहरांच्या आजूबाजूच्या उपनगरांची निर्मिती आणि त्याबरोबरच झालेल्या औद्योगिक व सेवाक्षेत्राच्या विस्तारामुळे दळणवळणाच्या साधनांचा प्रचंड विस्तार होवू लागला. पर्यायाने पायाभूत सुविधांची एकंदरीत व्याख्याच बदलून गेली. वेगवान दळणवळणाची निकड भासल्यामुळे वाहतूकीची साधने जशी विकसित होत गेली तसे रस्ते आणि इतर प्रकारच्या वाहतूकीचे व दळणवळणाचे जाळेही विस्तारत गेले. या सर्व पार्श्वभूमीतून रस्ते, महामार्ग, रेल्वे व विमानतळांसाठी प्रचंड मोठ्या प्रमाणात जमिनींची आवश्यकता भासू लागली. यातूनच

---

[1] *Janaki Nair (2015), Indian Urbanism and the Terrain of the Law, Economic and Political Weekly, September 5, 2015, pp. 54-63.*

[2] *Burte, Himanshu (2014), The Smart City card, Economic and Political Weekly, Vol. XXXXI, No. XXXXVI, pp. 23-25.*

[3] *Dutta, Ayona (2015), New Urban Utopias of Post-Colonial India, Entrepreneurial Urbanization in Dholera Smart City, Gujarat, Dialogues in Geography, Vol. V(I), pp.03-22.*

कधी नव्हे ते शेकडो हजारो कोटी रूपये खर्चाचे महामार्ग, रेल्वेमार्ग व विमानतळे निर्माण करण्याच्या विचारांना मूर्त रूप प्राप्त होवू लागले. या कामांच्या पूर्ततेकरीता भांडवल व जमिनीचा प्रश्न महत्त्वाचा वाटला आणि यातूनच जमिनीला आधुनिक काळात भांडवलाचे स्वरूप प्राप्त झाले (Dhanmanjiri Sathe 2015)[४].

आर्थिक उदारीकरणाच्या काळात विकासासाठी चक्रे वेगाने फिरू लागली तशी भांडवल गुंतवणूक आणि त्याकरीता भूमी अधिग्रहणाची प्रक्रियाही वेगाने सुरू झाली. भारतात जमीन अधिग्रहणाचे प्रमुख तीन टप्पे पडतात. पहिला टप्पा ब्रिटिशकालीन भारतात जे विविध प्रकल्प सुरू झाले त्यावेळचे भूमी अधिग्रहण महत्त्वाचे ठरते. यामध्ये प्रामुख्याने धरणे व नवशहरांचा समावेश करावा लागेल. परंतु जमीन अधिग्रहणाच्या प्रत्येक टप्प्यावर शेतकऱ्यांना दोष देण्याची विकृत प्रवृत्ती दिसून आली. असा आरोप झाला की शेतकरी विकास प्रक्रियेत सहभागी होवू इच्छित नाहीत व पर्यायाने दारिद्र्यात राहतात (Hatekar 2003)[५]. भारतात जमीन अधिग्रहणाचा दुसरा टप्पा म्हणून संबोधले जाते तो म्हणजे हरितक्रांतीचा. या काळात मोठमोठ्या सिंचन प्रकल्पांकरीता प्रचंड प्रमाणात जमिनीचे अधिग्रहण झाले. तसेच भारतीय शेतकऱ्यांनी याकरीता आपल्या जमिनी देवून हा आरोपही चुकीचा आहे हे सिद्ध केले (Subramaniam, C. 1979)[६]. कारण प्रत्येक प्रकल्पाकरीता शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी देवू केल्या किंवा तसे करणे त्यांना भाग पडले. यानंतरचा जमीन अधिग्रहणाचा प्रमुख टप्पा म्हणजे १९९१ च्या आर्थिक उदारीकरणानंतरचा कालखंड होय. उदारीकरणोपरांत गेल्या तीन दशकांच्या काळात जमीन अधिग्रहणाचे स्वरूप व आवश्यकता यात प्रचंड बदल व वाढ झाल्याचे दिसून यते. या काळात वेगाने वाढणारे शहरीकरण, उपनगरांचा विसतार व रोजगार संधींचे

---

[4] *Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Need for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, pp. 52-58.*

[5] *Hatekar, N. (2003), Farmers and Markets in Pre Colonial Deccan: The Plausibility of Economic Growth in Traditional Society, Post and Present, No. 178, pp. 116-147.*

[6] *Subramaniam, C. (1979), The New Strategy in Indian Agriculture: The First Decade and After, New Delhi, Vikas Publishing House.*

शहरीकरण पर्यायाने ग्रामीण–शहरी स्थलांतर या सर्व घटकांतून निर्माण झाली ती म्हणजे पायाभूत व दळणवळणाच्या क्षेत्रात प्रचंड गुंतवणूक व जमीन अधिग्रहणाची आवश्यकता होय. परंतु या काळात मात्र अगोदरच्या दोन टप्प्यांवरील जमीन अधिग्रहणाप्रमाणे अत्यल्प मोबदला अथवा काही प्रमाणात सक्तीने जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया राबविणे शक्य होणार नाही हे सरकार व ज्या खाजगी क्षेत्राच्या वतीने सरकार हे काम करत असे अशा खाजगी क्षेत्राचीही खात्री पटली (Dhanmanjiri Sathe 2016)[७]. याची प्रचिती खाजगी औद्योगिक क्षेत्र व लोकनियुक्त लोकशाही सरकारलाही आली. या काळात जमीन अधिग्रहणावरून भारत तसेच इतर आशियायी देश व आफ्रिकी देशांतही अनेक तंटे उद्‌भवले (Cao et.al. 2008, FAO 2009)[८, ९]. भारतातील प्रमुख उदाहरणात पश्चिम बंगालमधील नंदिग्राम, सिंगूर (Maitreesh Ghatak et.al. 2010)[१०] आणि महाराष्ट्रातील नवी मुंबईचा महा मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र व गोवा विशेष आर्थिक क्षेत्र (Dhanmanjiri Sathe 2016)[११] इत्यादींचा समावेश करावा लागेल. नंदिग्राम सिंगूर जमीन अधिग्रहण प्रकरणामुळे तर पश्चिम बंगालचे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे तीस वर्षांचे सरकार त्यानंतरच्या सार्वजनिक निवडणुकीत पडले. नागरीकरण, रस्ते, महामार्ग, उपनगरे व औद्योगिकीकरणाकरीता आर्थिक उदारीकरणानंतर जी मोठी जमीन अधिग्रहणे घडून आली त्यास उत्तरप्रदेशमधील नोयडा, कर्नाटकातील म्हैसूर–बेंगलोर कॉरीडॉर, महाराष्ट्रातील अनेक विमानतळे, तामिळनाडूमधील मद्रास शहरातील आडियारचे विशेष

[7] *Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Need for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, pp. 52-58.*

[8] *Cao, Guangzhong, Changchun Feng, Ran Tao (2008), Local Land Finance in China's Urban Expansion: Challenges and Solutions, China and World Economy, 16(2), 19-30.*

[9] *FAO (2009), Land Grab and Development Opportunities? Agricultural Investments and International land Deals in Africa, FAO-IFAD Report.*

[10] *Ghatak, Maitreesh and Parikshit Ghosh (2011), The Land Acquisition Bill: A Critique and a Proposal, Economic and Political Weekly, October 8, 2011, Vol. XLVI, No. XXXXI.*

[11] *Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Need for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, pp. 52-58.*

आर्थिक क्षेत्र इत्यादींचा उल्लेख करता येवू शकतो. तुलनात्मक विचार केला तर आंध्रप्रदेश, हरियाणा, कर्नाटक, तामिळनाडू व गुजरात इत्यादी राज्यात जमीन अधिग्रहणास शेतकऱ्यांचा फारसा विरोध झाला नाही असे दिसून येते (Jenkin, Kennedy and Mukhopadhyay 2014)[१२]. परंतु ओरीसा, पश्चिम बंगाल इत्यादी राज्यांत मात्र जमीन अधिग्रहण ही निश्चितच सोपी बाब नाही असे परिस्थितीजन्यतेवरून सिद्ध झाले आहे. शेतकऱ्यांचा जमीन अधिग्रहणास विरोध आहे असे अगदी सर्वदूर सत्य मानने निश्चितच चुकीचे आहे. कारण शेतकरी जर त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला मिळणार असेल व त्यांचे योग्य पुनर्वसन होणार असेल तर प्रकल्पाकरीता निश्चितपणे जमीन देण्यास तयार असतात. अर्थात राष्ट्रीय नमुना पाहणी (NSSO 2005)[१३] २००५ च्या अहवालानुसार एकूण ४० टक्के शेतकऱ्यांना शेती व्यवसाय नकोसा झालेला आहेच. या प्रमाणात नंतरच्या काळात वाढसुद्धा झाली असणार (Dhanmanjiri Sathe 2016)[१४]. याचे प्रमुख कारण कृषी क्षेत्रावरील संकटात सापडते. अशावेळी शेतकऱ्यांना जर जमिनीच्या मोबदल्यात योग्य रक्कम अथवा पर्यायी जमीन आणि रोजगाराच्या संधी निर्माण करून दिल्या तर ते निश्चितपणे आपली शेतजमीन देण्यास तयार होतात असेही दिसून आले आहे. अर्थात चीन व मेक्सिको सरकारांनी गेल्या दोन दशकात ज्याप्रमाणे सात कोटी शेतकऱ्यांना आपल्या जमिनींचा सक्तीने त्याग करणे भाग पाडले अशा प्रकारचे औद्योगिकीकरण व आर्थिक विकासाचे प्रमेय भारतात राबवणे शक्य नाही. आंध्र प्रदेशच्या तेलंगणा व आंध्र प्रदेश अशा विभाजनानंतर अमरावती या ठिकाणच्या जमिनी आंध्र प्रदेशची नवीन राजधानी निर्माण करण्यासाठी सरकारने अधिग्रहित केल्या. अधिग्रहित जमिनींच्या मोबदल्याव्यतिरिक्त ३०

---

[12] *Jenkins, R. L. Kennedy and Mukhopadhyay (Eds) (2014), Power, Policy and Protest: The Politics of India's Special Economic Zones, New Delhi, Oxford University Press.*

[13] Govt of India (2005), National Sample Survey Organization, New Delhi

[14] *Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Need for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, pp. 52-58.*

टक्के विकसित जमीन मूळ मालकांना परत देण्याचे धोरण अवलंबिले. तसेच प्रती एकर जमिनीकरीता दरवर्षी रूपये पन्नास हजार असे दहा वर्षाकरीता देवू केले की त्यामुळे अधिग्रहण मोबदल्याव्यतिरिक्त शेतकऱ्यांचे अधिग्रहित जमिनीतून मिळणारे उत्पन्नही सुरू राहू शकेल. कोणत्याही प्रकल्पाकरीता जमीन अधिग्रहणास शेतकऱ्यांचा जो विरोध असतो त्याचे प्रमुख कारण म्हणजे नवीन प्रकल्पातील एकूण भांडवली गुंतवणूकीत न्यूनतम जमिनीचे मूल्य (सन २००४ मध्ये केवळ १.८ टक्के एवढेच होते. सन २००८ मध्ये त्यात वाढ होवून २.९ टक्के इतके झाले) (Kakani R. K., T. L. Ranga Ran and Tigga and Nutan Singh 2008)[१५]. अशा प्रकारच्या न्यून मूल्य धोरणामुळे शेतकऱ्यांचा जमिन अधिग्रहणास विरोध असतो हे प्रामुख्याने समजून घेणे आवश्यक आहे. जमीन अधिग्रहणास शेतकऱ्यांचा विरोध असण्याचे आणखी महत्त्वाचे कारण म्हणजे संबंधित व त्या आजूबाजूच्या जमिनींचे प्रकल्पोपरांत होणारे मूल्य भांडवलीकरण होय (Value Capitalization). कारण जमीन अधिग्रहण करताना जरी संबंधित जमिनीची किंमत कमी असली तरी प्रकल्पपूर्तीनंतर त्या जमिनीच्या व आजूबाजूच्या जमिनींच्या किंमती अनेकपट वाढतात. आणि अशा जमीन मूल्य भांडवलीकरणाचा फायदा मूळ जमीन मालकास मात्र होत नाही.

## ३.१: महामार्ग प्रकल्प कामी प्रसंगी अतिरिक्त जमीन अधिग्रहण:

अनेक रस्ते किंवा महामार्गांची लांबी शेकडो किलोमिटर व रूंदीही प्रचंड असते. पर्यायाने हजारो एकर जमिनीची आवश्यकता भासते. कारण असे महामार्ग अनेक जिल्हे अथवा प्रसंगी विविध राज्यांना जोडणारे तसेच अनेक पदरी वाहतुकीची क्षमता असणारे असतात. देशातील याची प्रमुख उदाहरणे म्हणजे कर्नाटकातील म्हैसूर-बेंगलोर कॉरीडॉर, महाराष्ट्रातील पुणे-मुंबई एक्सप्रेस महामार्ग, मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग इत्यादी आहेत. विशेष म्हणजे अशा महामार्ग प्रकल्पांकरीता अधिग्रहित करावयाच्या जमिनीत

[15] *Kakani, R. K., T. L Ranga Ran and Tigga and Nutan Singh (2008), Insights into Land Acquisition Experiences of Private Business in India, Working Paper 08-11, Jamshedpur, XLRI School of Business and Human Resources.*

नवशहरे, उपनगरे व इतर सुविधांकरीताच्या जमीन अधिग्रहणाचाही समावेश केला जातो. उदाहरणार्थ मुंबई–नागपूरला जोडणारा समृद्धी महामार्ग एकूण ७०० किलोमिटर लांबीचा असून त्याकरीता लागणारी एकूण जमिनीची आवश्यकता ८४०० हेक्टर इतकी आहे (१२००० एकर). तर महामार्गालगत विकसित करावयाच्या सोयीसुविधा व पायाभूत सुविधांकरीता अधिक १६०० हेक्टर (४००० एकर) इतकी जमीन अधिग्रहित केली जाणार आहे. म्हणजेच प्रस्तुत प्रकल्पाची एकूण जमीन आवश्यकता दहा हजार हेक्टर म्हणजे पंचवीस हजार एकर इतकी प्रचंड आहे. अशा प्रचंड आवश्यकतेमुळे प्रकल्पपूर्तीस विलंब होवून मूळचा प्रकल्पव्यय ४६,००० कोटी रूपये वरून ५६,००० कोटी रूपये इतका वाढला आहे. कर्नाटकातील म्हैसूर-बेंगलोर कॉरीडॉरसाठीही एकूण ६९९९ हेक्टर (१७४९७.५ एकर) इतक्या जमिनीची आवश्यकता होती. परंतु रस्ता बांधकामाव्यतिरिक्त इतर सुविधा निर्माण करण्याचेही नियोजन केले गेले व एकूण जमिनीची आवश्यकता वाढली (Janaki Nair 2015)[१६]. अशा प्रकारच्या अतिरिक्त अधिग्रहणास शेतकऱ्यांचा विरोध असतो. कारण या अतिरिक्त सोयीसुविधा व नवीन शहरीकरणाचा व्यापारी लाभ मात्र प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना मिळत नाही. तसेच उपरोल्लेख केल्याप्रमाणे प्रकल्पोपरांत जमीन मूल्य भांडवलीकरणाच्या लाभापासूनही मूळ प्रकल्पबाधीत जमीन मालक वंचित राहतात. याकामी नव आंध्रप्रदेशचे अमरावती येथील राजधानी प्रमेय अधिक आवश्वासक व आदर्श ठरते.

## ३.२: सरकारकरीता धडा:

स्वातंत्र्यपूर्व ब्रिटिशकालीन अथवा स्वातंत्र्योत्तर पहिल्या टप्प्यात झालेल्या जमीन अधिग्रहणाप्रमाणे अत्यल्प किंमतीस जमीन अधिग्रहण करून प्रकल्पपूर्ती करणे शक्य राहिले नाही. किंबहुना काही प्रमाणात सक्ती करून भूमी अधिग्रहण केले तर लोकशाही राज्यव्यवस्थेत पश्चिम बंगालप्रमाणे तीस वर्षे सत्तेवर असलेले सरकारही निवडणुकीत

[16] *Janaki Nair (2015), India Urbanization and the Terrain of the Law, Economic and Political Weekly, September 5, 2015, PP. 54-63.*

हार खावून सत्ताच्यूत होवू शकते. परिणामे संबंधित राज्य सरकार व राजकीय पक्ष जमीन दलाल ठरण्याची शक्यता असते. म्हणूनच लोकशाही शासन व्यवस्थेत कोणत्याच राजकीय पक्षाला असे सक्तीचे अधिग्रहण धोरण अवलंबिणे शक्य नाही. किंबहुना गुजरातप्रमाणे शेतकऱ्यांकडून अधिक किंमतीस जमिनी अधिग्रहित करून उद्योजकांना कमी किंमतीत देवू करणे व झालेला तोटा राजकोषीय तरतुदीतून भरून काढण्याचेही धोरण काहीवेळा अवलंबिले जाते. यामुळे सर्वच राजकीय पक्ष व राज्य अथवा केंद्र सरकारांना आपण शेतकऱ्यांच्या बाजूचे आहोत हे सिद्ध करण्याची आवश्यकता निर्माण झाली. यातूनच २०१३ चा नवीन जमीन अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास कायद्याचा उदय झाला. या कायद्याला तेंव्हा विरोधी पक्षात असलेल्या सर्व पक्षांनीही पाठिंबा दिला होता. नंतर मात्र २०१४ मध्ये नवीन सरकारने कायदा बदलण्याचा प्रयत्न केला. परंतु ते शक्य झाले नाही. लोकसभेत पाठिंबा मिळू शकला नाही. पर्यायाने नोव्हेंबर २०१५ मध्ये बिहार विधानसभेची निवडणूक आल्याने केंद्र सरकारने ऑगस्ट २०१५ मध्ये आपला स्वत:चा अध्यादेश नैसर्गिकरित्या मृत होवून देण्याचे धोरण अंगिकारले.

एकंदरीत काय तर जमीन दलाल अशी भूमिका घेवून विकास धोरण राबविणे शक्य नाही. शेतकरी आपली जमीन प्रकल्पकामी देण्यास तयारही असतात. परंतु त्यांना योग्य तो मोबदला व रोजगाराच्या संधी देवून विकास प्रक्रियेत भागीदार करून घेणे आवश्यक आहे. आर्थिक सुधारणोपरांत तीन दशकांच्या काळात असे अनेक अनुभव आले. जमीन अधिग्रहण हा विकास प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक समोर आला. यातूनच २०१३ च्या नवीन अधिग्रहण कायद्याचा उदय झाला.

## ३.३: न्याय्य विस्थापन आणि पुनर्वसनाच्या दिशेने:

बहुउद्देशीय नदी प्रकल्प, विशेष आर्थिक क्षेत्रे, उपनगरे, रस्ते व महामार्ग, मेट्रो रेल्वे इतयादीकरीता मोठ्या प्रमाणात जमिनीची व पर्यायाने अधिग्रहणाची आवश्यकता भासते. त्यामुळे विस्थापन व पुनर्वसनाचे नियोजन ही एक मोठी समस्या बनली आहे. भूमी अधिग्रहणात फक्त शेतकऱ्यांच्या खाजगी मालकीच्या जमिनीचांच समावेश नसतो तर

केंद्र व राज्य सरकारच्या विविध विभागांच्याही जमिनींचे कित्येकदा अधिग्रहण करावे लागते. त्याकरीता प्रत्येक विभागाची उद्दिष्टे व जबाबदाऱ्या भिन्न असल्यामुळे एक विभाग दुसऱ्या विभागास प्रकल्पपूर्तीकामी आवश्यक भूमी अधिग्रहणाकरीता सहकार्य करेलच असे नाही. वन विभागाचे उदाहरण याबाबतीत महत्त्वाचे ठरते. इतर सरकारी विभागांच्या प्रकल्पपूर्तीकरीता जर वन विभागाची जमीन अधिग्रहित करावी लागणार असेल तर त्या बदल्यात इतर ठिकाणची म्हणजे प्रकल्प विभागाच्या अथवा राज्य सरकारच्या ताब्यातील वन जमिनीच वन विभागाला पर्याय म्हणून देवू कराव्या लागतात. स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिश व स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने जलसिंचन, औद्योगिकीकरण, शहरीकरण, संरक्षण विभाग, रेल्वे इत्यादीकरीता अनेकदा भूमी अधिग्रहण केले. परंतु मूळ मालक असलेल्या शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न बहुतांश प्रकल्पांच्या बाबतीत अनुत्तरीतच राहिला. अशा पूर्व अनुभवांमुळे आणि कृषी क्षेत्रासमोरील इतर समस्यांमुळे भारतात विविध शेतकरी चळवळी उभ्या राहून त्यांनी सरकारसमोर आपले म्हणणे मांडण्यास व प्रसंगी आंदोलनाची तयारी करण्यास प्रारंभ केला. यातूनच नंतरच्या काळात आदर्श पुनर्वसन व अधिग्रहण आणि अधिग्रहित जमिनीच्या मोबदल्याची समस्या अधिक तीव्र स्वरूप धारण करू लागली. प्रकल्पबाधीतांच्या रोजगार समस्येची जाणीव पूर्वी सरकारला नव्हती असेच काहीसे झाले. किंबहुना त्याबाबत एकदंरीतच प्रशासकीय अनास्था दिसून आली. त्यामुळे नंतरच्या प्रकल्पबाधीतांनी रोजगार, मोबदला, पुनर्वसन व समस्येकडे अंगुलीनिर्देश करून सरकारला विचार करण्यास भाग पाडले. अनेकदा तर जलसिंचन प्रकल्प आणि औद्योगिकरणाकरीता भूमी अधिग्रहण केलेल्या प्रकल्पबाधीतांना मूलभूत रोजगाराच्या संधी अथवा पर्यायी जमिनी न मिळाल्याने प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना स्थलांतर करून शहरी झोपडपट्टी व दारिद्र्याचे जीवन जगावे लागले. १९५७ साली पूर्ण केलेल्या कोयना धरणाच्या प्रकल्पबाधीतांचा अनुभव याबाबत अत्यंत विदारक आहे. कारण अद्यापही कोयना धरणग्रस्तांपैकी काहींचे पुनर्वसन बाकी आहे. पर्यायाने सरकारला न्याय्य विस्थापन व पुनर्वसन धोरणाचा मसुदा तयार करण्याची निकड भासली. साधारणपणे १९८० च्या दशकात भारत सरकारने सर्व

प्रकल्पबाधीतांच्या न्याय्य पुनर्वसनाकरीता विचार करणे सुरू केले. या विषयावर अनेकवेळा मंत्रीमंडळ व सार्वजनिक पातळीवर चर्चा झाल्या (Ramaswami Iyer 2007)[१७]. तसेच याकरीता मंत्रीगटाची स्थापना करून विचारविनिमय घडवून आणला (Ramaswami Iyer 2007)[१८]. तब्बल दोन दशके चर्चा व मसुदा आणि पुनर्मसुदा तयार करण्यात गेली. परंतु योग्य मार्ग निघू शकला नाही. पर्यायाने मसुदा तयार होण्यात दिरंगाई झाली. शेवटी ऑक्टोबर २००६ मध्ये ''राष्ट्रीय पुनर्वसन धोरण २००६'' चा मसुदा चर्चेकरीता समोर आला. त्यानंतर आलेल्या सूचनांची दखल घेवून भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने शेवटी राष्ट्रीय पुनर्वसन कायद्याचा मसुदा तयार करण्याचे काम हाती घेतले. यातूनच नंतर ''नॅशनल रिहॅबिलिटेशन अ‍ॅन्ड रिसेटलमेंट पॉलिसी २००७'' चा अंतिम मसुदा तयार झाला (Walter Fernandez 2004)[१९]. तद्नंतर पुढे ७ सप्टेंबर २०११ रोजी नवीन भूमी अधिग्रहण, पुनर्वसन आणि पुनर्निवास कायद्याचा मसुदा लोकसभेत मांडला गेला. एकूण २३५ सदस्यांपैकी २१६ सदस्यांनी मसुद्याच्या बाजूने तर १९ सदस्यांनी विरोधात मतदान केल्याने मसुदा एकमताने मंजूर झाला. दिनांक २९ ऑगस्ट २०१३ रोजी मसुदा लोकसभेत तर दिनांक ४ सप्टेंबर २०१३ रोजी राज्यसभेत पारित झाल्याने दिनांक २७ सप्टेंबर २०१३ रोजी राष्ट्रपतींनी त्यावर सही केली आणि दिनांक १ जानेवारी २०१४ रोजी कायदा अस्तित्वात येवून त्याची अंमलबजावणी सुरू झाली. प्रस्तुत कायदा पारित होवून प्रत्यक्ष अंमलात येईपर्यंत देशात सार्वजनिक अथवा सरकारला सामाजिक व आर्थिक दृष्टीने लोककल्याणकारी वाटणाऱ्या खाजगी व सार्वजनिक अशा दोन्ही प्रकारच्या प्रकल्पांकरीता ब्रिटिश पारीत १८९४ च्या कायद्याअंतर्गतच जमिनीचे अधिग्रहण करण्याची तरतूद अंमलात आणली जात असे.

---

[17] *Ramaswamy Iyer (2007), Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic and Political Weekly, July 28, 2007, pp. 3103.*

[18] *Ramaswamy Iyer (2007), Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic and Political Weekly, July 28, 2007, pp. 3103.*

[19] *Walter Fernandez (2004), Rehabilitation Policy for the Displaced, Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic and Political Weekly, March 20, 2004, pp. 1191.*

परंतु १८९४ च्या कायद्या अंतर्गत प्रकल्पबाधीतांच्या पुनर्वसनाची कोणतीही जबाबदारी सरकारवर असत नव्हती. कारण १८९४ च्या ब्रिटिश कायद्यात भूमी अधिग्रहित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व पुनरस्थैर्याच्या बाबतीत जबाबदारीचे उत्तरदायीत्व सरकारवर नव्हते. किंबहुना सरकारने असे उत्तरदायीत्व टाळले होते. परंतु अशा उत्तरदायीत्वाची जबाबदारी २०१३ च्या राष्ट्रीय पुनर्वसन धोरणामुळे व नवीन कायद्याने सरकारवर व पर्यायाने प्रकल्प विभागावर आली. इतकेच नव्हे तर या धोरणाअंतर्गत प्रकल्पबाधीतांना पुनर्वसनाबरोबरच योग्य मोबदला देण्याची जबाबदारी संबंधित राज्य अथवा केंद्र सरकारच्या प्रकल्प विभागावर देण्यात आली. तसेच या कायद्यामुळे भूमी अधिग्रहण आणि प्रकल्पबाधीत संसाधनांच्या मोबदल्याच्या बाबतीत पारदर्शकतेचा आग्रह धरण्यात आला हे विशेष.

प्रस्तुत कायद्यात विस्थापितांच्या पुनर्वसनाकरीता संबंधित प्रकल्प विभागाने मध्यस्थाची (Ambudsman) नेमणूक करणे बांधनकारक करण्यात आले. परंतु या कायद्याअंतर्गत प्रकल्पग्रस्तांना न्यायालयीन प्रक्रियेत जाण्याकरीता फारशी संधी उपलब्ध नसल्याने त्यांचे सरकारवरचे अवलंबित्व अधिक राहते. तथापि प्रस्तुत कायद्याच्या आधीन राहून महाराष्ट्र शासनाने भूमी अधिग्रहण व पुनर्वसनकामी सकारात्मक भूमिका घेवून प्रकल्प विस्थापितांना मोबदला व पुनर्वसन आणि पुनर्निवासाकरीता विशेष प्रयत्न करण्याचे आरंभिले नक्कीच. प्रकल्पग्रस्तांना मोबदला देताना जमिनीच्या वर्तमान बाजारमूल्याच्या चारपट किंमत व पुनर्निवासाकरीता भूखंड तसेच शक्य असेल तेथे प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीच्या मोबदल्यात जमीन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो हे विशेष.

कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड व आजरा तालुक्यातील एकूण दहा गावांना जोडून पुढे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७८ ला जोडणारा एकूण ३७ किलोमिटरचा रस्ता मौजे कडगांव येथील पूलबांधणीच्या जमीन संपादनातील अडचणीमुळे प्रलंबित आहे. संपादित करावयाच्या जमीन मालकास अद्याप कोणतीही लेखी सूचना न देता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडून केवळ तोंडी कल्पना देण्याची भूमिका

स्विकारल्यामुळे प्रकल्पबाधीत शेतकऱ्याच्या मनात संभ्रम निर्माण झाला असल्याचे दिसून आले. यापूर्वीच उल्लेख केल्याप्रमाणे प्रस्तावित अधिग्रहित जमिनीवरील प्रस्तुत प्रकल्पकामी होणारे हे सलग तिसरे अधिग्रहण असल्यामुळे प्रकल्पबाधीत शेतकरी कुटुंब अधिकच अडचणीत असल्याचे प्रकल्प स्थळभेटीवरून लक्षात आले आणि याकामी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची भूमिका असमाधानकारकच असल्याचे निष्पन्न होत आहे.

उपरोल्लेख केल्याप्रमाणे लाभक्षेत्रात सर्वांगिण संक्रमण होवून अपेक्षित विकासाच्या संधी दीर्घकाळ पुढे ढकलल्या जातात किंवा कायमस्वरूपी गमवाव्या लागतात. प्रकल्प दिरंगाईच्या समस्या व्ययवृद्धी अथवा विकास दिरंगाई इतक्याच सीमित नसतात तर अशा दिरंगाईमुळे प्रकल्पबाधीतांच्याही जीवन विकासात अडथळे निर्माण होतात. कारण अधिग्रहणाची घोषणा झाल्यानंतर संबंधित प्रकल्पबाधीतांची गुंतवणूक व कृषी सुधारणा क्षमता आपोआप कुंठीत होऊन संपुष्टात येते. सरकारवरही व्ययवृद्धीचा ताण येतो. इतकेच नव्हे तर यामुळे इतर प्रकल्पाकरीताच्या गुंतवणूकीवरही त्याचा दूरगामी परिणाम होतच असतो. या व इतर बाबी लक्षात घेवून प्रस्तुत प्रलंबित रस्ता-पूल प्रकल्पाचा सामाजिक परिणाम अभ्यास शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र विभागामार्फत पूर्ण केला असून अहवालात भविष्यातील अशा सर्व घटकांचा साकल्याने विचार व अभ्यास करून प्रस्तुत प्रकल्प अहवाल तयार करण्याचा प्रयत्न आमच्यामार्फत केला आहे.

# प्रकरण:४
# पन्हाळा तालुक्यातील केर्ली वाडी रत्नागिरी जोतिबा गिरोली रस्ता बांधकाम प्रकल्पग्रस्तांचा प्राथमिक अभ्यास व स्थलवास्तवाचे आकलन

## पार्श्वभूमी:


कोल्हापूर जिल्ह्याच्या पन्हाळा तालुकयातील जोतिबा डोंगरापासून केर्ली वाडी रत्नागिरी येथून सुरू होणारा सुधारित विकास आराखड्याप्रमाणे बाह्य वळण रस्ता बांधणे प्रस्तावित होते. त्याकामी एकूण २९ खाजगी व संस्थात्मक तथा सरकारी जमिनमालकांची जमिन अधिग्रहण करणे आवश्यक आहे. अर्थात रस्त्याचे काम पूर्ण झाले असल्याने प्रस्तुत प्रकल्पाचे जमिन अधिग्रहणही पूर्ण झाले आहे. कारण प्रस्तुत रस्त्याकरीता प्रकल्पबाधितांनी जमिन बिनशर्त देवू केल्याने अधिग्रहणाचे काम पूर्ण होवून प्रस्तुत रस्ता प्रकल्पही पूर्णपणे पूर्णत्वास गेला आहे. परंतु प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन मोबदले आदा करणे बाकी असल्याने तांत्रिकदृष्ट्या प्रस्तुत प्रकल्प अपूर्ण मानावा लागेल. सापनि अहवालाचे प्रस्तुत प्रकरण संबंधित प्रकल्पबाधितांच्या प्राथमिक माहितीवर बेतले असून या प्रकरणात प्रकल्पबाधितांशी संबंधित सर्व माहिती क्षेत्रभेटीवर आधारित आहे. या सर्व प्रकल्पबाधितांनी सार्वजनिक बांधकाम विभागास सहकार्य केल्याने आपल्या जमिनीची अधिग्रहण प्रक्रिया पूर्ण होवून दिली असून देय असलेली रक्कम आदा करावी अशी विनंती ते करत आहेत. प्रस्तुत प्रकल्पाचे काम २०१८ पासून प्रस्तावित असल्याने व ते पूर्णत्वासही गेले असल्याने प्रकल्पबाधितांना आपल्या प्रकल्पबाधित जमिनीवर स्वत:च्या मालकीचा व्यवसाय करणे अथवा जमिन व्यापारीदृष्ट्या विकसित करणे शक्य नाही. त्यामुळे हे सर्व प्रकल्पबाधित जमिनमालक कोल्हापूर सार्वजनिक बांधकाम विभागाने आपले जमिन शुल्क आदा करावे अशी विनंती करत आहेत. प्रस्तुत प्रकल्पाच्या सापनि अहवालाचे काम पूर्ण करण्याच्यादृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर कार्यालयाने शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाकडे तशी विनंती केल्यानंतर आम्ही प्रस्तुत सापनि अहवालाचे काम हाती घेवून पूर्ण केले आहे. प्रस्तुत प्रकल्पाच्या

प्रकल्पबाधितांस प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असल्याने आता प्रकल्पबाधितांस योग्य मोबदला मिळून न्याय मिळावा यादृष्टीने सापनि अहवालाचे काम आम्ही शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागामार्फत पूर्ण केले असून प्रस्तुत प्रकरणात या अहवाल अभ्यासकामी संकलित प्राथमिक माहितीच्या पृथक्करणाचा समावेश आहे. प्रस्तुत प्राथमिक माहिती प्राप्त करण्यासाठी सापनि अभ्यासगटाने प्रकल्पबाधित कुटुंबांना प्रत्यक्ष भेटी देवून पूर्वनियोजित प्रश्नावलीच्या माध्यमातून विश्वासार्ह माहिती प्राप्त करून घेतली आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात नमूद केलेली सर्व माहिती सत्यतेवर आधारित असल्याने प्रस्तुत सापनि अहवाल सत्यतेच्या निकषांवर सिद्ध होणारा आहे असा युक्तिवाद केला जावू शकतो.

**सारणी ४.१: प्रकल्पबाधितांचे गावातील वास्तव्यासंबंधीचे विवरण**

| अ. क्र. | प्रकल्पबाधितांचा गावातील वास्तव्य | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १ – ३ वर्षे | ० | ० |
| २ | ३– १० वर्षे | ० | ० |
| ३ | १० पेक्षा अधिक वर्षे | ८ | ० |
| ४ | पिढीजात | ११ | १०० |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





**सारणी ४.२: प्रकल्पबाधितांचे रेशनकार्ड धारण व प्रकारविषयक विवेचन**

| अ. क्र. | प्रकल्पबाधितांकडील दारिद्र्य कार्ड धारणाचे विवेचन | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | आहे | २ | १८.२ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | नाही | ९ | ८१.८ |
| **एकूण** | | ११ | १०० |


**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण




## सारणी ४.३: मनेरगा अंतर्गत प्रकल्पबाधितांची मजूर म्हणून नोंदणीचे विवेचन

| अ. क्र. | मनेरगा अंतर्गत प्रकल्पबाधितांची मजूर म्हणून नोंदणी | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | आहे | ११ | १०० |
| २ | नाही | ० | ० |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





## सारणी ४.४: प्रकल्पबाधितांचे रेशनकार्ड धारणाचे प्रकाराचे विवेचन

| अ. क्र. | प्रकल्पबाधितांचा रेशनकार्ड धारणाचा प्रकार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पांढरे | ० | ० |
| २ | पिवळे | ० | ० |
| ३ | केशरी | ११ | १०० |

| | | |
|---|---|---|
| एकूण | ११ | १०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण





उपरोल्लेखित सारणी क्र. १, २, ३ व ४ मधील प्राथमिक माहितीवर दृष्टीक्षेप टाकला असता असे निदर्शनास येते की, एकूण प्रकल्पबाधितांपैकी सर्वच प्रकल्पबाधितांचे पिढीजात वास्तव्य गावातच असल्याचे दिसते. वाडी रत्नागिरी येथे जोतिबा देवस्थान असून प्रकल्पबाधित आपल्या उदरनिर्वाहासाठी देवस्थानात पुजारी, गुरव इ. कामे करतात. याव्यतिरिक्त प्रसाद व पूजा साहित्य विक्री व्यवसाय करूनही आपल्या उत्पन्नास हातभार लावतात असे दिसून येते. जास्तीत जास्त प्रकल्पबाधित आपल्या परंपरागत शेती व्यतिरिक्त इतरही कामे करून आपला प्रपंच चालवतात. त्यांना योग्य मोबदला मिळावा अशी रास्त अपेक्षा ते व्यक्त करतात किंबहुना तो मिळणे आवश्यकही आहे. सर्वच प्रकलपबाधितांकडे रेशनकार्ड असून ते केशरी रंगाचे असून त्यांचे वार्षिक उत्पन्न १५,००० ते १ लाख रूपये या गटामध्ये येते. सर्वच प्रकल्पबाधितांकडे जमिन असून ते जमिन कसण्यासोबतच गावातील जोतिबा देवालयात काम करतात. एकूण प्रकल्पबाधितांपैकी मात्र १८.२ टक्के प्रकल्पबाधित हे दारिद्र्य कार्डधारक असून त्यांना शासनाचे तद्नुषंगिक सर्व लाभ मिळतात अशी अपेक्षा करता येवू शकते. प्रकल्पबाधित आपल्या शेतीसोबतच गावातील मंदिरात पुजारी, गुरव व वस्तुविक्रीचे दुकानावर काम करून पूरक उत्पन्न मिळवतात व त्यावर त्यांचे कुटुंब समाधानकारकपणे चालते. कारण अल्पश: शेतीतून मिळणारे उत्पन्न पुरेसे नाही. त्यामुळे बाधितांपैकी एकही प्रकल्पबाधित मनेरगासारख्या योजनेमध्ये मजूर म्हणून नोंद केलेला नाही व ते यावर कामही करत नाहीत. सर्वच प्रकल्पबाधित हे आपल्या शेतीसोबत मंदिरातील पुजारी व गुरव तसेच

इतर काम करून उत्पन्न मिळवितात. त्यांचा तो परंपरागत व्यवसाय असल्याचे दिसून आले. त्यांना प्रकल्पामध्ये बाधित झालेल्या जमिनीवर योग्य मोदबला मिळण्याची अपेक्षा आहे. किंबहुना त्यांनी प्रस्तुत प्रकल्पास विरोध न करता आपल्या जमिनी बिनशर्त देवू केल्यामुळे त्यांना योग्य व तात्काळ पुनर्वसन मोबदला मिळणे अत्यावश्यक आहे. कारण प्रकल्प पूर्ण होवून त्याचा वापरही सुरू झाला आहे.

**सारणी ४.५: प्रकल्पबाधित कुटुंबाचा प्रकार**

| अ. क्र. | प्रकल्पबाधितांच्या कुटुंब प्रकाराचे विवरण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रतिसाद नाही | १ | ९.१ |
| २ | एकसदस्य | ० | ० |
| ३ | विभक्त | ७ | ६३.६ |
| ४ | एकत्रित | ३ | २७.३ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





सारणी क्रमांक ५ मधील प्राथमिक माहिती ही प्रकल्पबाधितांची कुटुंब प्रकाराविषयी असून एकूण पैकी ६३.६ टक्के एवढी कुटुंबे विभक्त आहेत तर २७.३ टक्के कुटुंबे एकत्रित कुटुंब पद्धतीने राहतात. ९.१ टक्के इतक्या प्रकल्पबाधितांनी कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. बहुतांश कुटुंबे ही विभक्त प्रकारात येत असून कौटुंबिक खर्च दिवसेंदिवस वाढत चालला आहे. त्यामुळे प्रकल्पबाधित त्यांच्या भविष्यातील गरजा लक्षात घेवून योग्य

मोबदल्याची अपेक्षा व्यक्त करतात. एकूण प्रकल्पबाधितांपैकी मात्र ९.१ टक्के प्रकल्पबाधिताचे एकसदस्यीय महिला कुटुंब आहे. हे सारणी क्रमांक ६ मध्ये दर्शविले आहे.

### सारणी ४.६: एकसदस्यीय महिला कुटुंब विषयक विवरण

| अ. क्र. | एकसदस्यीय महिला कुटुंब | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १ | ९.१ |
| २ | नाही | १० | ९०.९ |
| एकूण | | ११ | १०० |


संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण




### सारणी ४.७: प्रकल्पबाधित कुटुंबातील अपंक व्यक्तीविषयी विवेचन

| अ. क्र. | प्रकल्पबाधित कुटुंबातील अपंक व्यक्तीविषयी विवेचन | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | आहे | ० | ० |
| २ | नाही | ११ | १०० |
| एकूण | | ११ | १०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण




सारणी क्रमांक ७ मध्ये दर्शविलेप्रमाणे प्रकल्पबाधित कुटुंबापैकी एकही कुटुंब हे अपंग नसल्याने त्यांच्यासाठी कराव्या लागणाऱ्या वेगळ्या तरतूदीची आवश्यकता भासत नाही.

**सारणी ४.८: प्रकल्पधारकाचे नोकरी प्रतिक्षा विषयक विवरण**

| अ. क्र. | प्रकल्पबाधित कुटुंब सदस्यांची नोकरीसाठीची प्रतिक्षा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रतिसाद नाही | १ | ९.१ |
| २ | होय | ३ | २७.३ |
| ३ | नाही | ७ | ६३.६ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





प्रकल्पबाधित कुटुंबातील एकूण सदस्यांपैकी २७.३ टक्के सदस्य नोकरीच्या प्रतिक्षेत आहेत. ६३.६ टक्के सदस्य मात्र कोणत्याही नोकरीच्या प्रतिक्षेत नाहीत. नोकरीच्या प्रतिक्षेत असलेल्या सदस्यांच्या मते प्रकल्पबाधित झाल्यामुळे पिढ्यानपिढ्या नुकसान झाले व त्याचबरोबर कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन असलेली शेती गेल्यामुळे बेरोजगार निर्माण झाला असून त्यांना सरकारी नोकरी मिळावी. उर्वरीत ९.१ टक्के प्रकल्पबाधितांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. किंबहुना नोकरीबद्दल त्यांना फारसे आकर्षण नाही किंवा त्याकरीता ते पात्रही नाहीत असे दिसून येते किंबहुना अपात्रता हेच महत्त्वाचे कारण आहे. बहुसंख्य प्रकल्पबाधित आपल्या जमिनीवर काम करून उर्वरीत वेळेत मंदीरामध्ये पुजारी व गुरव काम करून वा वस्तू विक्रीची दुकाने लावून उत्पन्न मिळवत असल्यामुळे ते नोकरीची प्रतिक्षा करत नसल्याचे आढळून आले. विशेष म्हणजे यापैकी

एकाही प्रकल्पबाधिताने प्रस्तुत प्रकल्पास विरोध केलेला नाही. म्हणूनच तात्काळ पुनर्वसन मोबदल्याची आवश्यकता अधोरेखित होते.

**सारणी ४.९: प्रकल्पबाधित कुटुंबाचे व्यवसाय विषयक विवरण**

| अ. क्र. | प्रमुख व्यवसायानुसार प्रकल्पबाधित कुटुंबाचे विवेचन | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रतिसाद नाही | ४ | ३६.४ |
| २ | गुरव | २ | १८.२ |
| ३ | पुजारी | १ | ९.१ |
| ४ | शेती | ४ | ३६.४ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





व्यवसायनिहाय विवरणाचा अभ्यास करताना संमिश्र स्वरूपाची प्राथमिक माहिती समोर येते. एकूण प्रकल्पबाधितांपैकी ३६.४० टक्के प्रकल्पबाधित प्रमुख व्यवसाय म्हणून शेतीवरच अवलंबून असल्याचे दिसते. अर्थात त्यात काहीही आश्चर्याचे नाही. २७.३ टक्के प्रकल्पबाधित गावातील जोतिबा देवस्थानमध्ये गुरव व पुजारी म्हणून काम करतात व आपला उदरनिर्वाह चालवितात. देवस्थानमध्ये वर्षातील जवळपास आठ महिने काम करतात व त्यातून त्यांना उत्पन्न मिळते. ३६.४ टक्के प्रकल्पबाधितांनी याबाबत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. प्रकल्पबाधित त्यांच्या प्रमुख उत्पन्नाकरीता शेतीवरच अवलंबून असल्यामुळे त्यांना योग्य मोबदला मिळणे आवश्यक आहे. अर्थात हे करताना जमिनीचा स्थानिक बाजारभाव तपासून त्याप्रमाणे मोबदला आदा करणे आवश्यक आहे. याकरिता प्रकरण पाचमधील जमिन बाजारभावाचे मार्गदर्शन घेवू शकते.

### सारणी ४.१०: प्रकल्पबाधितांचे जमिन मालकी विषयक विवेचन

| अ. क्र. | जमिन मालकीविषयक विवेचन | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ११ | १०० |
| २ | नाही | ० | ० |
| एकूण | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





सर्वच प्रकल्पबाधितांकडे स्वत:च्या मालकीची जमिन आहे असे प्राथमिक माहितीवरून दिसते. कारण जमिन मालकी ही बऱ्याच अंशी वारसाहक्काने येते. वारसांच्या संख्येनुसार जमिनीचे विभाजन होते व तुकडीकरण होवून जमिनधारणाही कमी होत असल्याचे दिसते. जमिन मालकी असल्यामुळे जमिनीवरील हक्क सोडल्यामुळे त्यांचे उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन नष्ट होत असल्याने जमिन मोबदला देताना चुका होता कामा नयेत अशीच त्यांची अपेक्षा आहे. इतर अनेक प्रकल्पांबाबत अनेकदा असा अनुभव आलेला आहे. त्यामुळे प्रकल्पबाधितांवर अन्याय झाल्यामुळे प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचा सरकारी यंत्रणेवरील विश्वास नाहिसा झाल्याचे आम्हांस इतर अनेक प्रकल्पांच्या सापनि अहवाल अभ्यासाच्या निमित्ताने निदर्शनास आले आहे.

### सारणी ४.११: प्रकल्पबाधितांचे जमिन विक्री विषयक माहिती

| अ. क्र. | प्रकल्पबाधितांच्या जमिन विक्रीचे विवेचन | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रतिसाद नाही | १ | ९.१ |
| २ | होय | ५ | ४५.५ |
| ३ | नाही | ५ | ४५.५ |
| एकूण | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





जमिन विक्रीविषयक माहितीवरून असे निदर्शनास येते की प्रकल्पबाधित कुटुंबापैकी ४५.५ टक्के कुटुंबांनी जमिन विक्री होत असल्याचे सांगितले तर उर्वरित ४५.५ टक्के प्रकल्पबाधितांनी जमिन विक्री होत नसल्याचे सांगितले. शेती उत्पन्नावर उदरनिर्वाह करणे शक्य होत नसल्याने ग्रामीण भागात जमिनीचे खरेदी-विक्री व्यवहार वारंवार होत असल्याचे दिसते. बऱ्याचवेळा जमिनी विक्रीचा दस्त करून खाजगी सावकारी कर्जेही घेतली जातात. शेतीवरच अवलंबित्व असल्याने वर उल्लेख केल्याप्रमाणे प्रकल्पबाधितास योग्य मोबदला मिळणे आवश्यक आहे.

### सारणी ४.१२: प्रकल्पबाधितांचे सिंचन विषयक विवरण

| अ. क्र. | सिंचनकामी पाण्याची उपलब्धता | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रतिसाद नाही | ३ | २७.३ |
| २ | होय | ३ | २७.३ |
| ३ | नाही | ५ | ४५.५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | एकूण | ११ | १०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण





प्रकल्पबाधितांच्या सिंचन सुविधा विषयक माहिती उपरोल्लेखित आकडेवारीवरून मिळते. सिंचन विषयक प्राथमिक माहिती असे निर्देशित करते की एकूण प्रकल्पबाधितांपैकी २७.३ टक्के प्रकल्पबाधितांकडे सिंचन विषयक सुविधा असून ४५.५ टक्के प्रकल्पबाधितांकडे सिंचन सुविधा नाहीत. अशा सर्व प्रकल्पबाधितांची शेती पर्जन्यमानावर अवलंबून असल्याचे दिसून येते. २७.३ टक्के प्रकल्पबाधितांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. वाडी रत्नागिरी केर्ली हा भाग अंशत: डोंगराळ आहे. शेतजमिनीस सिंचन सुविधा असतील तरच चांगली उत्पादकता मिळू शकते व खात्रीचे उत्पन्न संभवते. सिंचन सुविधा कमी असल्याने कमी उत्पादकता व कमी उत्पन्न मिळते. पर्यायाने आतबट्ट्याच्या कृषि व्यवसायाचा सामना करावा लागतो. प्रकल्पबाधित हे आपले शेतीक्षेत्र रस्ते विकास कामी देण्यास तयार असून पुरेसा व योग्य मोबदल्याची उपेक्षा करताना दिसून येतात. किंबहुना प्रस्तुत सर्व प्रकल्पबाधितांनी आपली जमिन प्रकल्पासाठी याअगोदरच दिली असल्याने प्रकल्पाचे काम जवळजवळ पूर्णही झाले आहे.

**सारणी ४.१३: प्रकल्पबाधितांचे रहिवास विषयक विवरण**

| अ. क्र. | प्रकल्पबाधितांच्या राहत्या घराच्या मालकीविषयी विवेचन | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्वत:चे | ११ | १०० |
| २ | भाड्याचे | ० | ० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | सामाईक | ० | ० |
| ४ | शासकीय | ० | ० |
| एकूण | | ११ | १०० |


**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण




## सारणी ४.१४: प्रकल्पबाधित कुटुंबाच्या घर प्रकाराचे विवरण

| अ. क्र. | प्रकल्पबाधितांच्या घरांच्या स्वरूपासंबंधीचे विवेचन | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रतिसाद नाही | १ | ९.१ |
| २ | कच्चे | २ | १८.२ |
| ३ | पक्के | ६ | ५४.५ |
| ४ | अर्धे कच्चे | २ | १८.२ |
| एकूण | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण



## सारणी ४.१५: प्रकल्पबाधितांच्या मालकी घर आकारमानाचे विवरण


| अ. क्र. | राहत्या घराचे आकारमान (खोल्यांची संख्या) | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रतिसाद नाही | १ | ९.१ |
| २ | १ | ० | ० |
| ३ | २ | ४ | ३६.४ |
| ४ | ३ | ५ | ४५.५ |
| ५ | ४ | १ | ९.१ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

## सारणी ४.१६: प्रकल्पबाधितांच्या घराचे स्वरूपविषयक विवरण

| अ. क्र. | राहत्या घराचे भिंतीचे स्वरूप | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रतिसाद नाही | १ | ९.१ |
| २ | आर. सी. सी. | २ | १८.२ |
| ३ | कच्चा | २ | १८.२ |
| ४ | दगडी | २ | १८.२ |
| ५ | पक्का | १ | ९.१ |
| ६ | माती | १ | ९.१ |
| ७ | माती/दगड | १ | ९.१ |
| ८ | वीट | १ | ९.१ |
| **एकूण** | | ११ | १०० |


**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण




**सारणी ४.१७: प्रकल्पबाधित कुटुंबाच्या राहत्या घराचे स्वरूपविषयक विवरण**

| अ. क्र. | छताचा प्रकार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रतिसाद नाही | २ | १८.२ |
| २ | स्लॅब | २ | १८.२ |
| ३ | कौलारू | २ | १८.२ |
| ४ | पत्रा | ५ | ४५.५ |
| एकूण | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण




सारणी क्रमांक १३, १४, १५, १६ व १७ मधील प्राथमिक माहितीच्या पृथक्करणातून प्रकल्पबाधितांच्या राहत्या घरविषयक माहितीचा अंदाज येतो. सर्वच प्रकल्पग्रस्तांचे सध्या राहत असलेले घर हे स्वत:च्या मालकीचे आहे. कारण हे सर्व प्रकल्पबाधित पिढीजात रहिवासी आहेत. गावातील इतर घरांप्रमाणेच यांची घरे आहेत. प्रकल्पबाधितांचे पिढीजात वास्तव्य असल्यामुळेही ही घरे त्यांच्या मालकीची आहेत व तसे नैसर्गिकही आहेच. घराच्या प्रकाराचे विवरण पाहिले असता ५४.५ टक्के घरे ही पक्की घरे असून १८.२ टक्के घरे अर्धे कच्चे व १८.२ टक्के घरे कच्ची घरे आहेत. बहुतांश घरे ही पक्के व अर्ध पक्के अशा स्वरूपाची असून अतिरिक्त पर्जन्यमानाच्या क्षेत्रात असल्यामुळे बहुतांश घरे कौलारू उताराची व अनेक वर्षांपूर्वी बांधलेली आहेत. यापैकी अनेक कुटुंबांचा कृषिपूरक व्यवसाय जोतिबा देवस्थानातील पूजा व साहित्य विक्रीचा असल्याने त्यातून त्यांना काही प्रमाणात उत्पन्न मिळते. अर्थात देवस्थानची पूजा पिढीजात वारसाहक्काने आल्याने व अनेक पिढ्यांचा इतिहास असल्याने या कुटुंबांची पिढीजात लोकसंख्याही वाढली आहे. त्यामुळे या कामाकरीता प्रत्येक सदस्य किंवा कुटुंबाची पाळी येण्यासाठी बराच अवधी जात असल्याने या मार्गाने मिळणाऱ्या उत्पन्नात कोणतीही निश्चितता नाही. त्यामुळे या सर्वच प्रकल्पबाधितांचे महत्त्वाचे उदरनिर्वाहाचे साधन शेती असूनही त्यांनी प्रकल्पाकरीता त्यांची जमिन देवू केली आहे. त्यामुळे त्यांना विनाविलंब व न्याय्य किंमत आदा करणे अत्यंत आवश्यक आहे. जोतिबा देवस्थानमध्ये काही प्रकल्पबाधित आपल्या पूरक उत्पन्नासाठी काम करतात व त्यातून त्यांना उत्पन्न मिळते. त्यातून त्यांनी त्यांची घरे चांगली केली आहेत. एकूण प्रकल्पबाधितांपैकी ४५.५ टक्के प्रकल्पबाधितांकडे पाच खोल्यांचे घर आहेत तर ३६.४ टक्के प्रकल्पबाधितांकडे चार खोल्यांची घरे आहेत. ९.१ टक्के प्रकल्पबाधितांकडे फक्त एक खोलीचे घर आहे. यावरून बहुसंख्य प्रकल्पबाधितांकडे चार ते पाच खोल्यांची घरे आहेत. बहुसंख्य प्रकल्पबाधितांचे उत्पन्न मर्यादित असल्याने त्यांची घरे फार मोठी नाहीत. पुजारी व गुरव यासारखी कामे करत असल्यामुळे दररोजच्या कामावरच उत्पन्न अवलंबून असल्यामुळे त्यांच्याकडे कोणतीही सामाजिक सुरक्षितता नाही. त्यात सरकारी योजनेतून घरकर्जही

मिळत नाहीत. कारण उत्पन्नाचे निश्चित साधन त्यांच्याकडे नाही. घराच्या स्वरूपाचा विचार केल्यास फक्त १८.२ टक्के प्रकल्पबाधितांची घरे आरसीसी प्रकारची आहेत व १८.२ टक्के घरे दगडी व जुन्या पद्धतीने कौलारू उताराची आहेत. काही प्रकल्पबाधितांची घरे उतरत्या पत्र्याच्या छपरांची असून जागाही अत्यंत मर्यादित स्वरूपाची आहे. याउलट कुटुंबाचा आकार वाढल्याने ज्याप्रमाणे उत्पन्न कमी पडते त्याचप्रमाणे राहती घरेही कमी पडतात असे आम्हास क्षेत्रभेटीवेळी निदर्शनास आले. ३६.४ टक्के प्रकल्पबाधितांची घरे वगळता उर्वरित घरे माती, दगड, वीटा इ. ने बांधलेली आहेत. उपरोल्लेख केल्याप्रमाणे उत्पन्नस्थिती चांगली नसल्यामुळे कच्ची घरे अधिक प्रमाणात दिसतात. एका प्रकल्पबाधिताने कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. प्रकल्पबाधितांची घरमालकी, घराचे स्वरूप, खोल्यांची संख्या इ. वरून असाच निष्कर्ष निघतो की जवळपास ५० टक्के पेक्षा जास्त प्रकल्पबाधितांची घरे ही साधारण स्वरूपाची असून यावरूनच त्यांच्या सुमार आर्थिक स्थितीची कल्पना येते. यामुळे सर्वच प्रकल्पबाधितांना जमिनीचा योग्य मोबदला देताना अन्याय होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. अन्यथा प्रकल्पामुळे उत्पन्नाचे साधनही नष्ट होवून त्यांची आर्थिक स्थिती अधिक बिकट होणार याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही.

**सारणी ४.१८: प्रकल्पबाधितांचे राहत्या घराचे स्वरूपविषयक विवरण**

| अ. क्र. | फरशीचा प्रकार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रतिसाद नाही | ९ | ८१.८ |
| २ | साधी | २ | १८.२ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण




**सारणी ४.१९: प्रकल्पबाधितांचे राहत्या घराचे स्वरूपविषयक विवरण**


| अ. क्र. | शौचालय | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रतिसाद नाही | १ | ९.१ |
| २ | आहे | ९ | ८१.८ |
| ३ | नाही | १ | ९.१ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

**सारणी ४.२०: प्रकल्पबाधितांचे राहत्या घराचे स्वरूपविषयक विवरण**

| अ. क्र. | निर्धूर चूल | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रतिसाद नाही | १ | ९.१ |
| २ | आहे | ४ | ३६.४ |
| ३ | नाही | ६ | ५४.५ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण




## सारणी ४.२१: प्रकल्पबाधितांचे राहत्या घराचे स्वरूपविषयक विवरण

| अ. क्र. | आंघोळीचे घर | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रतिसाद नाही | १ | ९.१ |
| २ | आहे | १० | ९०.९ |
| ३ | नाही | ० | ० |
| | एकूण | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

## सारणी ४.२२: प्रकल्पबाधितांचे राहत्या घराचे स्वरूपविषयक विवरण

| अ. क्र. | परसबाग | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रतिसाद नाही | १ | ९.१ |
| २ | आहे | २ | १८.२ |
| ३ | नाही | ५ | ४५.५ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

## सारणी ४.२३ : प्रकल्पबाधित कुटुंबाचे राहत्या घराचे स्वरूप


| अ. क्र. | बायोगॅस | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | आहे | ० | ० |
| २ | नाही | ११ | १०० |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

## सारणी ४.२४: प्रकल्पबाधित कुटुंबाकडील जीवनावश्यक वस्तूंचे विवरण

| अ. क्र. | गॅस सिलेंडर | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रतिसाद नाही | १ | ९.१ |
| २ | आहे | ९ | ८१.८ |
| ३ | नाही | १ | ९.१ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण



## सारणी ४.२४ (अ): प्रकल्पबाधितांकडील शुद्ध पाण्याचे विवरण

| अ. क्र. | गावात पाण्याच्या शुद्धीकरणासाठी काही केले जाते का? | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रतिसाद नाही | १ | ९.१ |
| २ | होय | ९ | ८१.८ |
| ३ | नाही | १ | ९.१ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

सारणी क्रमांक १८, १९, २०, २१, २२, २३, २४, व २४ (अ) मध्ये प्रकल्पबाधितांच्या घराच्या स्वरूपाबद्दल व साधनाबद्दलची प्राथमिक माहिती उर्ध्वृत केली आहे. एकूण १८.२ टक्के प्रकल्पबाधितांच्या घरांत फरशी असून याबाबतीत ८१.८ टक्के प्रकल्पबाधितांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. राहत्या घरात कुटुंबाचे आरोग्य चांगले राहण्यासाठी शौचालय असणे आवश्यक आहे. एकूण प्रकल्पबाधितांपैकी ८१.८ टक्के प्रकल्पबाधितांच्या घरामध्ये शौचालय आहे तर ९.१ टक्के प्रकल्पबाधितांच्या घरामध्ये शौचालय नाही. ९.१ टक्के प्रकल्पबाधितांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. घरामध्ये भोजन तयार करण्यासाठी ग्रामीण भागामध्ये चुलीवर अन्न शिजविले जाते. त्यामधून धूर निघणे व त्यामुळे डोळ्यास इजा होवू शकते. एकूण प्रकल्पबाधितांपैकी ३६.४ टक्के प्रकल्पबाधितांकडे निर्धूर प्रकारच्या चुली असून ५४.५ टक्के प्रकल्पबाधितांकडे चुली नाहीत. एकूण प्रकल्पबाधितांपैकी ९०.९ टक्के प्रकल्पबाधितांकडे आंघोळीचे घर/न्हानी आहे. घरामध्ये आंघोळीचे घर असणे आवश्यक आहे. एकूण प्रकल्पबाधितांपैकी १८.२२ टक्के प्रकल्पबाधितांच्या घरामध्ये परसबाग असून ७२.७ टक्के प्रकल्पबाधितांकडे परसबाग नाही. कारण बहुतांश घरांची जागा मर्यादित आहे. तसेच घरामध्ये परसबाग करण्यासाठी घर बांधकामाव्यतिरिक्त जागा उपलब्ध असावी लागते. मात्र बहुसंख्य घरामध्ये परसबाग नाही. कारण सर्व घरे पारंपारिक स्वरूपाची व लहान आहेत. प्रकल्पबाधित कुटुंबाकडे बायोगॅसची सुविधा नसल्याने त्यांना एकतर गॅस किंवा सरपण चुलीवर स्वयंपाक करावा लागतो. काही

प्रकल्पबाधितांकडे गॅस सिलेंडर आहे व ते त्यावर आपला स्वयंपाक तयार करतात. मात्र ९.१ टक्के प्रकल्पबाधितांकडे गॅस सिलेंडर नाही व एका प्रकल्पबाधिताने याबाबत प्रतिसाद दिलेला नाही. प्रकल्पबाधितांच्या गावामध्ये ८१.८ टक्के प्रकल्पबाधितांनी शुद्ध पिण्याचे पाणी दिले जाते असे नोंदविले व ९.१ टक्के प्रकल्पबाधितांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. कारण त्यांची पाण्याची गरज स्वत:च्या विहीर पंपावरून भागविली जाते असे आमच्या सर्वेक्षणावेळी निदर्शनास आले होते. घरातील उपरोल्लेखित सर्व सुविधा उत्पन्नविषयक स्थिती व जीवनमान दर्जा दर्शवितात. घरातील सर्व सुविधा अत्यावश्यक आहेत. त्या असणे अनिवार्य आहे. सुविधांचा विचार केला असता प्रकल्पग्रस्तांच्याकडे असलेल्या सुविधा या तेवढ्या उच्च दर्जाच्या नसून प्राथमिक गरज भागेल इतक्याच आहेत. प्रकल्पबाधितांचे जीवनमान बेताचे असूनदेखील रस्ते कामी ते आपल्या जमिनी देण्यास तयार असल्यामुळे त्यांना योग्य मोबदला देणे आवश्यक आहे. जमिनी देत असताना ते फार मोठा त्याग करतात व त्यातूनच प्रस्तुत प्रकल्पाचा विकास होत आहे. प्रामुख्याने विनाशर्त जमिनी देण्याचे महत्त्वाचे कारण असे की बहुतांश प्रकल्पबाधित अनेक पिढ्या जोतिबा देवस्थानशी जोडलेले आहेत. त्यामुळे देवस्थानला येणाऱ्या सर्व भक्तांकरीता चांगला रस्ता असावा अशी त्यांची भावना असल्याने त्यांनी प्रकल्पकामी आपल्या जमिनी बिनशर्त देवू केल्या आहेत असे सापनि अभ्यासगटाच्या सर्वेक्षणावेळी लक्षात आले.

**सारणी ४.२५: प्रकल्पबाधितांचे जमिन विक्री विषयक विवरण**


| अ. क्र. | जमिन विक्रीसंबंधीचे विवेचन | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रतिसाद नाही | १ | ९.१ |
| २ | होय | ५ | ४५.५ |
| ३ | नाही | ५ | ४५.५ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

### सारणी ४.२६: प्रकल्पबाधित कुटुंबाचे कर्ज विषयक विवरण

| अ. क्र. | कर्ज घेतले आहे का? | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ७ | ६३.६ |
| २ | नाही | ४ | ३६.४ |
| एकूण | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





उपरोल्लेखित सारणी क्रमांक २५ व २६ मध्ये जमिनी विक्रीविषयी व प्रकल्पबाधितांची कर्जविषयक माहिती दिलेली आहे. प्रकल्पबाधित शेतकरी कुटुंबाची जमिन विक्रीविषयक चौकशी केली असता असे निदर्शनास येते की, एकूण प्रकल्पबाधित कुटुंबापैकी ४५.५ टक्के प्रकल्पबाधित कुटुंबानी प्रकल्पबाधित जमिन सोडून इतर जमिन विक्री केली आहे. तर ४५.५ टक्के कुटुंबांनी जमिन विक्री केली नाही. एका प्रकल्पबाधिताने कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. प्रकल्पबाधित कुटुंबाचे कर्जविषयक विवरण पाहता असे निदर्शनास येते की एकूणांपैकी ६३.६ टक्के प्रकल्पबाधितांनी संस्थात्मक व बिगर संस्थात्मक अशी दोन्ही स्वरूपाची कर्जे घेतली आहेत. ३६.४ टक्के प्रकल्पबाधितांनी कोणतीही कर्जे घेतलेली नाहीत. शेतीसाठी शेतकऱ्यांना प्रतिवर्षी पिककर्जे घ्यावी लागतात व त्यातून जमिनीची मशागत, पेरणी, कापणी केली जाते. बऱ्याचवेळा याच कर्जातून लागवडीकरीता आदानांची खरेदीही केली जाते. शेती कर्जे सावकाराकडून घेतली जातात. अशी कर्जे जास्त दराने घेतली जातात व त्याची परतफेड करणेही शक्य होत नाही. कर्जे ही विविध कारणांसाठी घेतली जातात. कारण शेतीतून

मिळणारे उत्पन्न तुटपुंज्या स्वरूपाचे असल्याने त्यांना कर्जाचा आधार घेतल्याशिवाय पर्याय नसतो.

### सारणी ४.२७: प्रकल्पबाधितांच्या आजारपण विषयक विवरण

| अ. क्र. | कायमस्वरूपी आजारी असणाऱ्या व्यक्तीविषयीची माहिती | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ५ | ४५.५ |
| २ | नाही | ६ | ५४.५ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





सारणी क्रमांक २७ मध्ये प्रकल्पबाधितांच्या कुटुंबातील आजारपण विषयक विवरण दिले असून एकूण प्रकल्पबाधितांपैकी ४५.५ टक्के प्रकल्पबाधितांच्या कुटुंबातील व्यक्ती सततच्या आजारी असतात तर ५४.५ टक्के कुटुंबांना प्रस्तुत समस्या भेडसावत नाही. सततचे आजारपणामुळे कुटुंबाचा खर्च दवाखाना व औषधोपचारावर होतो. प्रकल्पकामी दिलेल्या जमिनीस योग्य मोबदला मिळाला तर ते आपल्या कुटुंबातील आजारी व्यक्तीची योग्य काळजी घेवू शकतील. कारण प्रकल्पात जमिनी गेल्याने त्यांचे उत्पन्न कमी झाले आहे. त्यामुळे जमिनी जावून उत्पन्नाचे साधन कमी झाल्यामुळे अशा कुटुंबांना पुनर्वसन रक्कमेची आवश्यकता अधिक असल्याचे दिसून येते.

## सारणी ४.२८: प्रकल्पबाधितांचे रोजगार विषयक विवरण

| अ. क्र. | प्रकल्पबाधित कुटुंबातील मजुरीस जाणाऱ्या व्यक्तीविषयी माहिती | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रतिसाद नाही | १ | ९.१ |
| २ | होय | ४ | ३६.४ |
| ३ | नाही | ६ | ५४.५ |
| एकूण | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





एकूण प्रकल्पबाधितांपैकी ३६.४ टक्के प्रकल्पबाधित कुटुंबातील सदस्य उदरनिर्वाहासाठी दररोज मजुरीस जातात. यावरून त्यांच्या आर्थिक हालाखीची कल्पना यावी. धारणक्षेत्र कमी असल्यामुळे त्यांना पूर्णवेळ स्वत:च्या जमिनीवर पुरेल इतके काम नसते. त्यामुळे ते मजुरीसाठी इतरांच्याकडे काम करतात. ५४.५ टक्के प्रकल्पबाधित कुटुंबातील सदस्य मजूर म्हणून कामास न जाता ते जोतिबा देवस्थानमध्ये पुजारी व गुरव इत्यादी कामे करतात व पूरक उत्पन्न मिळवितात. तसेच पूजा साहित्य विक्रीची दुकानेही आहेत. त्यांना शेतीतून पुरेसे उत्पन्न मिळत नसल्यामुळे इतर कामे करावी लागतात. त्यांची आर्थिक स्थिती फार भक्कम नसल्यामुळे बहुतांश उदरनिर्वाह शेतीवरच अवलंबून असल्याचे दिसून येते.

**सारणी ४.२९: प्रकल्पबाधितांतवरील जमिन देण्याविषयीच्या सक्ती/दबावाविषयी विवरण**

| अ. क्र. | जमिन प्रकल्पाला दयावी यासाठी दबाव | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ० | ० |
| २ | नाही | ११ | १०० |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





सारणी क्रमांक २९ मध्ये प्रकल्पबाधितांवर प्रकल्पासाठी जमिन देण्याकरीताच्या दबावाविषयी विवरणावरून असे दिसून येते की एकूण प्रकल्पबाधितांपैकी प्रस्तुत प्रकल्पाकरीता जमिन देण्यासाठी कोणताही दबाव नाही असे सर्व प्रकल्पबाधितांनी नमूद केले आहे. अर्थात या सर्व प्रकल्पबाधितांनी स्वेच्छेने आपल्या जमिनी प्रकल्पाकरीता दिल्या आहेत हे विशेष. त्यामुळे जर सर्वच प्रकल्पबाधित आपल्या जमिनी प्रकल्पासाठी देण्यास स्वेच्छेने तयार असतील व पायाभूत विकासकामास मदत करीत असतील तर त्यांच्या प्रकल्पबाधित जमिनीस योग्य मोबदला मिळणे आवश्यक आहे. मागील काळात जावून विचार केला असता बऱ्याच प्रकल्पासाठीच्या जमिनी सक्तीने घेतल्याची अनेक उदाहरणे सापडतात. याशिवाय देशाच्या पायाभूत विकासकामात सर्वाधिक योगदान शेतकरी वर्गाचेचे असल्याचा इतिहास आहे. कारण देशातील अनेक प्रकारच्य पायाभूत सुविधा व विकास कामांसाठी शेतकऱ्यांनी आपले एकमेव उदरनिर्वाहाचे साधन असलेल्या शेतीचा त्याग केला आहे. परंतु बहुतेक प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन अनेक दशके प्रलंबित आहे हे देखील वास्तव आहेच. अशा काही जमिन अधिग्रहणाची व

प्रलंबित पुनर्वसन व मोबदल्याची उदाहरणे पाहता देशातील रायसीना गावची जमिन लोकसभा, राष्ट्रपती भवन, नॉर्थ व साऊथ ब्लॉककरीता १९११ मध्ये ब्रिटिशांनी अधिग्रहित केली होती. परंतु सरकारी कागदपत्रे तपासता अद्यापपर्यंत या शेतकऱ्यांना १९०९ च्या अधिग्रहणाचा मोबदला मिळाला नाही किंवा त्यांचे पुनर्वसन झाले नाही असे दिसून येते. असाच अनुभव महाराष्ट्रातील कोयना प्रकल्पाचे प्रकल्पबाधित शेतकरी १९५७ पासून आजपर्यंत घेत आहेत हे सर्वश्रुत आहेच (Indian Express, 04 August 2011).

**सारणी ४.३०: प्रकल्पबाधितांना मिळणाऱ्या समाधानकारक मोबदल्याविषयीचे विवरण**

| अ. क्र. | जमिनीस मिळणारी रक्कम समाधानकारक वाटते का? | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रतिसाद नाही | १ | ९.१ |
| २ | होय | ० | ० |
| ३ | नाही | ३ | २७.३ |
| ४ | माहिती नाही | ७ | ६३.६ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण



आलेख 22: प्रकल्पबधीताना मिळालेल्या समाधानकारक मोबदल्या विषयीचे विवरण


सारणी क्रमांक ३० मध्ये प्रकल्पबाधितास प्रकल्पबाधन क्षेत्राच्या मोबदल्याविषयीच्या प्राथमिक आकडेवारीद्वारे विवरण सादर केले आहे. प्रकल्पबाधितांना त्यांच्या प्रकल्पबाधित जमिनीच्या मोबदल्यात किती व कसा मोबदला मिळणार याची त्यांना सार्वजनिक बांधकाम कार्यालयाकडून काहीही माहिती मिळाली नाही. अर्थात यात काहीही आश्चर्य नाही. कारण इतर अनेक प्रकल्पांचे सापनि अहवाल अभ्यास करताना

प्रस्तुत अभ्यासगटाचा असाच अनुभव आहे. ऐकीव माहितीच्या आधारे त्यांनी आपल्या प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत. एकूण प्रकल्पबाधितांपैकी ६३.६ टक्के प्रकल्पबाधितांनी त्यांना योग्य मोबदला मिळणार नाही असे नमूद केले तर २७.३ टक्के प्रकल्पबाधितांनी त्यांना योग्य मोबदला मिळेल असे नमूद केले. किंबहुना त्यांची सरकारकडून तशी अपेक्षा आहे. बहुतांश प्रकल्पबाधितांच्या मनात फसवणुकीचीच भावना आहे. एकूण प्रकल्पबाधितांपैकी एका प्रकल्पबाधिताने काहीही प्रतिसाद दिलेला नाही. यावरून असे अनुमान निघते की बहुसंख्य प्रकल्पबाधितांनी आपल्या उदरनिर्वाहाच्या जमिनी प्रकल्पकामास स्वेच्छेने देवूनही पर्याप्त व योग्य मोबदल्याविषयी साशंकता व्यक्ती केली. प्रकल्पबाधितांनी त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन गमाविल्यामुळे त्यांच्या मनात जमिन मोबदल्याविषयी साशंकता असल्याने एक प्रकारची भीती मनात असल्याचे दिसून आले. परंतु प्रकल्प अधिकाऱ्यांनी प्रकल्पबाधितांना अनेक नियमांची भीती मात्र दाखविल्याचे अगदी प्रछन्नपणे निदर्शनास येते.

## सारणी ४.३१: प्रकल्पबाधितांच्या फायदा विषयक विवरण

| अ. क्र. | सदर प्रकल्पाचा प्रकल्पबाधितांना किंवा नातेवाईकांना फायदा होईल का याविषयीचे मत | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ११ | १०० |
| २ | नाही | ० | ० |
| एकूण | | ११ | १०० |


**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण



## सारणी ४.३१ (अ): प्रकल्पबाधितांचे मोबदलादरात जमिन धारणेचे विवरण

| अ. क्र. | प्रकल्पाकडून मिळालेल्या पैशातून तेवढीच जमिन किंवा त्याहून अधिक जमिन विकत घेणे शक्य होईल का याविषयीचे मत प्रदर्शन | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | तेवढीच जमिन घेणे शक्य | २ | १८.२ |
| २ | त्याहून जास्त जमिन घेणे शक्य | १ | ९.१ |
| ३ | माहिती नाही | ६ | ५४.५ |
| ४ | प्रतिसाद नाही | ३ | १८.२ |
| एकूण | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





सारणी क्रमांक ३१ व ३१ (अ) मध्ये प्रकल्पबाधितांचे प्रकल्पानंतर त्यांना होणाऱ्या फायद्याविषयक प्रदर्शित केलेल्या मताचे विवरण आहे. एकूण प्रकल्पबाधितांपैकी सर्वच प्रकल्पबाधितांना सदर रस्ते प्रकल्पाचा त्यांना व त्यांच्या नातेवाईकांना फायदा होईल असे नमूद केले आहे. प्रकल्पबाधितांना प्रकल्पबाधन क्षेत्राच्या मोबदल्यातून तेवढीच जमिन विकत घेणे शक्य होईल असे १८.१२ टक्के प्रकल्पबाधितांचे मत आहे. ९.१ टक्के प्रकल्पबाधितांना मिळालेल्या मोबदल्यातून प्रकल्पबाधित जमिन क्षेत्रापेक्षा जास्त जमिन विकत घेणे शक्य असल्याचे म्हटले आहे. तर ५४.५ टक्के प्रकल्पबाधित मात्र किती जमिन विकत घेणे शक्य होईल याबाबत अंदाज नसल्याचे सांगतात. कारण प्रकल्पबाधित क्षेत्रास किती मोबदला मिळेल याबाबतची त्यांना काहीच कल्पना नसल्याने ते याबाबत माहिती नसल्याचे सांगतात. प्रकल्पबाधितांना त्यांनी दिलेल्या जमिनीचा योग्य मोबदला

मिळाला तर ते जमिनही खरेदी करू शकतात व पुन्हा उदरनिर्वाहाचे साधन उभे करू शकतात. परंतु दुर्देवाने एकाही प्रकल्पबाधितास हे माहित नाही की प्रकल्पोपरांत परिसरातील जमिनींचे मूल्य भांडवलीकरण होवून जमिनीच्या बाजार किंमती प्रचंड प्रमाणात वाढणार असल्यामुळे त्यांना प्रकल्पबाधन मोबदल्यात जमिन खरेदी करणे शक्य होणार नाही. कारण जमिन मोबदला ठरविताना व आदा करतानाचा प्रशासकीय अनुभवाचा इतिहास सकारात्मक नसल्याचाच अनुभव आहे.

**सारणी ४.३२: प्रकल्पाच्या कामकाजाबाबतचे विवरण**

| अ. क्र. | प्रकल्पाच्या कामकाजाबाबत प्रकल्पबाधितांचे समाधानविषयक मत | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ९ | ८१.८ |
| २ | नाही | २ | १८.२ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





सारणी क्रमांक ३२ मध्ये नमूद केलेल्या प्राथमिक माहितीच्या पृथक्करणानुसार प्रकल्पाच्या कामकाजाबाबत ८१.८ टक्के प्रकल्पबाधित समाधानी असून १८.२ टक्के प्रकल्पबाधित समाधानी नाहीत. किंबहुना त्यांच्या काही तक्रारी आहेत. त्यांच्या मते रस्ते बांधकामानंतर पाण्याचा प्रवाह योग्य दिशेने वळविला नसल्यामुळे त्यांच्या पिकांचे नुकसान होते. रस्ता बांधकाम करताना प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पबाधितांना कोणताही त्रास होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याचे अधिकारी त्यांना योग्य उत्तरे देत नाहीत असे नमूद केले आहे. प्रत्यक्ष

क्षेत्रभेटीदरम्यान सापनि अभ्यासगटाच्या असे लक्षात आले की अनेक ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा पाण्याच्या चारी तयार केल्या नसल्याने प्रकल्पबाधितांच्या उर्वरित शेतात पावसाचे पाणी जावून प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या कामातील त्रुटी दूर व्हाव्यात ही त्यांची माफक अपेक्षा आहे. कारण प्रस्तुत प्रकल्पक्षेत्र अधिक पर्जन्यमानाच्या प्रदेशात येत असल्याने पावसाचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे रस्त्याच्या कामातील त्रुटीमुळे पावसाळ्यात प्रकल्पबाधितांच्या शेतांचे नुकसान संभवते.

**सारणी ४.३३: प्रकल्पबाधितांचे रस्तेकाम त्रुटी विषयक विवरण**

| अ. क्र. | रस्त्याच्या कामातील त्रुटीसंबंधी मत प्रदर्शन | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | आहेत | ५ | ४५.५ |
| २ | नाहीत | ५ | ४५.५ |
| ३ | माहिती नाही/प्रतिसाद नाही | १ | ९.१ |
| एकूण | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





एकूण प्रकल्पबाधितांपैकी ४५.५ टक्के प्रकल्पबाधितांनी रस्त्याच्या कामामध्ये त्रुटी असल्याचे नमूद केले आहे तर उर्वरित ४५.५ टक्के प्रकल्पबाधितांनी कोणत्याही त्रुटी नसल्याचे मत नोंदविले आहे. एका प्रकल्पबाधिताने मात्र याबाबत माहिती नसल्याचे नमूद केले. रस्त्याच्या कामात त्रुटी राहिल्या तर प्रकल्पबाधितांना त्याचा पुढील काळात त्रास संभवतो. प्रकल्पाबाधितांनी आपली उदरनिर्वाहाची जमीन देवून अगोदरच उत्पन्नाचे साधन गमाविल्यामुळे पुढे त्रास होणार नाही याची प्रकल्प विभागाने खात्री देणे आवश्यक

आहे व त्यांना त्याबाबतीत योग्य मोबदला देताना याही बाबीचा विचार होणे आवश्यक आहे.

**सारणी ४.३४: प्रकल्पबाधितांचे रस्त्याच्या कामातील त्रुटीमुळे झालेल्या नुकसानी विषयक विवरण**

| अ. क्र. | रस्त्याच्या कामातील त्रुटीमुळे प्रकल्पबाधितांचे झालेल्या नुकसानीसंबंधीचे विवेचन | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रतिसाद नाही | १ | ९.१ |
| २ | आहे | ४ | २६.४ |
| ३ | नाही | ६ | ५४.५ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण




आलेख 26: रस्त्याच्या कामातील त्रुटीमुळे प्रक्ल्पबाधीताचे झालेल्या नुकसाना समधीचे विवेचन

सारणी क्रमांक ३४ नुसार ३६.४ टक्के प्रकल्पबाधितांनी रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर कामातील त्रुटीमुळे त्यांचे नुकसान झाल्याचे नमूद केले व ५४.५ टक्के प्रकल्पबाधितांनी याबाबत नुकसान न झाल्याचे नमूद केले. रस्त्याचे काम करताना प्रकल्पबाधितांना विश्वासात घेतले जात नसल्याचे अनेक प्रकल्पबाधितांनी नमूद केले. रस्तेविषयक प्रकल्पाच्या बाबतीत प्रकल्पबाधितांना पूर्ण माहिती देणे आवश्यक व अपेक्षित असते. एकतर प्रकल्पबाधितांना मोबदला पुरेसा मिळणार आहे की नाही याबाबतची साशंकता आहे व नंतर मात्र त्यांचे नुकसानही होते या बाबी टाळणे आवश्यक आहे. परंतु याकामी प्रकल्प विभागाच्या अधिकाऱ्यांचे काही प्रमाणात दुर्लक्ष झाल्याचे निदर्शनास येते.

## सारणी ४.३५: प्रकल्पबाधितांचे कौटुंबिक विश्लेषण

| अ. क्र. | प्रकल्पबाधितांच्या कुटुंबातील सदस्यांची संख्या | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १ | ५ | ४५.५ |
| २ | २ | १० | ९०.९ |
| ३ | ३ | ४ | ३६.४ |
| ४ | ४ | ८ | ७२.७ |
| ५ | ५ | ४ | ३६.४ |
| ६ | ६ | ९ | ८१.८ |
| ७ | ७ | १० | ९०.९ |
| ८ | ८ | १ | ९.१ |
| ९ | ९ | ६ | ५४.५ |
| १० | ९ | ९ | ८१.८ |
| ११ | ११ | ४ | ३६.४ |
| एकूण | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





कुटुंबातील सदस्य संख्येबाबत माहिती मिळल्यानंतर आपणास कुटुंबातील कर्त्या व्यक्तीवरील आर्थिक जबाबदारीची कल्पना येते. एकूण प्रकल्पबाधितांपैकी ४५.५ टक्के प्रकल्पबाधितांचे कुटुंबातील सदस्यांची संख्या पाच किंवा त्यापेक्षा कमी आहे तर उर्वरित ६४.५० टक्के कुटुंबातील सदस्यांची संख्या सहा व त्यापेक्षा जास्त आहे. अर्थात ही

बहुतांश प्रकल्पबाधितांची कुटुंबे एकत्र कुटुंब पद्धतीची असल्यामुळे अशा कुटुंबातील सदस्य संख्या तुलनेने अधिक असल्याचे दिसून येते. बहुतांश कुटुंबे संयुक्त कुटुंब पद्धतीची आहेत. पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त कुटुंबे ही एकत्रित कुटुंबे असल्यामुळे त्यांची सदस्य संख्या जास्त आहे. तसेच अशा कुटुंबातील कुटुंबप्रमुखाची जबाबदारीही अधिक असल्याचे दिसून आले. कुटुंबाचे आजारपण लक्षात घेता त्यांना उदरनिर्वाहासाठी शेतीबरोबरच इतर कामे करावी लागतात. यामध्ये पुजारी व गुरव यासारखी पूरक कामे असल्याने त्यातून त्यांचे कुटुंब समाधानकारकरित्या उदरनिर्वाह करताना दिसून येतात. काही कुटुंबाची जोतिबा देवस्थान परिसरात पूजा साहित्याची लहान मोठी दुकाने असल्याचे दिसून आले. कुटुंबातील सदस्यांची संख्या जास्त असल्यामुळे आार्थिक बाजूच्या अनुषंगाने विचार केला असता त्यांना योग्य मोबदला मिळाला पाहिजे. कारण जमिनीव्यतिरिक्त इतर उत्पन्नाचे मार्ग उपलब्ध नाहीत. तसेच त्यांचे धारणक्षेत्रही लहान आहे. त्यामुळेच अनेक प्रकल्पबाधितांनी आपली शेतीही विकली आहे. परंतु गेल्या दीड वर्षाच्या काळात उत्पन्नाचा हा पूरक मार्गही बंद झाल्याने त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर दूरगामी परिणाम झाल्याचे दिसून आले. कारण त्यांच्या तुटपुंज्या धारणक्षेत्रातूनच अधिग्रहण झाले आहे.

**सारणी ४.३६: प्रकल्पबाधितांचे बेरोजगारी विषयक विवरण**

| अ. क्र. | | कुटुंबातील बेरोजगार सदस्य | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | | मुले | ३ | ४२.९ |
| २ | | मुली | ४ | ५७.१ |
| एकूण | | | ७ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





केर्ली–जोतिबा व परिसर अंशत: डोंगराळ आहे. तेथे कोणतेही वरिष्ठ महाविद्यालय किंवा शिक्षणाच्या इतर सुविधा उपलब्ध नाहीत. उच्च शिक्षणासाठी त्यांना तेथून १५ ते २० किलोमिटर इतके अंतर प्रवास करून शिक्षण घ्यावे लागते. बेरोजगारीबाबत पाहिले असता अकरा प्रकल्पबाधितांची एकूण ७ मुले व मुली बेरोजगार आहेत. या ७ पैकी ४२.९ टक्के मुले बेरोजगार असून ५७ टक्के मुली बेरोजगार आहेत. बेरोजगारी असतानाच उदरनिर्वाहासाठी असलेले शेती क्षेत्र अधिग्रहित झाल्याने प्रकल्पबाधितांवर आणखी दबाव वाढविणारे आहे. प्रकल्पबाधितांची मुले सरकारी नोकरीत घ्यावे असेही त्यांचे म्हणणे आहे. अर्थात सार्वजनिक बांधकाम खात्यात सकारात्मक विचार करून अर्हतेप्रमाणे कुटुंबातील एकास नोकरी दिली तर सरकारी तिजोरीवर काही फार मोठा भार पडणार नाही.

**सारणी ४.३६ (अ): प्रकल्पबाधित जमिनीव्यतिरिक्त बाधित मालमत्तेचे विवरण**

| अ. क्र. | जमिनीव्यतिरिक्त बाधित मालमत्तेचे विवरण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रतिसाद नाही | ३ | २७.३ |
| २ | काहीच नाही | ३ | २७.३ |
| ३ | गोठा | ३ | २७.३ |
| ४ | घर | ३ | २७.३ |
| ५ | विहीर | ३ | २७.३ |
| | एकूण | | |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

आलेख 29: प्रकल्पबाधित कुटुंबाचे जमिनीव्यतिरिक्त बाधीत मालमत्तेचे विवरण





प्रकल्पबाधित कुटुंबाच्या प्रकल्पबाधित जमिनीसोबत इतर मालमत्ताही प्रभावित झालेल्या आहेत. एकूण प्रकल्पबाधितांपैकी २७.३ टक्के प्रकल्पबाधितांचा गोठा प्रकल्पबाधित असून २७.३ टक्के प्रकल्पबाधितांचे घर तसेच २७.३ टक्के प्रकल्पबाधितांची विहीर प्रकल्पबाधन क्षेत्रात गेल्यामुळे मोठे नुकसान झाल्याचे दिसते. प्रकल्पबाधितांची विहीर प्रकल्पात गेल्यामुळे त्यांचे सिंचन थांबले व यातून त्यांचे येथून पुढील काळासाठी मोठे नुकसान संभवते. प्रकल्पबाधित शेतीसोबतच दुभती गुरे पाळतात व त्यातून पूरक उत्पन्न मिळवतात. त्यामुळे ज्यांचा गोठा प्रकल्पबाधित झाला आहे त्यांच्यासमोर अधिकची समस्या निर्माण झाली आहे. काही प्रकल्पबाधितांचे राहते घरच प्रकल्पबाधन क्षेत्रात गेलेले आहे. प्रकल्पबाधितांचे मालमत्ता नुकसान मोठ्या प्रमाणावर झाल्यामुळे त्या सर्व मालमत्ताकरीता देय नुकसान भरपाई योग्य पद्धतीने त्यांना देवून पुनर्वसन करणे आवश्यक आहे. मालमत्तांचे मूल्यांकन करताना ते वास्तविक असावे जेणेकरून त्यांना योग्य तो मोबदला मिळेल. अर्थात स्थावर मालमत्तेचे मूल्यांकन करताना प्रस्तुत जमिनीची व स्थावर मालमत्तेची नविन मालमत्ता आहे असेच गृहित धरून मूल्यांकन होणे आवश्यक आहे. कारण प्रस्तुत बाधनामुळे जर नविन स्थावर मालमत्ता निर्माण करावयाची असेल तर त्याकामी चालू किंमतीनुसार खर्च येणार आहे याची जाणिव प्रकल्प पुनर्वसन अधिकाऱ्यास असणे आवश्यक आहे.

**सारणी ४.३७: प्रकल्पबाधित कुटुंबाचा सामाजिक व संस्थात्मक सहभाग विषयक विवरण**

| अ. क्र. | प्रकल्पबाधितांचे संस्था सभासदत्व | संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | नाही | ५ | ४५.५ |
| २ | ग्रामपंचायत | १ | ९.१ |
| ३ | तरूण मंडळ | १ | ९.१ |
| ४ | दूध संस्था | १ | ९.१ |
| ५ | बचतगट | १ | ९.१ |
| ६ | भजनी मंडळ/गणपती मंडळ | २ | १८.२ |
| ७ | वि. का. सोसायटी | २ | १८.२ |
| ८ | सहकारी बँक | १ | ९.१ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





प्रकल्पबाधित कुटुंबातील एकूण सदस्यांपैकी सामाजिक, राजकिय, आर्थिक व सांस्कृतिक संस्थाचे सभासदत्व असणाऱ्यांची संख्या अत्यल्प असल्याचे दिसून येते. एकूणपैकी ४५.५ टक्के प्रकल्पबाधित कुटुंबातील सदस्य कोणत्याची संस्थेचे सभासद नाहीत तर उर्वरित काहीजण ग्रामपंचायत सदस्य, तरूण मंडळ, दूधसंस्था, बचतगट, भजनी मंडळ, वि.का.स. सोसायटी, सहकारी बँक इ. चे सभासद आहेत. याचाच अर्थ

असा आहे की प्रकल्पबाधितांच्यात त्यांचे स्वत:चे नेतृत्व नसल्याने पुनर्वसनकामी त्यांचा प्रकल्प विभागावर दबाव निर्माण होणे अशक्य आहे. त्यामुळे अशा आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल प्रकल्पबाधितांचे आर्थिक व निवासविषयक पुनर्वसन करताना प्रकल्प अधिकारीवर्ग संवेदनशील असणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**सारणी ४.३८: प्रकल्पबाधित कुटुंबाचे पिकासंबंधीचे विवरण**

| अ. क्र. | प्रकल्पबाधितांचे पिक विवरण | संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | काहीच नाही | ३ | २७.३ |
| २ | खरीप पिके | ८ | ७२.७ |
| ३ | रब्बी पिके | २ | १८.२ |
| ४ | वार्षिक पिके | १ | ९.१ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





**सारणी ४.३९: प्रकल्पबाधित कुटुंबाचे शेतीच्या अवजार वापरासंबंधीचे विवरण**

| अ. क्र. | साधने | संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | अन्य | २ | १८.२ |
| २ | औषध फवावरणी पंप | २ | १८.२ |
| ३ | काहीच नाही | ३ | २७.३ |
| ४ | नांगरणीसाठी ट्रॅक्टर | ५ | ४५.५ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

आलेख 32: प्रकल्प बाधीत कुटुंबाचे शेतीच्या अवजार वापरा संबंधीचे विवरण





## सारणी ४.४०: प्रकल्पबाधितांकडून शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या आदने विषयक विवरण

| अ. क्र. | सुधारित आदांनाचा वापर | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सुधारित बियाणे | ५ | ५४.५ |
| २ | काहीच नाही | ३ | २७.३ |
| ३ | कीटकनाशके | ३ | २७.३ |
| ४ | खते | ८ | ७२.७ |
| ५ | तणनाशक | २ | १८.२ |
| | एकूण | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

आलेख 33: प्रकल्पबाधित कुटुंबाचे उत्पादन वाढीसाठीचे प्रयत्न






## सारणी ४.४१: प्रकल्पबाधितांकडील पाण्याच्या स्रोतासंबंधीचे विवरण

| अ. क्र. | पाण्याचे स्रोत | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अन्य | १ | ९.१ |
| २ | काहीच नाही | ७ | ६३.६ |
| ३ | बोअरवेल | १ | ९.१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | विहीर | ३ | २७.३ |
| ५ | शेततळे | १ | ९.१ |
| एकूण | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण








## सारणी ४.४२: प्रकल्पबाधित कुटुंबाकडील उपभोग्य वस्तू व कृषी भांडवली वस्तू मालकीचे विवरण

| अ. क्र. | मालकीच्या उपभोग्य व कृषि भांडवली साधनांचा तपशिल | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मोबाईल | १७ | १५४.५ |
| २ | अन्य | २ | १८.२ |
| ३ | इलेक्ट्रिक पंप (हॉर्सपॉवर) | १ | ९.१ |
| ४ | एल. पी. जी. गॅस | ९ | ८१.८ |
| ५ | ऑईल इंजिन/मोटर | १ | ९.१ |
| ६ | जीप/चारचाकी | १ | ९.१ |
| ७ | टी. व्ही. | ९ | ८१.८ |
| ८ | पंखा | १० | ९०.९ |
| ९ | पलंग | १२ | १०९.१ |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | फर्निचर | २ | १८.२ |
| ११ | फोन | १ | ९.१ |
| १२ | फ्रीज | ५ | ४५.५ |
| १३ | मोटारसायकल | ५ | ४५.५ |
| १४ | स्टील कपाट | ११ | १०० |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण




सारणी क्रमांक ३८, ३९, ४०, ४१ व ४२ वरून असे निदर्शनास येते की प्रस्तुत प्रकल्प व प्रकल्पबाधित प्रामुख्याने डोंगराळ भागात येत असल्यामुळे येथे वर्षभर पाण्याचा पुरवठा नसतो. प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचे पिकासंबंधी विवरणावर दृष्टिक्षेप टाकला असता असे दिसून येते की एकूण प्रकल्पबाधितांपैकी ७७.७ टक्के प्रकल्पबाधित बहुपिक पद्धतीचा अवलंब करतात. फक्त १८.२ टक्के प्रकल्पबाधित रब्बी पिके घेतात. एकूणपैकी फक्त ९.१ टक्के वार्षिक पिके घेतात. ज्यांच्याकडे स्वत:चा पाणीपुरवठा शक्य आहे अशांनाच वार्षिक पिके घेणे शक्य आहे व त्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. खरीप पिकामध्ये

भात, सोयाबीन, भूईमूग, बाजरी इत्यादी पिके घेताना दिसतात तर रब्बी पिकामध्ये भूईमूग, हरभरा इ. पिके घेतात.

शेतीची उत्पादकता वाढवावयाची असेल तर कोणत्या प्रकारची शेती औजारे वापरली जातात हे महत्त्वचे असते. एकूण प्रकल्पबाधितांपैकी १८.२ टक्के प्रकल्पबाधित फवारणी औजारे वापरतात तर ४५.५ टक्के प्रकल्पबाधितांकडे नांगरणीसाठी ट्रॅक्टर आहेत. उर्वरित प्रकल्पबाधित बैल अथवा भाडेपट्ट्याने ट्रॅक्टरचा वापर करतात असे नमूद केले. २७.३ टक्के प्रकल्पबाधित हे कोणतेही औजार वापरत नाहीत. अर्थात कृषि औजारांसाठी ते भाडेपट्ट्याच्या साधनांवर निर्भर आहेत. परंतु प्रकल्पबाधित शेतकरी आपली शेती मात्र उदरनिर्वाहासाठी कसत असल्याचे दिसते. शेतीवर ते स्वत:च काम करतात व उत्पादित माल घरी उपभोगासाठी ठेवून इतर विक्री करतात. प्रकल्पबाधित आपल्या शेतीत जास्तीचे उत्पादन मिळावे म्हणून प्रयत्न करताना दिसतात. एकूण प्रकल्पबाधितांपैकी ५४.५ टक्के प्रकल्पबाधित सुधारित बियाणे वापरतात तर उर्वरित प्रकल्पबाधितांपैकी ७२.७ टक्के प्रकल्पबाधित रासायनिक खतांचा वापर करतात. अर्थात पारंपारिक बियाणे वापरणारांचे प्रमाण लक्षणियरित्या अधिक असल्याने त्यांच्या उत्पादकतेवर त्याचा निश्चित दूरगामी परिणाम संभवतो. २७.३ टक्के प्रकल्पबाधित कोणत्याही प्रकारे आधुनिक शेती न करताना दिसून येतात. कारण त्यांच्याकडील धारणक्षेत्र अत्यल्प आहे व भांडवली खर्च त्यांना परवडत नाही. जमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी सिंचन सुविधा अत्यंत महत्त्वाच्या असतात. जमिनीवर वर्षभर पिक घ्यावयाचे असेल तर सिंचन सुविधा आवश्यक असतात. परंतु प्रस्तुत प्रकल्पबाधितांकडे सिंचन सुविधा उपलब्ध नसल्याने पिक उत्पादकता कमी दिसून येते. पाण्याच्या स्त्रोतासंबंधीच्या विवरणावर दृष्टिक्षेप टाकला असता ६३.६ टक्के प्रकल्पबाधितांकडे पाण्याचे कोणतेही स्त्रोत उपलब्ध नसल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांची शेती लागवड पर्जन्यमानावर निर्भर आहे. मात्र २७.३ टक्के प्रकल्पबाधितांकडे स्वत:ची विहीर हा एकमेव सिंचन स्त्रोत आहे तर ९.१ टक्के प्रकल्पबाधितांकडे शेततळे आहे. तर ९.१ टक्के प्रकल्पबाधितांकडे बोअरवेल आहेत. बहुसंख्य प्रकल्पबाधितांकडे कोणताही सिंचन स्त्रोत नसल्यामुळे त्यांचे

शेतीविषयक उत्पन्न पर्जन्यमानावरच अवलंबून असल्याचे दिसते. यावरून आपणास प्रस्तुत प्रकल्पबाधितांच्याा एकंदरीतच आर्थिक परिस्थितीविषयी सहज कल्पना येवू शकते.

प्रकल्पबाधितांचे पिकविषयक विवरण पाहिले तर ५४.५ टक्के प्रकल्पबाधित खरीप पिके घेतात व उर्वरितांपैकी २७.३ टक्के प्रकल्पबाधित रब्बी पिके घेतात. एकही प्रकल्पबाधित उन्हाळी व बारमाही पिके घेताना दिसून येत नाही. कारण त्यांच्याकडे पाण्याच्या सुविधा उपलब्ध नाहीत. एकूण प्रकल्पबाधितांपैकी ३६.४ टक्के प्रकल्पबाधित हे कोणतेही पिक घेत नाहीत. एकतर त्यांची जमिन किफायतशीर क्षेत्र नाही किंवा त्यांना पुजारी, गुरव कामे व दुकानावरील विक्रीद्वारे चांगले उत्पन्न मिळते व त्यामुळे ते शेतीत कोणतेही पिक घेत नाहीत. बहुसंख्य प्रकल्पबाधितांकडे सिंचन सुविधा नसल्यामुळे ते व्यापारी पिके घेवू शकत नाहीत. त्यामुळे त्यांचे उत्पन्न कमी राहते. वरील बाबींचा विचार करून प्रकल्पबाधितांस त्यांच्या भूमि अधिग्रहणाचा योग्य मोबदला देणे आवश्यक आहे. कारण त्यांनी तुटपुंजी उत्पन्न देणाऱ्या जमिनींचा स्वेच्छेने त्याग केला आहे. त्यामुळे प्रस्तुत रस्ता प्रकलप विनाविलंब पूर्ण होवू शकला आहे.


सारणी क्रमांक ४२ मधून प्रकल्पबाधितांच्या कुटुंबाकडील टिकाऊ उपभोग्य वस्तू व कृषी आदानांच्या मालकी विवरणावर दृष्टिक्षेप टकाला असता असा निष्कर्ष निघतो की, इलेक्ट्रीक पंप (९.१ टक्के), ऑईल इंजिन (९.१ टक्के) इ. वगळता इतर प्रकारची कृषी गुंतवणूक केल्याचे आढळून येत नाही. भांडवली वस्तू आदाने फार कमी प्रमाणात आहेत. मात्र टिकाऊ उपभोग्य वस्तूमध्ये मोबाईल (१५४.५ टक्के), एलपीजी गॅस (८१.८ टक्के), जीप व चारचाकी वाहन (९.१ टक्के) इत्यादी आहेत. याशिवाय प्रकल्पबाधितांकडे टी. व्ही. संच, पंखा, पलंग, फर्निचर, फोन, फ्रीज, स्टील कपाट, मोटारसायकल इ. टिकावू वस्तू आहेत. टिकावू वस्तूंचा दरडोई उपभोग जीवनमान पातळी दर्शवितो. प्रकल्पबाधितांकडे टिकावू वस्तू आवश्यक इतक्याच असून त्यांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याचे यावरून आपणास लक्षात येते. कृषी भांडवली

वस्तूचे प्रमाण मात्र अत्यल्प आहे. कारण शेती कोरडवाहू स्वरूपाची केली जाते. तसेच बहुतांश प्रकल्पबाधितांचे धारणक्षेत्र आकारमान अकिफायतशीर असल्याने शेती आतबट्ट्याची आहे. त्यामुळे अकिफायतशीर सिमांत धारणक्षेत्र प्रकल्पकामी भूसंपादन झाल्याने उरलेली जमिन अधिक तुटपुंजी बनली असे वास्तव आहे.

### सारणी ४.४३: प्रकल्पबाधित कुटुंबाचे पशुधन मालकीचे प्रकारानुसार विवरण

| अ. क्र. | पशुधन | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गाय | २ | १६.७ |
| २ | पशुधन नाही | ६ | ५०.० |
| ३ | बैल | १ | ८.३ |
| ४ | म्हैस | ३ | २५.० |
| | एकूण | १२ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण




### सारणी ४.४४: प्रकल्पबाधित कुटुंबाचे पशुधनापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे विवरण

| अ. क्र. | प्रकल्पबाधितांना पशुधनापासून मिळणारे उत्पन्न | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दूध (लिटर) | १० | ९०.९ |
| २ | अंडी | १ | ९.१ |
| एकूण | | १२ | १०० |


**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

पशुधनाकडे शेतीस पूरक व्यवसाय म्हणून पाहिले जाते. कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादनात अग्रेसर आहे. प्रकल्पबाधितांकडे शेतजमीन असल्यामुळे किफायतशीर धारणक्षेत्र असलेल्या प्रकल्पबाधितांकडे पशुधन उपलब्ध आहे. एकूण प्रकल्पाबाधितांपैकी ५०.० टक्के प्रकल्पबाधितांकडे पशुधन नसून ८.३ टक्के प्रकल्पबाधितांकडे बैल, २५ टक्के प्रकल्पबाधितांकडे म्हैस व १६.७ टक्के प्रकल्पबाधितांकडे गाय असे पशुधन आहे. जवळपास निम्म्याहून अधिक प्रकल्पबाधितांकडे नियमित पूरक उत्पन्न प्राप्त होईल असे काहीही पशुधन नाही. त्यामुळे बहुतांश प्रकल्पबाधित कुटुंबाचा उदरनिर्वाह व गुजराणीचा एकमेव व्यवसाय हा शेती व्यवसाय असल्याचे दिसून येते. म्हणजेच प्रकल्पबाधितांना जर त्यांच्या प्रकल्पबाधित शेतजमिनीचा योग्य मोबदला मिळाला नाही तर त्यांच्या उदरनिर्वाहाचे नुकसान संभवते. किंबहुना त्यांचा भविष्यकाळ अनिश्चित असल्याचे दिसते. किंबहुना अशा प्रकल्पबाधितांकना आर्थिक व पायाभूत सुधारणांची शिक्षा म्हणून स्थलांतराचा मार्ग स्विकारावा लागेल. महाराष्ट्रातील कोयना प्रकल्पग्रस्तांचे उदाहरण याकामी महत्त्वाचे ठरते. कोयना प्रकल्पामुळे १९५७ साली स्थलांतरीत झालेल्या अनेक प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन रायगड जिल्ह्यात अद्यापही प्रलंबित आहे.

**सारणी ४.४५: प्रकल्पबाधितांचे कर्ज विषयक विवरण**

| अ. क्र. | प्रकल्पग्रस्तांचा कर्ज स्त्रोत | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | नाही | ३ | २७.३ |
| २ | नातेवाईक | १ | ९.१ |
| ३ | बँक | ५ | ४५.५ |
| ४ | सोसायटी | ३ | २७.३ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





प्रकल्पबाधित शेतकरी कुटुंबाची कर्जविषयक चौकशी केली असता असे निदर्शनास येते की, एकूण प्रकल्पबाधितांपैकी २७.३ टक्के प्रकल्पबाधितांनी कोणत्याही प्रकारची कर्जे घेतलेली नाहीत. ६७.७ टक्के प्रकल्पबाधितांनी मात्र विविध प्रकारची कर्जे घेतलेली आहेत. त्यापैकी ९.१ टक्के प्रकल्पबाधितांनी नातेवाईक, ४५.५ टक्के प्रकल्पबाधितांनी बँक व उर्वरित २७.३ टक्के प्रकल्पाबधितांनी सहकारी सोसायटीकडून कर्जे घेतली आहेत. संस्थात्मक स्वरूपाच्या कर्जाचे प्रमाण जास्त आहे तर बिगर संस्थात्मक खाजगी कर्जाचे प्रमाण अत्यल्प आहे. अर्थात काही प्रमाणात का होईना पण संस्थात्मक कर्जाच्या अधिक प्रमाणामुळे काहीसा धनात्मक दृष्टिकोन दिसून आला.

**सारणी ४.४६: प्रकल्पबाधितांच्या कुटुंबातील आजारांचे विवरण**

| अ. क्र. | कुटुंबातील आजापणाचे स्वरूप | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अन्य | २ | १८.२ |
| २ | काहीच नाही | ४ | ३६.४ |
| ३ | रक्तदाब | ३ | २७.३ |
| ४ | मधुमेह | ३ | २७.३ |
| ५ | ह्दयविकार | २ | १८.२ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण




अलिकडील काळात विविध प्रकारच्या आजारांचे प्रमाण वाढलेले आहे. ग्रामीण भागही त्यास अपवाद नाही. काही विशिष्ट उदा. मधुमेह, हृदयविकार, रक्तदाब, कॅन्सर इ. आजारांमध्ये अलिकडच्या काळात वाढ झाल्याने सातत्याने औषधोपचारावर खर्च होतो. प्रकल्पबाधितांच्या आजारासंबंधीच्या विवरणावर दृष्टिक्षेप टाकला असता असे निदर्शनास येते की एकूण प्रगकल्पबाधितांपैकी प्रत्येकी २७.३ टक्के प्रकल्पबाधित कुटुंबात रक्तदाब, व मधुमेह असलेले कुटुंब सदस्य आहेत. तर ८.२ टक्के प्रकल्पबाधितांच्या कुटुंबात हृदयविकार यासारख्या आजाराने ग्रस्त असलेले सदस्य आहेत. प्रकल्पबाधितांच्या कुटुंबातील सदस्यांना इतर प्रकारच्या मोसमी आजारांचा सामना करावा लागत असल्याचे नमूद केले. आजारविषयक स्थितीकडे पाहिले असता असे म्हणावे लागेल की अधिग्रहण मोबदला देत असताना तो योग्य व पर्याप्त प्रमाणात असावा जेणेकरून प्रकल्पबाधितांना न्याय मिळेल. कारण आजारपणावरील खर्चाचे प्रमाणही बऱ्यापैकी अधिक असल्याचे दिसून आले. तसेच प्रकल्पकामी उत्पन्नाचा मार्ग असलेली कृषि जमिन गेल्याने त्यांच्यासमोरील खर्चाची समस्या अधिक तीव्र बनू शकते यात शंका नाही.


**सारणी ४.४७: प्रकल्पबाधितांना इतर मार्गापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे विवरण**

| अ. क्र. | | इतर मार्गापासून मिळणारे उत्पन्न | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | | नाही | १ | ९.१ |
| २ | | किराणा दुकान | १ | ९.१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | | जागा भाड्याने | १ | ९.१ |
| ४ | | देवपुजारी | ५ | ४५.५ |
| ५ | | नोकरी | २ | १८.२ |
| ६ | | पेन्शन | २ | १८.२ |
| ७ | | व्यवसाय | २ | १८.२ |
| | | एकूण | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

आलेख 40: प्रकल्पबाधित कुटुंबाना इतर मार्गपासून मिळणारे उत्पन





सर्वच प्रकल्पबाधितांचे शेतीवर उदरनिर्वाह होण्याइतके क्षेत्र नसल्याने व सिंचन सुविधा नसल्याने उदरनिर्वाहासाठी इतर उत्पन्नाचे मार्ग शोधावे लागतात. त्यापासून उत्पन्न मिळविले जाते. एकूण प्रकल्पबाधितांपैकी १८.२ टक्के प्रकल्पबाधितांना निवृत्तीवेतनाचे उत्पन्न मिळते तर १८.२ टक्के प्रकल्पबाधितांना त्यांच्या चालू नोकरीपासून उत्पन्न मिळते. अर्थात असे उत्पन्न मिळणाऱ्या कुटुंब सदस्यांची संख्या अत्यल्प आहे. एकूण प्रकल्पबाधितांपैकी ४५.५ टक्के प्रकल्पबाधित हे जोतिबा देवस्थानमध्ये देवपुजारी म्हणून कामे करतात व त्यातून त्यांना उत्पन्न मिळते. अर्थात देवपूजेतून रोज उत्पन्न मिळत नाही. कारण अनेक पिढ्या चालत आलेल्या या कामी संबंधित कुटुंबाचा विस्तार झाल्याने प्रत्येक कुटुंबाची पाळी येण्यास कालावधी जावा लागतो. ४९.१ टक्के प्रकल्पबाधितांना किराणा दुकान व ९.१ टक्के प्रकल्पबाधितांना जागा भाड्याने देवून उत्पन्न मिळते. एका प्रकल्पबाधिताला मात्र इतर मार्गापासून कोणतेही उत्पन्न मिळत नाही. उत्पन्न विरणावरून

असे लक्षात येते की प्रकल्पबाधितांकडे बेताचीच स्थिती असल्यामुळे योग्य मोबदला देवून त्यांना जगण्यासाठीची मदत व भविष्याच्या आयुष्याची तजवीज करता येवू शकते.

**सारणी ४.४८: प्रकल्पबाधितांचे पिक विवरण**

| अ. क्र. | प्रकल्पबाधितांच्या पिक उत्पादनाचा तपशिल | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | काहीच नाही | १ | ९.१ |
| २ | गवत | १ | ९.१ |
| ३ | नाचणी | १ | ९.१ |
| ४ | प्रतिसाद नाही | २ | १८.२ |
| ५ | भात | ५ | ४५.५ |
| ६ | भूईमूग | ३ | २७.३ |
| ७ | रताळे | १ | ९.१ |
| ८ | शाळू | १ | ९.१ |
| ९ | सोयाबीन | २ | १८.२ |
| १० | हरभरा | १ | ९.१ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





प्रकल्पबाधितांच्या पिक विवरण स्थितीचा अभ्यास केल्यास असे निदर्शनास येते की प्रकल्पबाधितांकडील पिके मिश्र स्वरूपाची दिसून येतात. यामध्ये खरीप व रब्बी पिकांचा

समावेश आहे. एकाही प्रकल्पबाधिताकडे ऊसासारखे व्यापारी व वार्षिक पिक घेतले जात नसून त्यांना त्यामुळे खात्रीचे उत्पन्न मिळत नाही. पिकामध्ये भात पिकाची लागवड करणाऱ्यांचे प्रमाण ४५.५ टक्के इतके असून त्यानंतर दुसऱ्या क्रमांकाचे पिक (२७.३ टक्के) भूईमूग हे आहे. तर (१८.२ टक्के) सोयाबीन पिकाचा यानंतर क्रमांक लागतो. प्रामुख्याने भात, भूईमूग व सोयाबीन ही पिके घेतली जातात असे दिसून येते. उर्वरित पिकांमध्ये नाचणी, शाळू, रताळे, हरभरा या पिकांचा समावेश आहे. प्रकल्पबाधितांची पिक संरचना संमिश्र स्वरूपाची असल्याचे निदर्शनास येते. कोरडवाहू पिकापासून मिळणारे उत्पन्न हे खात्रीशीर नाही. त्यामुळे त्यांना प्रकल्पबाधित क्षेत्रास योग्य मोबदला देवून स्थैर्य मिळवून देता येवू शकते. परंतु तसा जाणिवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे. कारण सिंचन सुविधा उपलब्ध नसल्यामुळे पर्जन्य निर्भर पिके घ्यावी लागतात.

**सारणी ४.४९: प्रकल्पबाधितांचे शासनाकडे मागणी विषयक विवरण**

| अ. क्र. | शासनाकडून प्रकल्पबाधितांच्या अपेक्षा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | जमिन व घराची किंमत बाजारभावाप्रमाणे | १ | ९.१ |
| २ | अन्य | १ | ९.१ |
| ३ | जमिनीचा योग्य दर ठरवावा | १० | ९०.९ |
| ४ | जमिनीच्या बदल्यात जमिन | २ | १८.२ |
| ५ | प्रकल्पगस्तास नोकरी | २ | १८.२ |
| ६ | बाजारभावापेक्षा जास्त दर | ६ | ५४.५ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण




बहुतांश प्रकल्पबाधितांना (५४.५ टक्के) त्यांच्या प्रकल्पबाधित जमिनीच्या मोबदल्यात प्रचलित बाजारभावापेक्षा जास्त दर/मोबदला हवा आहे. एकूण प्रकल्पबाधितांपैकी ९०.९ टक्के प्रकल्पबाधितांनी जमिनीचा योग्य दर ठरवावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. मात्र १८.२ टक्के प्रकल्पबाधितांनी जमिनीच्या मोबदल्यात जमिन मिळावी असे मत नोंदविले असून उर्वरित १८.२ टक्के प्रकल्पबाधितांनी त्यांच्या कुटुंबातील किमान एका सदस्यास सरकारी नोकरी मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. एकूण प्रकल्पबाधितांपैकी ६३.६ टक्के प्रकल्पबाधितांनी घराची व जमिनीची किंमत बाजारभावापेक्षा जास्त मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. अर्थात प्रचलित बाजारभावाच्या चारपट मोबदला २०१३ च्या भूमि अधिग्रहण, पुनर्वसन व पुनरनिवास कायद्यानेही देवू केला आहेच. प्रकल्पबाधित त्यांची जमिन पायाभूत सुविधा निर्माण करण्यास व त्याचे लाभ अनेकांना व्हावेत अशा धारणेतून लोककल्याणाच्या भावनेने आपल्या जमिनी प्रकल्पास देतात. प्रकल्पास जमिन दिल्यामुळे त्यांचे पिढ्यानपिढ्याचे व कायमस्वरूपी उदरनिर्वाहाचे साधन निघून जाते व जमिन मालकीही संपुष्टात येते. यामुळे प्रकल्पबाधितांच्या याच पिढीचे नुकसान होत नसून येणाऱ्या अनेक पिढ्यांचे नुकसान होते. त्यामुळे त्याचा विचार करून त्यांना योग्य मोबदला आदा करणे आवश्यक आहे. प्रकल्पबाधनाचा मोबदला देताना प्रकल्पोपरांत जमिनीच्या भांडवली मूल्यवर्धीताचाही विचार होणे आवश्यक आहे.

**सारणी ४.५०: प्रकल्पबाधितांना प्रकल्पामुळे होणाऱ्या फायद्यासंबंधीचे विवरण**

| अ. क्र. | प्रकल्पबाधितांच्या प्रकल्पपूर्तीतून अपेक्षा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | जमिनीला योग्य किंमत | ७ | ६३.६ |
| २ | रोजगार मिळेल | ९ | ८१.८ |
| ३ | रोजगाराच्या संधी निर्माण होतील | ४ | ३६.४ |
| ४ | सांगता येत नाही | १ | ९.१ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





प्रकल्पबाधितांना महामार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर होणाऱ्या लाभाची विचारणा केली असता एकूण प्रकल्पबाधितांपैकी ६३.६ टक्के प्रकल्पबाधितांनी उर्वरित जमिनीला अधिक किंमत येईल असे मत व्यक्त केले. ८१.८ टक्के प्रकल्पबाधितांनी रोजगार मिळेल असे म्हटले तर ९.१ टक्के प्रकल्पबाधितांनी याबाबतीत कोणतेही मत व्यक्त केले नाही. अलिकडीलच्या काळातील रस्ते विकास झाल्यानंतर आजूबाजूच्या जमिनीचे भाव वाढल्याचे दिसते व अधिकच्या रोजगार संधीही निर्माण होताना दिसून येतात. यामध्ये बहुसंख्य रोजगार संधी या स्वयंरोजगार स्वरूपाच्या आहेत. परंतु प्रकल्पबाधितांची जमिन प्रकल्पात जाते आणि बहुतेकदा प्रकल्पोपरांत लाभधारक इतर लोक असतात हे देखील वास्तव आहे.


**सारणी ४.५१: प्रकल्पबाधितांकडे प्रकल्पबाधन क्षेत्राच्या पश्चात राहिलेल्या जमिनीचे विवरण**

| अ. क्र. | प्रकल्पबाधित | प्रकल्पोपरांत शिल्लक जमिन (एकर) |
|---|---|---|
| १ | १ | १.० |
| २ | २ | ०.८ |
| ३ | ३ | २.२ |
| ४ | ४ | ०.८ |
| ५ | ५ | १.३ |
| ६ | ६ | ११.० |
| ७ | ७ | ०.७ |
| ८ | ८ | ०.५ |
| ९ | ९ | १.६ |
| १० | १० | ३.५ |

| | | |
|---|---|---|
| ११ | ११ | प्रतिसाद नाही |
| **एकूण** | | ११ |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





प्रकल्पबाधितांकडे प्रकल्पबाधन क्षेत्राच्या पश्चात राहिलेल्या उर्वरित जमिनीचा आढावा घेतला असता असे दिसते की केवळ एका प्रकल्पबाधिताकडे ११ एकर एवढी जमिन शिल्लक राहते. एकूण प्रकल्पबाधितांपैकी ३६.३६ टक्के प्रकल्पबाधितांकडे एक एकरपेक्षा

कमी जमिन शिल्लक राहते तर ९.०९१ टक्के प्रकल्पबाधितांकडे ३.५ एकर एवढी जमिन शिल्लक राहते. एकूण ११ पैकी ७ प्रकल्पबाधितांकडे शिल्लक राहिलेली जमिन उदरनिर्वाहासाठी पुरेशी नसून पर्यायाने ती किफायतशीर नाही. यामुळे अधिग्रहण मोबदला देत असताना या बाबींचा विचार होणे आवश्यक आहे. तसेच शिल्लक जमिनीतही प्रस्तुत प्रकल्पबाधित तयार झालेल्या नविन रस्त्याच्या मध्यापासून तीस मिटरपर्यंतच्या जमिनीत कायमस्वरूपी सुधारणा करू शकत नाहीत. त्यामुळे वास्तवातील प्रकल्पबाधन अधिक जमिनीचे झाले असे गृहित धरणे आवश्यक आहे. कारण अशा जमिनीवरही प्रकल्पग्रस्तांची खऱ्या अर्थाने मालकी शिल्लक राहिलेली नाही. त्यामुळे अधिग्रह मोबदला आदा करताना अशा अप्रत्यक्ष अधिग्रहणाचा समावेश मूळ अधिग्रहणात करून सर्वच जमिनीकरीता मोबदला आदा करणे आवश्यक आहे.

**सारणी ४.५२: प्रकल्पबाधित जमिन विषयक विवरण**

| अ. क्र. | प्रकल्पबाधित | जमिन (एकर) |
|---|---|---|
| १ | १ | प्रतिसाद नाही |
| २ | २ | ०.३ |
| ३ | ३ | २.१ |
| ४ | ४ | २.२ |
| ५ | ५ | २.२ |
| ६ | ६ | ०.३ |
| ७ | ७ | प्रतिसाद नाही |
| ८ | ८ | ०.२ |
| ९ | ९ | प्रतिसाद नाही |
| १० | १० | ०.२ |
| ११ | ११ | ०.७ |
| एकूण | | |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





प्रकल्पबाधित एकूण जमिनीचे विवरण पाहता एकूण प्रकल्पबाधितांपैकी ७२.७३ टक्के प्रकल्पबाधितांनी माहितीस प्रतिसाद दिला असून त्याची सर्वांची एकूण मिळून ८.१ एकर इतकी जमिन प्रकल्पामध्ये बाधीत झालेली आहे. २७.२७ टक्के प्रकल्पबाधितांनी याबाबत प्रतिसाद दिलेला नाही. प्रस्तुत आकडेवारीवरून आपणास प्रती प्रकल्पबाधित शेतकऱ्याच्या एकूण प्रकल्पबाधित जमिनीचा अंदाज येतो. याकरीता वाचकाने उपरोल्लेखित सारणी क्रमांक ५२ वर काटेकोरपणे दृष्टिक्षेप टाकणे अपेक्षित आहे.

**सारणी ४.५३: रस्त्याच्या मध्यापासून ३० मिटरप्रमाणे बाधित झालेली जमिन (एकर)**

| अ. क्र. | प्रकल्पबाधित | जमिन (एकर) |
|---|---|---|
| १ | १ | प्रतिसाद नाही |
| २ | २ | ०.३ |
| ३ | ३ | ०.८ |
| ४ | ४ | २.२ |
| ५ | ५ | ०.८ |
| ६ | ६ | ०.५ |
| ७ | ७ | प्रतिसाद नाही |
| ८ | ८ | ०.७ |
| ९ | ९ | प्रतिसाद नाही |
| १० | १० | ०.२ |

| | | |
|---|---|---|
| ११ | ११ | ०.७ |
| **एकूण** | | ६.२ |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण




रस्त्याच्या मध्यापासून ३० मिटर प्रमाणे बाधीत झालेली जमिन पाहता ३५.४८ टक्के जमिन ही मात्र एका प्रकल्पबाधिताची गेली असून उर्वरित प्रकल्पबाधितांची प्रत्येकी एक एकरपेक्षा कमी जमिन प्रकल्पकामी गेल्याचे दिसते. उपरोल्लेख केल्याप्रमाणे प्रकल्पाव्यतिरिक्त रस्त्याच्या मध्यापासून तीस मिटरपर्यंतच्या जमिनीवरही अप्रत्यक्ष अधिग्रहण झाल्याचे मान्य करावे लागेल. कारण अशा जमिनवीर संबंधित प्रकल्पबाधित शेतकरी कायमस्वरूपीच्या सुधारणा करू शकत नाहीत. उदा. रस्त्याच्या कडेला स्वत:च्या जमिनीत घर बांधकाम, विहीर किंवा एखाद्या व्यवसायासाठीही बांधकाम करू शकत नाहीत. त्यामुळे अशा जमिनीच्या अधिग्रहणामुळे शेतकऱ्यांना जमिनीचा वापर करता येत नाही. परंतु प्रकल्प अधिकारी किंवा पुनर्वसन अधिकारी मात्र अशा अप्रत्यक्ष परंतु वास्तव प्रकल्पबाधनाचा विचार करत नाहीत. एकंदरीतच प्रकल्प अधिकारी प्रकल्प अधिग्रहण मोबदला कमी करण्याचा विचार करतात असे इतरही सर्वच प्रकल्पांच्या बाबतीतही दिसून येते. त्यामुळे प्रस्तुत प्रकल्प अधिकाऱ्यांकडूनही वेगळी व आदर्श अपेक्षा करणे शक्य नाही.

**तक्ता ४.५४: प्रकल्पबाधितांनी विकलेल्या जमिनीसंबंधीचे विवरण (एकर)**

| अ. क्र. | प्रकल्पबाधित | जमिन (एकर) |
|---|---|---|
| १ | १ | प्रतिसाद नाही |
| २ | २ | प्रतिसाद नाही |
| ३ | ३ | ०.१ |
| ४ | ४ | प्रतिसाद नाही |
| ५ | ५ | ०.१ |
| ६ | ६ | प्रतिसाद नाही |
| ७ | ७ | प्रतिसाद नाही |
| ८ | ८ | ०.७ |
| ९ | ९ | प्रतिसाद नाही |
| १० | १० | ०.९ |
| ११ | ११ | प्रतिसाद नाही |
| **एकूण** | | १.७८ |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

एकूण प्रकल्पबाधितांपैकी ३६.३६ टक्के प्रकल्पबाधितांनी त्यांची जमिन विकल्याचे नमूद केले आहे. या सर्वांनी मिळून एकूण १.७८ एकर इतकी जमिन विक्री केली आहे. कारण शेतकऱ्यांना अनेक कारणांसाठी पैसा आवश्यक असतो. परंतु पतक्षमता कमी व पर्यायी उत्पन्नाचे मार्ग उपलब्ध नसल्यामुळे जमिन विकून पैसा उभा करण्याशिवाय पर्याय नसतो. त्यामुळेच या सर्व प्रकल्पबाधितांनी आपल्या शेतजमिनीची विक्री केल्याचे निदर्शनास आले.

**सारणी ४.५५: प्रकल्पबाधितांनी विकलेल्या जमिनीपैकी ३० मिटर कक्षेत येणारी जमिन (एकर)**

| अ. क्र. | प्रकल्पबाधित | ३० मिटर कक्षेतील विकलेली जमिन (एकर) |
|---|---|---|
| १ | १ | प्रतिसाद नाही |
| २ | २ | प्रतिसाद नाही |
| ३ | ३ | प्रतिसाद नाही |
| ४ | ४ | प्रतिसाद नाही |
| ५ | ५ | प्रतिसाद नाही |
| ६ | ६ | प्रतिसाद नाही |
| ७ | ७ | प्रतिसाद नाही |
| ८ | ८ | ०.१ |
| ९ | ९ | १.६ |
| १० | १० | ०.१ |
| ११ | ११ | प्रतिसाद नाही |
| एकूण | | १.८ |


**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

रस्त्याच्या मध्यापासून ३० मिटर प्रमाणे बाधीत झालेली व विक्री केलेली जमिन पाहता ३६.३ टक्के जमिन ही मात्र एका प्रकल्पबाधिताची विकली गेली असून उर्वरित प्रकल्पाबधितांची विक्री केलेली जमिन प्रत्येकी एक एकरपेक्षा कमी असल्याचे दिसते. विशेष म्हणजे रस्ता प्रकल्प झाल्यामुळे कडेच्या जमिनीस अधिक भावाच्या अपेक्षेने प्रकल्पबाधित जमिनमालकांनी जमिन विकली व व्यवसायाच्या अपेक्षेने खरेदी करणाऱ्याने खरेदी केली. परंतु यापैकी एकासही प्रस्तुत जमिनीत कायमस्वरूपी निर्माण किंवा व्यवसायाकरीता या जमिनीचा वापर करता येणार नाही याची पूर्वकल्पना नव्हती. त्यामुळे असे विक्री व्यवहार चुकीचे आहेत असे प्रकल्प अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. परंतु अशा प्रकल्पबाधितांचा विनियोग अधिकार नसलेल्या जमिनीकरीता मोबदला देण्यास मात्र प्रकल्प अधिकारी तयार नाहीत.

## सारणी ४.५६: प्रकल्पबाधित कुटुंबातील सदस्यांचे विवरण

| अ. क्र. | कुटुंब सदस्यांचे विवरण | संख्या | टक्केवारी | लिंग प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | पुरुष | २१ | २५.६ | १०४७.६ |
| २ | महिला | २२ | २६.८ | |
| ३ | मुले | १३ | १५.९ | १३८४.६ |
| ४ | मुली | १८ | २२.० | |
| ५ | वृद्ध | ८ | ९.८ | |
| **एकूण** | | ८२ | १०० | |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





प्रकल्पबाधित कुटुंबातील जनगणना विवरणावर दृष्टिक्षेप टकाला असता पुरुषांचे प्रमाण २५.६ टक्के तर महिलाचे प्रमाण २६.८ टक्के इतके असून मुलांचे प्रमाण १५.९ टक्के तर मुलींचे प्रमाण २२.०० टक्के इतके आहे. वृद्ध व्यक्तीचे प्रमाण ९.८ टक्के इतके आहे. महत्त्वाची बाब म्हणजे प्रकल्पबाधितामध्ये मुले व मुलींचे लिंग प्रमाण १३८४.६ इतके आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्याच्या पन्हाळा तालुक्याचे लिंग प्रमाण संपूर्ण राज्य पातळीवर पुरुषसत्ताक व्यस्त असल्याचे दिसून येते. परंतु प्रकल्पबाधित कुटुंबांच्या बाबतीत मात्र यामध्ये आश्चर्यकारक तफावत असल्याचे निर्दर्शनास आले.

## सारणी ४.५७: प्रकल्पबाधितांचे वयोगामानुसार कुटुंब सदस्यांचे विवरण

| अ. क्र. | वयोमानानुसार प्रकल्पबाधित कुटुंब सदस्यांचे विवरण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १ – १८ वर्षे | १६ | १९.५ |
| २ | १८ – ३६ वर्षे | २२ | २६.८ |
| ३ | ३६ – ५४ वर्षे | १० | १२.२ |
| ४ | ५४ – ७२ वर्षे | ७ | ८.५ |
| ५ | ७२ – ९० वर्षे | ४ | ४.९ |
| ६ | प्रतिसाद नाही | २३ | २८.० |
| ७ | एकूण | ८२ | १०० |
| **सरासरी वय** | | ४६.२ | |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण




प्रकल्पबाधित कुटुंबातील सदस्यांचे वयोमानानुसार विवरण पाहिले असता आपणास असे दिसते की १ ते १८ वयोगटातील १९.५ टक्के, १८ ते ३६ मध्ये २६.८ टक्के, ३६ ते ५४ मध्ये १२.२ टक्के, ५४ ते ७२ मध्ये ८.५ टक्के व ७२ ते ९० मध्ये ४.९ टक्के तर एकूण प्रकल्पबाधितांपैकी २८ टक्के प्रकल्पबाधितांनी कोणताही प्रतिसाद नोंदविला नाही. प्रकल्पबाधितांचे सरासरी वय ४६.२ टक्के इतके आहे. एकूण प्रकल्पबाधितांपैकी ५८.५ टक्के इतके प्रकल्पबाधित हे वय वर्षे ५४ च्या आतील आहेत. यावरून एक महत्त्वाची बाब लक्षात घेणे आवश्यक आहे व ती म्हणजे प्रस्तुत तुलनेने तरूण वयोगटात येणाऱ्या

प्रकल्पबाधितांचे योग्य पुनर्वसन होणे आवश्यक आहे. कारण या सर्व तरूण वयोगटातील प्रकल्पबाधितांच्या आर्थिक जबाबदाऱ्या निश्चितपणे अधिक असल्याने पुनर्वसन मेबदला व शक्य असल्यास कुटुंबातील एका व्यक्तीस नोकरीचाही विचार होणे आवश्यक आहे.

**सारणी ४.५८: प्रकल्पबाधितांच्या जमिनधारणेविषयीचे विवरण**

| अ. क्र. | जमिन धारणा | एकर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | एकूण जमिन धारणा | ४५.७ | ० |
| २ | लागवडीखालील क्षेत्र | १६.० | ३५.०१ |
| ३ | लागवडयोग्य पड जमिन | १९.२ | ४२.०१ |
| ४ | जंगल व पडिक जमिन | १०.५ | २२.९८ |
| ५ | खंडाने घेतलेली जमिन | ० | ० |
| ६ | खंडाने दिलेली जमिन | ० | ० |
| ७ | सिंचनाखालील जमिन | ० | ० |
| ८ | वनखात्याची अतिक्रमित जमिन | ० | ० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण


प्रकल्पबाधितांचे एकूण जमिनविषयक विवरण पाहता असे निर्देशनास येते की त्यांची एकूण जमिनधारणा ४५.७ एकर असून त्यापैकी १६ एकर हे लागवडीखालील क्षेत्र आहे. लागवडयोग्य पडजमिन १९.५ एकर इतकी असून जंगल व पडिक जमिन १७.५ एकर इतकी आहे. एकूण जमिनीचा विचार केला असता ती ८५.२ एकर इतकी आहे. म्हणजेच एकूण जमिनधारणेपैकी फक्त ३५.०१ टक्के इतकीच जमिन लागवडक्षम असल्याने प्रकल्पबाधितांच्या आर्थिक स्थितीची कल्पना येते.

## सारणी ४.५९: प्रकल्पबाधितांकडील जमिनीचा एकरी दर

| अ. क्र. | प्रकल्पबाधित क्षेत्रातील शेतजमिनीची सरासरी बाजार किंमत | सरासरी बाजारभाव (किंमत) |
|---|---|---|
| १ | मध्यम जमिन | ३४,२०००० |
| २ | बागाईत जमिन | ४८,३३३३३.३३ |
| ३ | सरासरी किंमत | ४१,२१६६६.६७ |
| ४ | प्रकल्पापूर्वीचा बाजारभाव | १०००००.०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

**आलेख 51:** प्रकल्पबाधित क्षेत्रातील शेतजमिनीची सरासरी बाजार किंमत





कोणत्याही विकास प्रकल्पोपरांत परिसरातील जमिनींची किंमत वधारते. कारण संबंधित परिसरात जमिनीचे मूल्य भांडवलीकरण होवून किंमत वाढीची प्रक्रिया सुरू होते. असाच अनुभव प्रस्तुत प्रकल्पाच्या बाबतीतही येतो आहे. याचे महत्त्वाचे कारण पायाभूत सुविधा व प्रकल्पोपरांत संबंधित भागाचा व्यापारी स्वरूपाचा विकास घडून येतो. तसेच कोणत्याही भागातील जमिनीच्या बाजार किंमती या संबंधित भागातील सरकारी दरापेक्षा अधिक असतात. परंतु अशा वास्तव बाजार किंमती कागदोपत्री येत नसल्यामुळे पुनर्वसन मोबदला देताना प्रकल्प विभाग संबंधित बाजार किंमतीकडे सोईस्कर दुर्लक्ष करताना दिसून येतात. त्याकरीता प्रस्तुत सापनि अभ्यासगटाने प्रत्येक प्रकल्पबाधितास तसेच परिसरातील इतर लोकांना विचारून प्रकल्पभागातील जमिनीच्या सरासरी किंमतीचा अंदाज घेण्याचा प्रयत्न केला असता सारणी क्रमांक ५९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे किंमती मिळाल्या. प्रकल्पपूर्तीपूर्वीच्या किंमतीचा विचार केला तर प्रकल्पोपरांत जमिनीच्या किंमतीत किमान चारपट वृद्धी झाल्याचे दिसून आले. त्यामुळे प्रस्तुत प्रकल्पबाधितांना त्यांच्या बाधित जमिनीचा मोबदला देताना प्रस्तुत बाजार किंमतीचा जरूरपणे विचार

केला गेला पाहिजे असे सापनि अभ्यासगटाचे स्पष्ट मत आहे. नव्हे तसे २०१३ च्या भूमि अधिग्रहण, पुनर्वसन व पुनरनिवास कायद्यात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

**सारणी ४.६०: प्रकल्पबाधितांचे रस्त्याच्या कामातील त्रुटीसंबंधीचे विवरण**

| अ. क्र. | प्रकल्प कामातील त्रुटी | निवेदक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गटारी नाहीत | २ | १८.२ |
| २ | मोरी नाहीत | १ | ९.१ |
| ३ | मोरीचे काम अपूर्ण | २ | १८.२ |
| ४ | तटबंदी नाही | १ | ९.१ |
| ५ | रस्ता खचत आहे | १ | ९.१ |
| ६ | पाईप घातले नाहीत | १ | ९.१ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण





प्रकल्पबाधितांनी रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर काही त्रुटी राहिल्यामुळे प्रकल्पबाधितानी संबंधित त्रुटी सापनि अभ्यासगटाच्या निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. या विवरणावर दृष्टिक्षेप टाकला असता असे निदर्शनास येते की, १८.२ टक्के प्रकल्पबाधितांच्या मते रस्त्याच्या दुतर्फा पाणी वाहून जाण्याचे पाट तयार केलेले नाहीत, ९.१ टक्के प्रकल्पबाधितांच्या मते मोरी बांधलेल्या नाहीत, ९.१ टक्के प्रकल्पबाधितांच्या मते योग्य प्रकारे तटबंदी नाही तर ९.१ टक्के प्रकल्पबाधितांच्या मते रस्ता खचत चालला आहे. कारण हा प्रदेश महाराष्ट्राच्या अधिक पर्जन्यमानाच्या परिसरात येतो. रस्त्याच्या कामामध्ये अनेक त्रुटी राहिल्या असल्याची मते प्रकल्पबाधितांनी नोंदवली आहेत. या

त्रुटी दूर करून प्रकल्पबाधितांना योगय मोबदला देणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा पाणी वाहून जाण्यासाठी पाट काढले नाहीत अशा अनेक ठिकाणी उतारावरचे पाणी प्रकल्पबाधितांच्या उर्वरित शेतात जावून त्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाल्याचे दिसून आले.

**सारणी ४.६१: प्रकल्पबाधितांना प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर झालेल्या नुकसानीसंबंधीचे विवरण**

| अ. क्र. | प्रकल्पोपरांत प्रकल्पबाधितांचे नुकसान | निवेदक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पिकात पाणी शिरते | ३ | २७.३ |
| २ | शेतजमिनीची झीज होते | १ | ९.१ |
| ३ | शेती करता येत नाही | १ | ९.१ |
| **एकूण** | | ११ | १०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण




सारणी क्रमांक ६१ मधील आकडेवारीवरून असे निदर्शनास येते की प्रकल्पाच्या कामामध्ये त्रुटी राहिल्याने प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पबाधितांना काही नुकसान सहन करावे लागत आहे. यामध्ये २७.३ टक्के प्रकल्पबाधितांनी पावसाळ्यामध्ये रस्त्यामुळे त्यांच्या शेतात पाणी शिरते व पिके वाहून जातात असे म्हटले तर ९.१ टक्के प्रकल्पबाधितांनी रस्त्याचे काम व्यवस्थित न झाल्यामुळे त्यांच्या शेतजमिनीत पाणी जावून झीज होते असे नमूद केले. तर ९.१ टक्के प्रकल्पबाधितांच्या मते रस्त्याच्या कामामुळे त्यांच्या शेताचे दुतर्फा दोन तुकड्यांत रूपांतर झाल्यामुळे उर्वरित अरूंद शेतपट्टीत मशागत करणे अवघड व जिकिरीचे बनले आहे असे नमूद केले. त्यामुळे

त्यांना किफायतशीरपणे शेती करता येत नाही. प्रकल्पानंतर प्रकल्पबाधितांच्या उर्वरित मालमत्तेचे प्रकल्पामुळे नुकसान होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक असून जर त्यांचे नुकसान होत असेल तर त्यांना त्याची अतिरिक्त नुकसान भरपाई दिली पाहिजे. अर्थात याकामी सर्व जबाबदारी प्रकल्प विभागाकडे देणे आवश्यक आहे. प्रकल्पबाधितांना कोणताही आर्थिक त्रास व नुकसान होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. कारण प्रकल्पबाधितांनी त्यांच्या उपजिविकेचे एकमेव साधन असलेली शेतजमिन बिनशर्तपणे प्रकल्पास दिली असल्याने एकतर त्यांच्या जमिनीचे योग्य मूल्यांकन होणे आवश्यक आहे. तसेच प्रकल्पोपरांत उर्वरित जमिनीचे नुकसान होणार नाही याकडे लक्ष देण्याची प्रमुख जबाबदारी प्रकल्प विभागाने टाळता कामा नये.

# प्रकरण: ५
# निष्कर्ष,शिफारशी व उपशमन योजना

प्रस्तुत सापनि अहवाल प्रामुख्याने प्राथमिक माहितीवर आधारित असून त्याकामी सापनि अभ्यासगटाने अनेकदा प्रकल्पस्थळी भेटी देवून प्रकल्पबाधीत जमिन मालकांशी संवाद साधला आहे. तसेच सर्व प्रकल्पबाधित जमिन मालकांस एकत्रित बोलावून सघन समूह चर्चांचे (FGDs) आयोजन करण्यात आले होते. सदरच्या समूह चर्चा जोतिबा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या विश्रामगृहाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आल्या होत्या. तसेच प्रकल्पस्थळी व प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या घरीही याकामी चर्चा घडवून आणल्या होत्या व प्रकल्पबाधितांशी संवाद साधला होता. तसेच सार्वजनिक बांधकाम खात्याचे अधिकारी व कोल्हापूर सार्वजनिक बांधकाम अभियंता यांच्या कार्यालयासही भेट देवून संबंधित विभागातील प्रस्तुत प्रकल्पबाधित व प्रकल्पासंबंधित कागदपत्रे मिळविली. त्याचप्रमाणे सर्व प्रकल्पगंस्ताबरोबरच्या सघन समूह चर्चा (FGDs) व सुनावणीचे आयोजन जोतिबा विश्रामगृह प्रांगणात व शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागात करण्यात आले होते. यानंतरच्या टप्प्यात सर्व प्रकल्पग्रस्तांसाठी एक प्रश्नावली तयार करून प्रत्यक्ष प्रकल्पस्थळी जावून तसेच प्रकल्पग्रस्तांच्या घरी भेटी देवून प्रत्यक्ष मुलाखती घेवून प्रश्नावलीत माहिती संकलित केली असल्याने प्रस्तुत सापनि अहवाल सत्यतेवर आधारित प्राथमिक व द्वितीय माहितीवर बेतला आहे. प्रस्तुत प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसन मोबदला विलंबाचे महत्त्वाचे कारण म्हणजे भूमी अधिग्रहण व जमीन मोबदल्यासंबंधी निर्माण झालेली समस्या होय. तसेच प्रकल्प पूर्ण झाला असल्याने प्रकल्प विभाग अधिकारीही काहीसे निवांत झाले असल्याने प्रकल्पबाधित शेतकऱ्यांची एकप्रकारे फरपट होताना दिसून आली. तसेच सार्वजनिक बांधकाम खाते पातळीवरील प्रशासकीय विलंबामुळेही पुनर्वसन मोबदल्याचे काम रेंगाळले आहे.

मौजे केर्ली तर्फ वाडी रत्नागिरी, ता. पन्हाळा येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चारला जोडणाऱ्या रिंगरोडसाठी (बाह्य वळण)प्रकल्पबाबत सर्व बाबींचा शास्त्रोक्त अभ्यास होवून उभयपक्षी (सरकार व प्रकल्पबाधीत) मान्य होवू शकेल असा तोडगा निघण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागात आम्ही प्रस्तुत अभ्यास करून हा अहवाल सादर करत आहोत.

अभ्यास अहवालाच्या या प्रकरणात आम्ही आमच्या अभ्यासावर आधारित प्रमुख निष्कर्ष व अनुमाण नोंदवित आहोत. तसेच निम्नउर्ध्वृत निष्कर्ष व अनुमान राष्ट्रीय पातळीवरील काही द्वितीय माहितीचाही आधार घेतात याची नोंद घ्यावी.

१. राष्ट्रीय नमुना पाहणी (NSSO; 2005) २००५ च्या अहवालानुसार देशातील एकूण ४० टक्के शेतकऱ्यांना शेती व्यवसाय नकोसा झालेला आहेच. या प्रमाणात नंतरच्या काळात वाढसुद्धा झाली असणार (Dhanmanjiri Sathe; 2016). याचे प्रमुख कारण कृषी क्षेत्रावरील संकटात सापडते. अशावेळी जर शेतकऱ्यांना त्यांच्या प्रकल्पबाधित जर जमिनींच्या मोबदल्यात योग्य रक्कम अथवा पर्यायी जमीन आणि रोजगाराच्या संधी निर्माण करून दिल्या तर ते निश्चितपणे आपली शेतजमीन देण्यास तयार होतात असेही दिसून आले आहे. किंबहुना देशाच्या सर्व विकास प्रकल्पांत प्रामुख्याने शेतकरीवर्गाचाच अधिक त्याग असल्याच्या नोंदी सापडतात.

२. देशाच्या पायाभूत विकासकामात सर्वाधिक योगदान शेतकरी वर्गाचेचे असल्याचा इतिहास आहे. कारण देशातील अनेक प्रकारच्य पायाभूत सुविधा व विकास कामांसाठी शेतकऱ्यांनी आपले एकमेव उदरनिर्वाहाचे साधन असलेल्या शेतीचा त्याग केला आहे. परंतु बहुतेक प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन अनेक दशके प्रलंबित आहे हे देखील वास्तव आहेच.

३. जमीन अधिग्रहणावरून भारत तसेच इतर आशियायी देश व आफ्रिकी देशांतही अनेक तंटे उद्भवले (Cao et.al. 2008; FAO; 2009) असा इतिहास आहेच.

भारतातील प्रमुख उदाहरणात पश्चिम बंगालमधील नंदिग्राम, सिंगूर (Maitreesh Ghatak et.al. 2010)आणि महाराष्ट्रातील नवी मुंबईचा महा मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र व गोवा विशेष आर्थिक क्षेत्र (Dhanmanjiri Sathe; 2016) इत्यादींचा समावेश करावा लागेल. अगदी अलिकडचे उदाहरण घ्यावयाचे ठरल्यास रत्नागिरी, नाणार व मुंबई–नागपूर समृद्धी महामार्गाचे घेता येईल.

४. प्रस्तुत प्रकल्पासाठीचे एकूण भूसंपादन खाजगी व सार्वजनिक ७/१२ असे एकूण २९ जमिनींच्या तुकड्यांचे असून एकूण प्रकल्पबाधितांची सर्वेक्षण संख्या अकरा इतकी आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांचेकडील सुधारित मंजूर विकास आराखड्याच्या मौजे केर्ली तर्फ वाडी रत्नागिरी हद्द येथील आरक्षित खाजगी जमिन राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चारला जोडणाऱ्या रिंगरोडसाठी संपादन करणेबाबतचा भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडून उपविभागीय अधिकारी, कोल्हापूर (पन्हाळा) यांचेकडे आल्यानंतर तो अर्थशास्त्र विभागास प्राप्त झाला.

५. प्रस्तुत सापनि अहवाल प्रामुख्याने प्राथमिक माहितीवर आधारित असून त्याकामी सापनि अभ्यासगटाने अनेकदा प्रकल्पस्थळी भेटी देवून प्रकल्पबाधीत जमिन मालकांशी संवाद साधला आहे. तसेच सर्व जमिन मालकांस प्रकल्पक्षेत्री व जोतिबा विश्रामगृहावर आणि शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागात प्रकल्पबाधितांच्या व सापनि अभ्यासगटाच्या बहुसंख्य उपस्थिती व उपलब्धतेनुसार एकत्रित बोलावून सघन समूह चर्चांचे (FGDs) आयोजन करण्यात आले होते. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांच्या कार्यालयासही भेट देवून संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांकडून (आणि प्रस्तुत) विकास प्रकल्पासंबंधित सर्व कागदपत्रे मिळविली. त्याचप्रमाणे सर्व प्रकल्पग्रस्तांबरोबरच्या सघन समूह चर्चा (FGDs) व सुनावणीचे आयोजन उपरोल्लेख केलेल्या ठिकाणी करण्यात आले होते. प्रस्तुत प्रकल्प पूर्ण होवून

पुनर्वसन मोबदला आदा करण्याच्या विलंबाचे महत्त्वाचे कारण म्हणजे भूमी अधिग्रहण नव्हे तर जमीन मोबदल्यासंबंधी निर्माण झालेली समस्या होय. तसेच कोल्हापूर जिल्हाधिकारी भूमि अधिग्रहण व पुनर्वसन कार्यालय आणि सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयीन पातळीवरील प्रशासकीय विलंबामुळेही प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसन मोबदला आदा करण्याचे काम रेंगाळले आहे.

६. सर्वच्या सर्व प्रकल्पबाधितांनी किंबहुना पूर्ण झालेल्या प्रस्तावित प्रकल्पकामी आपली जमिन देवू करून सहकार्य केल्याचेच दिसून येते. अर्थात प्रकल्प विभाग म्हणजे कोल्हापूर सार्वजनिक बांधकाम विभाग लवकरात लवकर अधिग्रहित जमिनीचा प्रकल्पबाधितांना योग्य मोबदला मिळावा याकरीता तत्पर असणे अपेक्षित होते. याचाच अर्थ असा की प्रस्तुत प्रकल्पबाधितांना आपल्या अधिग्रहित जमिनीचा लवकरात लवकर मोबदला मिळावा ही त्यांची अपेक्षा आहे.

७. केर्ली तर्फ वाडी रत्नागिरी, ता. पन्हाळा तालुका प्रकल्प हद्दीतील प्रकल्पबाधीत कुटुंबासोबत प्रत्यक्षपणे चर्चा निम्नउर्ध्वृत दिनांका दरम्यान अनेकवेळा आयोजित करण्यात आल्या होत्या.

| अ. क्र. | स्थळभेटीचा दिनांक |
|---|---|
| १ | दिनांक २५ ते २७ मार्च २०२० |
| २ | दिनांक ०९ ऑक्टोबर २०२० |
| ३ | दिनांक १३ ते २३ ऑक्टोबर २०२० |
| ४ | दिनांक ०१ ते ०५ डिसेंबर २०२० |
| ५ | दिनांक १९ ते २१ डिसेंबर २०२० |

प्रस्तुत चर्चा जोतिबा प्रकल्पस्थळ व प्रत्यक्ष स्थळभेटीचेवेळी करण्यात आल्या. तसेच प्रकल्पाबाबतची अधिक माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

८. प्रस्तुत अभ्यासाकरीता प्रकल्पबाधीत कुटुंबाची भूमी अभिलेख व क्षेत्रीय तपासणीवर आधारित अचूकपणे सत्याधारित प्राथमिक माहिती संकलित केली आहे. प्रकल्पबाधीत क्षेत्राचा, कुटुंबाचा सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिक संदर्भ ओळखण्यासाठी अभ्यासगटाने प्रत्यक्ष क्षेत्रभेटीवर आधारित खुल्या वातावरणात उपरोल्लेखित स्थळी अनेकदा समूह चर्चा घडवून आणल्या. क्षेत्रभेटीद्वारा संकलित प्राथमिक माहितीवर आणि प्रकल्पग्रस्तांबरोबर अधिकची सल्लामसलत करून प्रकल्पाच्या सकारात्मक व नकारात्मक सामाजिक व आर्थिक परिणामांची व्याप्ती आणि तीव्रतेचे मूल्यांकन केले आहे. हे करत असताना प्रकल्पबाधितांच्या सद्यस्थिती व भविष्यकालीन स्थितीवर काय परिणाम होवू शकतो याचाही परामर्श घेतला.

९. प्रकल्पग्रस्त कुटुंबाची प्रत्यक्ष पाहणी तसेच क्षेत्रभेटीच्यावेळी गटचर्चा केल्यानंतर प्रकल्पबाधितांच्या अडचणी समजून घेणे शक्य झाले. तसेच प्रकल्पग्रस्तांपैकी अनेक प्रतिनिधींनी लेखी स्वरुपात केलेल्या सापनि अभ्यासगटास सूचना प्राप्त झाल्या आहेत. या सर्व सूचनांमधून पुनर्वसन, पर्यायी जमिनी, वनसंपदेचे किंवा झाडांचे मूल्यांकन, पुनर्वसनाच्या समस्या इत्यादीविषयक अनेक अडचणी अद्यापही असल्याने प्रकल्पग्रस्तांच्या मनात असमाधानाची भावना असल्याचे निष्पन्न झाले.

१०. प्रकल्पग्रस्तांना दिला जाणारा मोबदला हा पर्यायी जमीन,घरासाठी भूखंड तसेच त्यांची मालमत्ता उदा. फळझाडे व वनसंपदा इत्यादींचेमूल्यांकन करून त्यांना देय असलेल्या मोबदल्यासंदर्भात अनेक बाबी निदर्शनास आल्या.

११. विकास प्रकल्पकामी जमिन अधिग्रहण करताना प्रकल्प विभागाकडून पुनर्वसनार्थ मूल्य निर्धारण करताना प्रचलित ''रेडिरेकनर'' किंवा ''प्रचलित बाजारभाव'' यापैकी जी किंमत जास्त असेल त्याच्या चारपट मूल्य आदा करणे अपेक्षित आहे. किंबहुना २०१३ च्या भूमि अधिग्रहण कायद्याचा तो आद्यक्रम आहे. तसे भूमि अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास कायदा - २०१३ अन्वये बंधनकारक

आहे. परंतु अद्याप आपल्या देशात भूमि/जमिन बाजार (Land Market) मात्र विकसित झालेला नसल्याने असे अपेक्षित जमिन मूल्य निर्धारण करताना अनेक अडचणी येतात. अर्थात शासनाकरीता/ शासनमान्य जमिन बाजार किंमत म्हणजे नजिकच्या भूतकाळात प्रकल्प परिसरात झालेल्या खरेदी-विक्रीचा प्रति नग (Unit/एकर/गुंठा) दर होय. अशी किंमत निर्धारित करताना खेरदी-विक्री दस्तऐवज किंवा स्टँप पेपरवर नोंदलेली किंमत होय. परंतु असे करताना खरेदी व विक्रीदारास संबंधित नोंद किंमतीच्या प्रमाणात स्टँप ड्युटी (मुद्रांक शुल्क) आदा करावी लागते. महाराष्ट्रात हे प्रमाण नोंद किंमतीच्या सहा टक्के आहे. विशेष म्हणजे सरकारी ''रेडीरेकनर'' पेक्षा कोणत्याही जमिनीचा वास्तव बाजारभाव अधिकच असल्याचे दिसून येते. असेच सापनि अहवालार्थ केलेल्या प्राथमिक सर्वेक्षणात निदर्शनास आले.

१२. परंतु खरेदी विक्री व्यवहार करताना ''स्टँप ड्युटी'' (मुद्रांक शुल्क) कमी द्यावे लागावे म्हणून सरकारी ''रेडीरेकनर'' वर आधारित दस्तनोंदणी करून ''स्टँप ड्युटी'' टाळण्याची प्रवृत्ती दिसून येते. त्यामुळे सरकारमान्य बाजार किंमतीस अशा खरेदी-विक्री व्यवहारपत्राचा आधार असल्यामुळे सरकारी बाजार किंमत व ''रेडीरेकनर'' किंमत यात फारशी तफावत दिसून येत नाही. क्वचित प्रसंगी काही व्यवहार ''रेडीरेकनर'' किंमतीपेक्षा अधिक किंमत नोंदवून त्या प्रमाणात स्टँप ड्युटी आदा करण्याची तयारी दर्शविली जाते. परंतु असे व्यवहारही ''रेडीरेकनर'' पेक्षा अधिक किंमतीस असले तरीही वास्तव व्यवहार प्रचलित बाजार किंमतीपेक्षा कमी किंमतीचेच असतात परंतु प्रत्यक्षपणे अधिक किंमत मोजली व घेतली जाते. त्यामुळे जमिन अधिग्रहण, पुनर्वसन व पुनरनिवास कायदा-२०१३ अन्वये जरी बाजार किंमतीस प्राधान्य असले तरीही जमिनीची वास्तव बाजार किंमत कागदोपत्री सिद्ध करणे कठिण बाब आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकल्पबाधितांच्या जमिनीच्या वास्तव बाजार किंमतीचे आकलन होण्यासाठी सापनि अभ्यासगटाने प्रकल्प परिसरातील कृषी (प्रति एकर) व व्यापारी (प्रति

गुंठा) जमिनींचा वास्तव बाजारभाव परिसरातील नागरिकांना विचारला असता आमच्या असे लक्षात आले की, प्रस्तुत प्रकल्प परिसरात शेतजमिनीची प्रति एकर सरासरी किंमत ४१२१६६६.६७ रूपये इतकी आहे. प्रकल्पपूर्तीपूर्वी प्रकल्प परिसरातील शेतजमिनीची सरासरी किंमत १०००००० रूपये प्रति एकर इतकी होती अशी सर्वेक्षण नोंद प्राप्त झाली. परंतु प्रस्तुत वळण रस्ता प्रकल्प आता पूर्ण झाला असल्यामुळे प्रकल्प परिसरातील जमिनींची प्रचलित व वाढलेली बाजार किंमत गृहित धरणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकल्पबाधितांना पुनर्वसनार्थ अधिग्रहित जमिन मूल्यांकन करताना कोणत्या किंमतीच्या चारपट मूल्य आदा करावे याकरीता व्यवस्थित धोरण निर्धारण करणे आवश्यक आहे. अर्थात याकरीता एकतर प्रकल्प परिसरात नजिकच्या भूतकाळात झालेले उच्च किंमतीचे व्यवहार गृहित धरून त्याच्या चारपट मूल्य आदा करण्याचे धोरण संयुक्तिक असले तरी संपूर्ण राज्याकरीता ग्रामीण व शहरी प्रकल्पांकरीता समान अधिग्रहित जमिन मूल्याचे धोरण अधिक उपयुक्त व अन्याय निवारण करणारे ठरेल.

**१३.** एकूण प्रकल्पबाधितांपैकी सर्वच प्रकल्पबाधितांचे पिढीजात वास्तव्य गावातच असल्याचे दिसते. वाडी रत्नागिरी येथे जोतिबा देवस्थान असून प्रकल्पबाधित आपल्या उदरनिर्वाहासाठी देवस्थानात पुजारी, गुरव इ. कामे करतात. याव्यतिरिक्त प्रसाद व पूजा साहित्य विक्री व्यवसाय करूनही आपल्या उत्पन्नास हातभार लावतात असे दिसून येते.

**१४.** सर्वच प्रकलपबाधितांकडे रेशनकार्ड असून ते केशरी रंगाचे असून त्यांचे वार्षिक उत्पन्न १५,००० ते १ लाख रूपये या गटामध्ये येते.

**१५.** सिंचन सुविधा कमी असल्याने कमी उत्पादकता व कमी उत्पन्न मिळते. पर्यायाने आतबट्ट्याच्या कृषि व्यवसायाचा सामना करावा लागतो. प्रकल्पबाधित हे आपले शेतीक्षेत्र रस्ते विकास कामी देण्यास तयार असून पुरेसा व योग्य मोबदल्याची उपेक्षा करताना दिसून येतात.

१६. सर्वच प्रकल्पबाधितांचे महत्त्वाचे उदरनिर्वाहाचे साधन शेती असूनही त्यांनी प्रकल्पाकरीता त्यांची जमिन देवू केली आहे. त्यामुळे त्यांना विनाविलंब व न्याय्य किंमत आदा करणे अत्यंत आवश्यक आहे.

१७. विनाशर्त जमिनी देण्याचे महत्त्वाचे कारण असे की बहुतांश प्रकल्पबाधित अनेक पिढ्या जोतिबा देवस्थानशी जोडलेले आहेत. त्यामुळे देवस्थानला येणाऱ्या सर्व भक्तांकरीता चांगला रस्ता असावा अशी त्यांची भावना असल्याने त्यांनी प्रकल्पकामी आपल्या जमिनी बिनशर्त देवू केल्या आहेत असे सापनि अभ्यासगटाच्या सर्वेक्षणावेळी लक्षात आले.

१८. बहुसंख्य प्रकल्पबाधितांनी आपल्या उदरनिर्वाहाच्या जमिनी प्रकल्पकामास स्वेच्छेने देवूनही पर्याप्त व योग्य मोबदल्याविषयी साशंकता व्यक्ती केली. प्रकल्पबाधितांनी त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन गमाविल्यामुळे त्यांच्या मनात जमिन मोबदल्याविषयी साशंकता असल्याने एक प्रकारची भीती मनात असल्याचे दिसून आले. परंतु प्रकल्प अधिकाऱ्यांनी प्रकल्पबाधितांना अनेक नियमांची भीती मात्र दाखविल्याचे अगदी प्रछन्नपणे निदर्शनास येते.

१९. प्रकल्पबाधित क्षेत्रास किती मोबदला मिळेल याबाबतची प्रकल्पबाधितांना काहीच कल्पना नसल्याने ते याबाबत माहिती नसल्याचे सांगतात. प्रकल्पबाधितांना त्यांनी दिलेल्या जमिनीचा योग्य मोबदला मिळाला तर ते जमिनही खरेदी करू शकतात व पुन्हा उदरनिर्वाहाचे साधन उभे करू शकतात. परंतु दुर्देवाने एकाही प्रकल्पबाधितास हे माहित नाही की प्रकल्पोपरांत परिसरातील जमिनींचे मूल्य भांडवलीकरण होवून जमिनीच्या बाजार किंमती प्रचंड प्रमाणात वाढणार असल्यामुळे त्यांना प्रकल्पबाधन मोबदल्यात जमिन खरेदी करणे शक्य होणार नाही. कारण जमिन मोबदला ठरविताना व आदा करतानाचा प्रशासकीय अनुभवाचा इतिहास सकारात्मक नसल्याचाच अनुभव आहे.

२०. रस्त्याच्या कामात त्रुटी राहिल्या तर प्रकल्पबाधितांना त्याचा पुढील काळात त्रास संभवतो. प्रकल्पाबाधितांनी आपली उदरनिर्वाहाची जमीन देवून अगोदरच उत्पन्नाचे साधन गमाविल्यामुळे पुढे त्रास होणार नाही याची प्रकल्प विभागाने खात्री देणे आवश्यक आहे व त्यांना त्याबाबतीत योग्य मोबदला देताना याही बाबीचा विचार होणे आवश्यक आहे.

२१. प्रकल्पबाधितांना जमिनीव्यतिरिक्त इतर उत्पन्नाचे मार्ग उपलब्ध नाहीत. तसेच त्यांचे धारणक्षेत्रही लहान आहे. त्यामुळेच अनेक प्रकल्पबाधितांनी आपली शेतीही विकली आहे. परंतु गेल्या दीड वर्षाच्या काळात उत्पन्नाचा हा पूरक मार्गही बंद झाल्याने त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर दूरगामी परिणाम झाल्याचे दिसून आले. कारण त्यांच्या तुटपुंज्या धारणक्षेत्रातूनच अधिग्रहण झाले आहे.

२२. मालमत्तांचे मूल्यांकन करताना ते वास्तविक असावे जेणेकरून त्यांना योग्य तो मोबदला मिळेल. अर्थात स्थावर मालमत्तेचे मूल्यांकन करताना प्रस्तुत जमिनीची व स्थावर मालमत्तेची नविन मालमत्ता आहे असेच गृहित धरून मूल्यांकन होणे आवश्यक आहे. कारण प्रस्तुत बाधनामुळे जर नविन स्थावर मालमत्ता निर्माण करावयाची असेल तर त्याकामी चालू किंमतीनुसार खर्च येणार आहे याची जाणिव प्रकल्प पुनर्वसन अधिकाऱ्यास असणे आवश्यक आहे.

२३. ४५.५ टक्के प्रकल्पबाधित कुटुंबातील सदस्य कोणत्याची संस्थेचे सभासद नाहीत तर उर्वरित काहीजण ग्रामपंचायत सदस्य, तरूण मंडळ, दूधसंस्था, बचतगट, भजनी मंडळ, वि.का.स. सोसायटी, सहकारी बँक इ. चे सभासद आहेत. याचाच अर्थ असा आहे की प्रकल्पबाधितांच्यात त्यांचे स्वत:चे नेतृत्व नसल्याने पुनर्वसनकामी त्यांचा प्रकल्प विभागावर दबाव निर्माण होणे अशक्य आहे. त्यामुळे अशा आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल प्रकल्पबाधितांचे आर्थिक व निवासविषयक पुनर्वसन करताना प्रकल्प अधिकारीवर्ग संवेदनशील असणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

२४. प्रस्तुत प्रकल्प व प्रकल्पबाधित प्रामुख्याने डोंगराळ भागात येत असल्यामुळे येथे वर्षभर पाण्याचा पुरवठा नसतो.

२५. बहुसंख्य प्रकल्पबाधितांकडे सिंचन सुविधा नसल्यामुळे ते व्यापारी पिके घेवू शकत नाहीत. त्यामुळे त्यांचे उत्पन्न कमी राहते. वरील बाबींचा विचार करून प्रकल्पबाधितांस त्यांच्या भूमि अधिग्रहणाचा योग्य मोबदला देणे आवश्यक आहे. कारण त्यांनी तुटपुंजी उत्पन्न देणाऱ्या जमिनींचा स्वेच्छेने त्याग केला आहे. त्यामुळे प्रस्तुत रस्ता प्रकलप विनाविलंब पूर्ण होवू शकला आहे.

२६. कृषी भांडवली वस्तूचे प्रमाण मात्र अत्यल्प आहे. कारण शेती कोरडवाहू स्वरूपाची केली जाते. तसेच बहुतांश प्रकल्पबाधितांचे धारणक्षेत्र आकारमान अकिफायतशीर असल्याने शेती आतबट्ट्याची आहे. त्यामुळे अकिफायतशीर सिमांत धारणक्षेत्र प्रकल्पकामी भूसंपादन झाल्याने उरलेली जमिन अधिक तुटपुंजी बनली असे वास्तव आहे.

२७. प्रकल्पबाधितांचा भविष्यकाळ अनिश्चित असल्याचे दिसते. किंबहुना अशा प्रकल्पबाधितांकना आर्थिक व पायाभूत सुधारणांची शिक्षा म्हणून स्थलांतराचा मार्ग स्विकारावा लागेल. महाराष्ट्रातील कोयना प्रकल्पग्रस्तांचे उदाहरण याकामी महत्त्वाचे ठरते. कोयना प्रकल्पामुळे १९५७ साली स्थलांतरीत झालेल्या अनेक प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन रायगड जिल्ह्यात अद्यापही प्रलंबित आहे.

२८. प्रकल्पाबधितांनी सहकारी सोसायटीकडून कर्जे घेतली आहेत. संस्थात्मक स्वरूपाच्या कर्जाचे प्रमाण जास्त आहे तर बिगर संस्थात्मक खाजगी कर्जाचे प्रमाण अत्यल्प आहे. अर्थात काही प्रमाणात का होईना पण संस्थात्मक कर्जाच्या अधिक प्रमाणामुळे काहीसा धनात्मक दृष्टिकोन दिसून आला.

२९. प्रकल्पबाधितांच्या आजारविषयक स्थितीकडे पाहिले असता असे म्हणावे लागेल की अधिग्रहण मोबदला देत असताना तो योग्य व पर्याप्त प्रमाणात असावा जेणेकरून प्रकल्पबाधितांना न्याय मिळेल. कारण आजारपणावरील खर्चाचे प्रमाणही बऱ्यापैकी अधिक असल्याचे दिसून आले. तसेच प्रकल्पकामी

उत्पन्नाचा मार्ग असलेली कृषि जमिन गेल्याने त्यांच्यासमोरील खर्चाची समस्या अधिक तीव्र बनू शकते यात शंका नाही.

३०. प्रकल्पबाधितांची पिक संरचना संमिश्र स्वरूपाची असल्याचे निदर्शनास येते. कोरडवाहू पिकापासून मिळणारे उत्पन्न हे खात्रीशीर नाही. त्यामुळे त्यांना प्रकल्पबाधित क्षेत्रास योग्य मोबदला देवून स्थैर्य मिळवून देता येवू शकते. परंतु तसा जाणिवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे. कारण सिंचन सुविधा उपलब्ध नसल्यामुळे पर्जन्य निर्भर पिके घ्यावी लागतात.

३१. प्रकल्पबाधिता शेतकऱ्यांना अनेक कारणांसाठी पैसा आवश्यक असतो. परंतु पतक्षमता कमी व पर्यायी उत्पन्नाचे मार्ग उपलब्ध नसल्यामुळे जमिन विकून पैसा उभा करण्याशिवाय पर्याय नसतो. त्यामुळेच या सर्व प्रकल्पबाधितांनी आपल्या शेतजमिनीची विक्री केल्याचे निदर्शनास आले.

३२. विशेष म्हणजे महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्याच्या पन्हाळा तालुक्याचे लिंग प्रमाण संपूर्ण राज्य पातळीवर पुरुषसत्ताक व्यस्त असल्याचे दिसून येते. परंतु प्रकल्पबाधित कुटुंबांच्या बाबतीत मात्र यामध्ये आश्चर्यकारक तफावत असल्याचे निदर्शनास आले.

३३. रस्त्याच्या कामामध्ये अनेक त्रुटी राहिल्या असल्याची मते प्रकल्पबाधितांनी नोंदवली आहेत. या त्रुटी दूर करून प्रकल्पबाधितांना योगय मोबदला देणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा पाणी वाहून जाण्यासाठी पाट काढले नाहीत अशा अनेक ठिकाणी उतारावरचे पाणी प्रकल्पबाधितांच्या उर्वरित शेतात जावून त्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाल्याचे दिसून आले.

## सापनि अभ्यास अहवाला उद्दिष्टनिहाय उपशमन योजना:

प्रस्तुत सापनि अहवालाच्या प्रकरण क्रमांक दोन मध्ये प्रस्तुत सापनि अहवालाची एकूण सात उद्दिष्टे नमूद केली आहेत. अर्थात संबंधित उद्दिष्टांना समोर ठेवूनच प्रस्तुत सापनि अहवाल अभ्यासकामी सर्व प्राथमिक व द्वितीय माहितीचे संकलन करून त्याच्या

पृथक्करणावरच प्रस्तुत सापनि अहवाल प्रामुख्याने निर्भर आहे. अभ्यासांती संबंधित उद्दिष्टनिहाय उपशमन योजना खालीलप्रमाणे सुचविण्यात येत आहे.

१. प्रकल्पाच्या प्रकल्पबाधितांवरील सामाजिक व आर्थिक परिणामांचा विचार करता अभ्यासांती असे निदर्शनास येते की, सर्वच प्रकल्पबाधितांचे उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन त्यांची तुटपुंजी शेतजमिन आहे. त्यामुळे प्रकल्पकामी शेतजमिन अधिग्रहित झाल्याने त्यांच्या उदरनिवार्हाच्या साधनातच अनन्यसाधारण कपात झाल्याने त्यांच्या जमिनीचे योग्यरित्या मूल्यमापन करून देय मोबदला देणे आवश्यक आहे. याकामी २०१३ च्या भूमि अधिग्रहण, पुनर्वसन व पुनरनिवास कायद्यात नमूद केल्याप्रमाणे सरकारी रेडीरेकनर किंवा प्रचलित बाजार किंमत यापैकी जी रक्कम अधिक असेल त्याच्या चारपट मोबदला आदा करणे प्रस्तुत प्रकल्पबाधितांवरील अन्याय दूर करण्याच्यादृष्टिने आवश्यक आहे. याकामी सापनि अभ्यासगटाने सर्वेक्षण करून निम्नउर्ध्वृत प्रस्तुत केलेल्या सत्याधारित माहितीचा उपयोग पुनर्वसन/जमिन मोबदला आदा करताना केला जावू शकतो.

| अ. क्र. | प्रकल्पबाधित क्षेत्रातील शेतजमिनीची सरासरी बाजार किंमत | सरासरी बाजारभाव (किंमत) |
|---|---|---|
| १ | मध्यम जमिन | ३४,२०००० |
| २ | बागाईत जमिन | ४८,३३३३३.३३ |
| ३ | सरासरी किंमत | ४१,२१६६६.६७ |
| ४ | प्रकल्पापूर्वीचा बाजारभाव | १००००० .०० |

**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

२. प्रकल्पबाधित व प्रकल्प लाभधारकांवरील सामाजिक व आर्थिक परिणामांचा विचार करता निश्चितपणे असे निरीक्षण मिळते की प्रकल्पकामी जमिन अधिग्रहण झाल्याने तसेच प्रकल्प रस्त्याच्या मध्यापासून तीस मिटरपर्यंतच्या जमिनीवरील प्रकल्पबाधितांचा मालकीहक्क अप्रत्यक्षपणे संपुष्टात आल्याने प्रकल्पबाधितांवर प्रस्तुत प्रकल्पाचे दूरगामी आर्थिक परिणाम संभवतात. परंतु

प्रकल्प लाभधारकांचा विचार करता मात्र निश्चितपणे असा युक्तिवाद होवू शकतो की इतर कोणत्याही पायाभूत सुविधा प्रकल्पाप्रमाणेच सर्व प्रकल्प लाभधारकांसाठी येणाऱ्या अनंत भविष्यकाळात प्रस्तुत प्रकल्प लाभधारकांकरीता लाभदायक ठरणार आहे. प्रकल्प लाभधारकांत फक्त प्रस्तुत रस्त्याचे वापरकर्तेच नसून ज्यांच्या जमिनी या प्रकल्पात गेल्या नाहीत अशा सर्व उर्वरित शेतकऱ्यांचाही फायदा संभवतो. कारण त्यांच्या जमिनीच्या किंमती आपोआप वाढणार आहेत. तसेच परिसरातील गावांचे मूलभूत जिवनमान प्रस्तुत प्रकल्पामुळे सुधारणार असल्याने त्यांच्या आर्थिक परिस्थितीसह सामाजिक प्रतिष्ठेतही भर पडेल यात शंका नाही.

३. सापनि अहवाल अभ्यासाचे तिसरे प्रमुख उद्दिष्ट प्रकल्पबाधित व प्रकल्प लाभधारकांवरील संभाव्य संधी व व्यय तसेच त्याग कराव्या लागणाऱ्या घटकांची चिकित्सा करणे असे होते. प्रस्तुत उद्दिष्टाचा विचार करता उपरोल्लेखित दुसऱ्या उद्दिष्टाप्रमाणेच प्रकल्पबाधितांना प्रकल्पकामी जमिन अधिग्रहणामुळे भविष्यकालीन उपजिविकेचे साधन असणाऱ्या जमिनीचा कायमस्वरूपी त्याग करावा लागणार आहे. कायमस्वरूपी उत्पन्न साधन लोप पावणार असल्यामुळे प्रकल्पबाधितांच्या त्यागाचा विचार केला तर त्यांच्या भविष्यातील उदरनिर्वाहाचा विचार करून जमिन मोबदल्याव्यतिरिक्त कुटुंबातील एखाद्या व्यक्तीस सार्वजनिक बांधकाम खात्यात नोकरी देवू केली तर त्यांना निदान केलेल्या त्यागाचे तात्कालिक समाधान मिळू शकेल. अर्थात प्रकल्प लाभधारकांच्या भविष्यकालीन त्यागाचा विचार केला तर त्यांचा त्याग शून्यच असणार आहे. उलटपक्षी त्यांना प्रस्तुत प्रकल्पाचे भविष्यात अनेक आर्थिक व सामाजिक लाभच संभवतात असेच सापनि अभ्यासगटाच्या प्रकल्प अभ्यासासाठी दिलेल्या स्थळभेटी व परिसरातील दौऱ्यावरून लक्षात आले.

४. प्रस्तुत सापनि अहवाल अभ्यास व इतरही अनेक प्रकल्पांच्या सापनि अभ्यास अहवालांवरून अभ्यासाच्या चौथ्या उद्दिष्टाविषयी सापनि अभ्यासगटाचे मत खालीलप्रमाणे नोंदवित आहोत;

विकास प्रकल्पकामी जमिन अधिग्रहण करताना प्रकल्प विभागाकडून पुनर्वसनार्थ मूल्य निर्धारण करताना प्रचलित ''रेडिरेकनर'' किंवा ''प्रचलित बाजारभाव'' यापैकी जी किंमत जास्त असेल त्याच्या चारपट मूल्य आदा करणे अपेक्षित आहे. नव्हे तसे भूमि अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास कायदा – २०१३ अन्वये बंधनकारक आहे. परंतु अद्याप आपल्या देशात भूमि/जमिन बाजार (Land Market) मात्र विकसित झालेल्या नसल्याने असे अपेक्षित मूल्य निर्धारण करताना अनेक अडचणी येतात. अर्थात शासनाकरीता/शासनमान्य जमिन बाजार किंमत म्हणजे नजिकच्या भूतकाळात प्रकल्प परिसरात झालेल्या खरेदी–विक्रीचा प्रति नग (Unit/ एकर/गुंठा) दर होय. अशी किंमत निर्धारित करताना खेरदी–विक्री दस्तऐवज किंवा स्टँप पेपरवर नोंदलेली किंमत होय. परंतु असे करताना खरेदी व विक्रीदारास संबंधित नोंद किंमतीच्या प्रमाणास स्टँप ड्युटी आदा करावी लागते. महाराष्ट्रात हे प्रमाण नोंद किंमतीच्या सहा टक्के आहे. विशेष म्हणजे सरकारी ''रेडीरेकनर'' पेक्षा कोणत्याही जमिनीचा वास्तव बाजारभाव अधिकच असल्याचे दिसून येते.

५. परंतु खरेदी विक्री व्यवहार करताना ''स्टँप ड्युटी'' कमी असावी म्हणून सरकारी ''रेडीरेकनर'' वर आधारित दस्तनोंदणी करून ''स्टँप ड्युटी'' टाळण्याची प्रवृत्ती दिसून येते. त्यामुळे सरकारमान्य बाजार किंमतीस अशा खरेदी–विक्री व्यवहारपत्राचा आधार असल्यामुळे सरकारी बाजार किंमत व ''रेडीरेकनर'' किंमत यात फारशी तफावत दिसून येत नाही. क्वचित प्रसंगी काही व्यवहार ''रेडीरेकनर'' किंमतीपेक्षा अधिक किंमत नोंदवून त्या प्रमाणात स्टँप ड्युटी आदा करण्याची तयारी दर्शविली जाते. परंतु असे व्यवहारही ''रेडीरेकनर'' पेक्षा अधिक किंमतीस असले तरीही वास्तव व्यवहार किंमत व प्रचलित बाजार

किंमतीपेक्षा कमी किंमतीचेच असतात व प्रत्यक्षपणे अधिक किंमत मोजली व घेतली जाते. त्यामुळे जमिन अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास कायदा-२०१३ अन्वये जरी बाजार किंमतीस प्राधान्य असले तरीही जमिनीची वास्तव बाजार किंमत कागदोपत्री सिद्ध करणे कठिण बाब आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकल्पबाधितांच्या जमिनीच्या वास्तव बाजार किंमतीचे आकलन होण्यासाठी सापनि अभ्यासगटाने प्रकल्प परिसरातील कृषी (प्रति एकर) व व्यापारी (प्रति गुंठा) जमिनींचा वास्तव बाजारभाव परिसरातील नागरिकांना विचारला असता आमच्या असे लक्षात आले की, प्रस्तुत प्रकल्प परिसरात शेतजमिन प्रति एकर व व्यापारी जमिन प्रति गुंठा बाजारभाव अनुक्रमे ५,२५,००० व २,८७,००० असा आहे. परंतु प्रस्तुत वळण रस्ता प्रकल्प नगरपरिषद हद्दीत येत असल्यामुळे प्रकल्प परिसरातील व्यापारी जमिनींची प्रचलित बाजार किंमत गृहित धरणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकल्पबाधितांना पुनर्वसनार्थ अधिग्रहित जमिन मूल्यांकन करताना कोणत्या किंमतीच्या चारपट मूल्य आदा करावे याकरीता व्यवस्थित धोरण निर्धारण करणे आवश्यक आहे. अर्थात याकरीता एकतर प्रकल्प परिसरात नजिकच्या भूतकाळात झालेले उच्च किंमतीचे व्यवहार गृहित धरून त्याच्या चारपट मूल्य आदा करण्याचे धोरण संयुक्तिक असले तरी संपूर्ण राज्याकरीता ग्रामीण व शहरी प्रकल्पांकरीता समान अधिग्रहित जमिन मूल्याचे धोरण अधिक उपयुक्त व अन्याय निवारण करणारे ठरेल.

६. प्रस्तुत सापनि अहवाल अभ्यासाचे पाचवे उदिष्ट प्रस्तुत प्रकल्पबाधितांना ''जमिनीच्या बदल्यात जमिन'' देणे शक्य आहे किंवा नाही हे पडताळून पाहण्याचे होते. अर्थात भूमि अधिग्रहण कायदा-२०१३ प्रमाणे कोणत्याही प्रकल्प विभागाची आद्य जबाबदारी म्हणून प्रकल्पबाधितांना ''जमिनीच्या बदल्यात जमिन'' देणे आधीच अधोरेखित केल्याचे दिसून येते. आणि अगदी शक्यच नसेल तर राज्य सरकारचा संबंधित जमिनीचा रेडीरेकनर दर किंवा प्रचलित बाजार किंमत यापैकी जे अधिक असेल त्याच्या चारपट अधिग्रहण

मूल्य असे गृहित धरून तेवढी रक्कम आदा करणे अपेक्षिले आहे. प्रस्तुत प्रकल्पाच्या बाबतीतही असेच निदर्शनास आले की प्रकल्प विभाग अथवा कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रकल्पबाधितांना ''जमिनीच्या बदल्यात जमिन'' देण्याविषयी काहीही पूर्वतयारी केलेली नाही असेच सापनि अहवाल अभ्यासगटाच्या लक्षात आले. त्यामुळे उपरोल्लेख केल्याप्रमाणे प्रकल्प विभाग व कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रस्तुत प्रकल्पबाधितांस त्यांच्या प्रकल्पकामी अधिग्रहित जमिनीचा रोख मोबदला आदा करावा व ते करताना प्रकरण क्रमांक पाच मधील सारणी क्रमांक ५९ मधील सर्वेक्षित प्राथमिक माहितीवर आधारित प्रस्तुत प्रकल्प परिसरातील प्रचलित बाजार किंमतींचा आधार घेतल्यास ते न्याय्य पुनर्वसन ठरू शकेल.

७. एकंदरीत विचार केला तर कोणत्याही विकासकामी जमिन अधिग्रहण होत असताना प्रकल्पबाधितांवर त्याचे दूरगामी स्वरूपाचे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिणाम होतच असतात. कारण प्रकल्प अधिग्रहणामुळे शेतकऱ्यांची फक्त जमिनच अधिग्रहित होवून आर्थिक नुकसान होत नाही तर परिसरातील त्यांच्या संबंधित इतर बिगर प्रकल्पबाधितांच्या तुलनेत त्यांचा सामाजिक स्तर कायमस्वरूपीच्या आर्थिक हानीमुळे तात्काळ घसरत असतो. याचा परिणाम प्रत्येक प्रकल्पबाधिताच्या सांस्कृतिक जडणघडणीवरही होत असतो. किंबहुना कोणत्याही विकास प्रकल्पबाधितास आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक समुळोच्च्याटनाची भावना सतावते असा सापनि अहवाल अभ्यासगटाचा इतर अनेक प्रकल्पांचे सापनि अहवाल अभ्यास करतानाचा अनुभव आहे. प्रस्तुत प्रकल्पाच्या बाबतीतही असाच अनुभव व अनुमान असल्याचे आम्ही येथे नोंदवित आहोत.

प्रस्तुत रस्ता प्रकल्प २०१८ पासून अंमलात आणणे अपेक्षित होते. अर्थात सर्व प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी बिनशर्तपणे आपली जमिन प्रस्तुत प्रकलपास देवू केल्यामुळे प्रकलपाचे काम विनाविलंब व विना व्ययवृद्धीसह पूर्णत्वास गेले आहे. परंतु विशेष

म्हणजे विनासायास जमिन अधिग्रहण होवून प्रकल्प पूर्ण हेवून त्याचा वापरही सुरू झाला आहे. परंतु एकाही प्रकल्पबाधितास त्याच्या प्रकल्पकामी जमिन अधिग्रहणार्थ पुनर्वसन मूल्य प्राप्त झाले नाही. महाराष्ट्रातील इतर अनेक प्रकल्प भूमि अधिग्रहणार्थ दिर्घकाळ प्रलंबित राहून प्रकल्पव्ययात प्रचंड वृद्धी होताना जाणवते. परंतु प्रस्तुत प्रकल्पाच्या बाबतीत प्रकल्पबाधितांचा सकारात्मक अनुभव असूनही त्यांच्या पुनर्वसन मूल्याकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. प्रस्तुत प्रकल्पकामी अगोदरच जमिन अधिग्रहण झाले. परंतु त्यांचे मूल्य आदा करणे प्रलंबित असल्याने न्याय्य पुनर्वसन मूल्य निश्चिती व देयकाचा विचार केल्यास अधिग्रहित दिनांकापासून या सर्व प्रकल्पबाधितांना त्यांच्या जमिन मूल्यावर व्याजही देय असू शकते. अर्थात असे केल्यास प्रस्तुत प्रकल्पबाधितांना न्याय्य वागणूक दिली असे अनुमान निघेल.

# संदर्भसूची:


**1.** Burte, Himanshu (2014), The Smart City card, Economic and Political Weekly,
Vol. XXXXI, No. XXXXVI, pp. 23-25.

**2.** Cao, Guangzhong, Changchun Feng, Ran Tao (2008), Local Land Finance in China's Urban Expansion: Challenges and Solutions, China and World Economy, 16(2), 19-30.

**3.** Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Need for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, pp. 52-58.

**4.** Dnyandev C Talule, Vijay Kakade and Mahadev Deshmukh (2019), Rehabilitation Problems and Feasibility of Irrigation Projects in Maharashtra: An Abstract Note Based on Ground Reality, Journal of Shivaji University (Humanities and Social Sciences), Jan. June. 2018, Vol. XXXXI, No. I, ISSN: 0368-4199, PP. 01-23.

**5.** Dnyandev C. Talule (2020), An Abstract Note on the Political Economy of Land Acquisition, Arthasamwad, July-August, 2020, Vol. XXXXIV, No. III, Reg No. 31918/77, ISSN: 0973-8452.

**6.** Dnyandev C. Talule, Mahadev Deshmukh and Vijay Kakade (2019), Maharashtrateel Sinchan Prakalpapurtiteel Pradirgha Vilamba va Prakalpabadhitanchya Punarvasanateel Samasya: Sthal Vastav Pariprekshatoon Punarvasan Niyojanartha Sankshipta Tipan, Arthasamwad, April-June 2019, Vol. XXXXIII, No. I, ISSN: 0973-8452, PP. 16-42.

**7.** Dutta, Ayona (2015), New Urban Utopias of Post-Colonial India, Entrepreneurial Urbanization in Dholera Smart City, Gujarat, Dialogues in Geography, Vol. V(I), pp.03-22.

**8.** FAO (2009), Land Grab and Development Opportunities? Agricultural Investments and International land Deals in Africa, FAO-IFAD Report.

**9.** Ghatak, Maitreesh and Parikshit Ghosh (2011), The Land Acquisition Bill: A Critique and a Proposal, Economic and Political Weekly, October 8, 2011, Vol. XLVI, No. XXXXI.

**10.** Govt of India (2005), National Sample Survey Organization, New Delhi

**11.** Hatekar, N. (2003), Farmers and Markets in Pre-Colonial Deccan: The Plausibility of Economic Growth in Traditional Society, Post and Present, No. 178, pp. 116-147.

**12.** Janaki Nair (2015), India Urbanization and the Terrain of the Law, Economic and Political Weekly, September 5, 2015, PP. 54-63.

**13.** Janaki Nair (2015), Indian Urbanism and the Terrain of the Law, Economic and Political Weekly, September 5, 2015, PP. 54-63.

**14.** Jenkins, R. L. Kennedy and Mukhopadhyay (Eds) (2014), Power, Policy and Protest: The Politics of India's Special Economic Zones, New Delhi, Oxford University Press.

**15.** Kakani, R. K., T. L Ranga Ran and Tigga and Nutan Singh (2008), Insights into Land Acquisition Experiences of Private Business in India, Working Paper 08-11, Jamshedpur, XLRI School of Business and Human Resources.

**16.** Ramaswamy Iyer (2007), Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic and Political Weekly, July 28, 2007, pp. 3103.

**17.** Subramaniam, C. (1979), The New Strategy in Indian Agriculture: The First Decade and After, New Delhi, Vikas Publishing House.

**18.** Walter Fernandez (2004), Rehabilitation Policy for the Displaced, Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic and Political Weekly, March 20, 2004, pp. 1191.

## परिशिष्ट:

### अर्थशास्त्र अधिविभाग
### शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६००४
### केर्ली तर्फवाडी रत्नागिरी जोतिबा वळण रस्ता भूसंपादन प्रकल्पाचा सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल: २०२१
### प्रकल्पबाधित कुटुंब प्रश्नावली

प्रकल्पबाधित कुटुंबाचा क्रमांक

अ) कुटुंबाची सर्वसाधारण माहिती

१. प्रकल्पबाधित व्यक्तीचे नाव :-

१ अ) माहीती देणाऱ्याचे नाव :-

१ ब) फोन नं :-

गाव :-

२. गाव (यादीप्रमाणे -------राहण्याचे ठिकाण (वेगळे असल्यास)-----

२ अ) या गावात वास्तव्य -

१-३ वर्षे ३-१० वर्षे १० पेक्षा अधिक वर्षे पिढीजात

३. धर्म :- जात :-

४. दारिद्र्य कार्ड आहे काय ? होय नाही

मनरेगा शासकीय योजनेत मजूर म्हणुन नोंद झाली आहे का?

होय नाही

५. रेशनकार्ड कोणते? पांढरे पिवळे केशरी

६. कुटुंबाचा प्रकार - एकसदस्य विभक्त एकत्रित

७. कुटुंबातील सदस्यांची संख्या

८. तुमचे कुटुंब फक्त एका महिलेचे आहे काय? कुटुंबात कोणी अपंग आहे काय?

होय नाही

कुटुंब सदस्यांचे विवरण

| सदस्य | संख्या | वय | व्यवसाय |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| पुरूष | | | |
| महिला | | | |
| मुले | | | |
| मुली | | | |
| वृध्द | | | |

घरात नोकरीच्या प्रतिक्षेत कोणी आहे काय? बेरोजगार

असल्यास किती सदस्या मुले मुली

जमिनीव्यतिरिक्त बाधीत मालमत्तेचे विवरण

घर, गोठा, विहीर.........इतर

कुटुंबाचा प्रमुख व्यवसाय कोणता?

११. सामाजिक स्तर

आपण अथवा कुटुंबातील कोणी खालीलपैकी एखाद्या संस्थेचे सदस्य आहात काय? किंवा पूर्वी होतात काय?

| अ. क्र. | संस्था | सदस्याचे नाव |
|---|---|---|
| १ | ग्राम पंचायत | |
| २ | पंचायत समिती | |
| ३ | वि का सोसायटी | |
| ४ | ग्राम विकास मंडळ | |
| ५ | जंगल कामगार संस्था | |
| ६ | सहकारी बँक | |
| ७ | बचत गट | |
| ८ | दुध संस्था | |
| ९ | बाजार समिती | |
| १० | भजनी मंडळ/गणपती मंडळ | |
| ११ | जात पंचायत | |
| १२ | तरूण मंडळ | |
| १३ | माहिल मंडळ | |
| १४ | अन्य | |

## विभाग ब– मालकीच्या व ताब्यातील जमिनीचा तपशिल

१. जमीन आहे नाही

| अ. क्र. | जमीन धारणा | एकर | गुंठे |
|---|---|---|---|
| १ | एकूण जमीन धारणा | | |
| ठ | लागवडी खालील क्षेत्र | | |
| ३ | लागवड योग्य पड जमीन | | |
| ४ | जंगल व पडीक जमीन | | |
| ५ | खंडाने घेतलेली जमीन | | |
| ६ | खंडाने दिलेली जमीन | | |
| ७ | सिंचनाखालील जमीन | | |
| | वनखात्याची अतिक्रमीत | | |

१) आपल्या आसपास सध्या षेत जमीनीची एकरी दर काय आहे?

| जमीनीचा प्रकार | एकरी दर रूपये |
|---|---|
| मुरमाड | |
| मध्यम | |
| उत्तम | |
| बागाईत | |

आपण जमिनीत कोणता पिक घेता त्याचे विवरण भरा

| अ. क्र. | खरीप पिके | एकर | अ. क्र. | रब्बी पिके | एकर | अ. क्र. | वार्शिक पिके | एकर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | १ | | | १ | | |
| २ | | | २ | | | २ | | |
| ३ | | | ३ | | | ३ | | |
| ४ | | | ४ | | | ४ | | |
| ५ | | | ५ | | | ५ | | |

प्रकल्पबाधीत जमीन जावून किती शिल्लक राहिली?

तुमच्या भागात जमिनीचा बाजारभाव किती आहे?

१. प्रती गुंठा रूपये :-

२. प्रति एकर रूपये :-

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तुम्हाला किती भरपाई मिळाली ?

| बाधीत जमिन | देवू केलेली रक्कम |
|---|---|
| | |

या भागातील जमिनीचा सरकारी दर प्रतीएकर किती आहे?

रस्त्याच्या कामापूर्वी या भागातील जमिनीचा बाजारभाव किती होता?

रस्ता झाल्यानंतर या भागातील जमिनीचा बाजारभाव किती झाला?

प्रकल्पात किती जमीन बाधीत झाली?

रस्त्याच्या मध्यापासून ३० मिटर प्रमाणे आपली किती जमिन गेली?

३० मिटर बाधीत जमिन गेल्यावर किती जमिन शिल्लक राहिली?

प्रकल्पबाधीत जमिन सोडून उर्वरीत जमिन विकली काय? होय नाही

असल्यास किती विकली?

विकल्यापैकी किती जमिन ३० मिटरच्या कक्षेत येते?

३. शेतीच्या पध्दती -

| साधन/पध्दती | होय/नाही | स्वत:चे | भाडयाचे |
|---|---|---|---|
| नांगरटीसाठी ट्रॅक्टर | | | |
| ठिंबक सिंचन | | | |
| डिझेल पंप | | | |
| थ्रेशर | | | |
| औषध फवारणी पंप | | | |
| अन्य | | | |

४. उत्पादन वाढीसाठी खालीलपैकी काही वापरता का? होय/नाही

| |
|---|
| किटकनाशके |

| | |
|---|---|
| सुधारीत बियाणे | |
| खते | |
| तणनाशक | |

५. सिंचन विषयक सुविधा

शेतात सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता – होय नाही

| अ. क्र. | स्त्रोत्र | संख्या | पाण्याचे (महिने) |
|---|---|---|---|
| १ | विहीर | | |
| २ | बोअर वेल | | |
| ३ | षेततळे | | |
| ४ | कालवा | | |
| ५ | लिफ्ट | | |
| ६ | नदी कालवा | | |
| ७ | तलाव | | |
| | अन्य | | |

६. वर्षातून किती पिके/हंगामी घेता?

खरीप रब्बी उन्हाळी बारमाही

## विभाग क – घर व मालमत्ता

१. घराची मालकी – स्वत:चे भाडयाचे सामाईक शासकीय

२. घराचे स्वरूप – कच्चे पक्के अर्धे कच्चे

३. खोल्यांची संख्या – अंदाजे क्षेत्रफळ

भिंतीचा प्रकार– छताचा प्रकार– फरशीचा प्रकार–

४. शौचालय आहे नाही वापर आहे नाही

५. निर्धूर चूल आहे नाही

६. आंघोळीचे घर – आहे नाही

७. परसबाग – आहे नाही

प्रकल्पबाधीत जमिन सोडून उर्वरीत जमिन विकली काय? होय नाही

असल्यास किती विकली?

विकल्यापैकी किती जमिन ३० मिटरच्या कक्षेत येते?

१०. मालकीच्या साधनांचा तपशील

| अ. क्र. | साधन | संख्या | सध्याची किंमत |
|---|---|---|---|
| १ | स्टील कपाट | | |
| २ | पलंग | | |
| ३ | पंखा | | |
| ४ | फ्रीज | | |
| ५ | एल. पी. जी. गॅस | | |
| ६ | गोबर गॅस | | |
| ७ | टी. व्ही. | | |
| ८ | फोन | | |
| ९ | फर्निचर | | |
| १० | कॅमेरा | | |
| ११ | मोबाईल | | |
| १२ | मोटार सायकल | | |
| १३ | जीप/चार चाकी | | |
| १४ | ऑईल इंजिन/मोटर | | |
| १५ | इले पंप (हॉर्स पॉवर) | | |
| १६ | ट्रक्टर | | |
| १७ | ठिबक/तुषार | | |
| १८ | मळणी यंत्र | | |
| १९ | लोखंडी नांगर | | |
| २० | अन्य | | |

**विभाग ड– पशुपालनाविषयी माहिती**

१. कुटुंबाकडे असलेले पशुधन

१. पशुधन नाही

२. गाय

५. रेडे

६. वासरू

९. रेडकू

१०. शेळया

३. म्हैस ७. खोंड ११. मेंढया

४. बैल ८. कालवड १२. कोंबडया

१३.अन्य (स्पष्ट करा)

यापासून मिळणारे उत्पन्न (रोजचे)

| दूध | किती |
|---|---|
| अंडी | |

**विभाग ई – कर्ज विषयक**

१. आपण कर्ज घेतले आहे का? होय नाही

होय असल्यास

| कोठुन घेतले | कारण | रक्कम (रूपये) | व्याजदर | परतफेड (रूपये) | षिल्लक (रूपये) |
|---|---|---|---|---|---|
| नातेवाईक/मित्र | | | | | |
| सावकार | | | | | |
| बँक | | | | | |
| सोसायटी | | | | | |
| बचत गट | | | | | |
| अन्य | | | | | |

अ. बायोगॅस आहे का ? होय नाही

असल्यास सध्याची स्थिती – चालू बंद

१. ब. घरी गॅस सिलेंडर आहे का? होय नाही

होय असल्यास एक सिलेंडर किती दिवस जातो?

विभाग ज – पिण्याचे पाणी

१. पिण्याचे पाणी कोठून भरता –

१.१ घरापासून अंतर मी

गावात पाण्याच्या षुध्दीकरणासाठी काही केले जाते का? होय नाही

असल्यास तपशिल–

घरात कोणी कायमस्वरूपी आजारी आहे काय?        होय                        नाही

असल्यास कोणता आजार ?

१. बीपी                 २. मधुमेह               ३. -------------------
-

घरात कोणी मजुरीस जाते काय?              होय                        नाही

असल्यास कोठे ? ------------------------------------
---

| NREGS | रोजंदारी (रूपये) |
|---|---|
| शेतमजूर | |

फ. इतर मार्गापासून उत्पन्न

| अ. क्र. | बाब | |
|---|---|---|
| १ | नोकरी | |
| २ | व्यवसाय | |
| ३ | पेन्शन | |
| ४ | मुलांनी पाठविलेले | |
| ५ | जागा भाडे | |
| ६ | ट्रॅक्टर भाडे | |
| ७ | गिरणी पिठाची | |
| ८ | किराणा दुकान | |
| ९ | हॉटेल | |
| १० | चहाची टपरी | |
| ११ | वडापाव टपरी | |
| १२ | देव पुजारी | |
| १३ | इतर | |

पिक उत्पन्नाचा तपशील

| पिक | एकरी उत्पादन (क्विंटल) | घरचा उपभोग | विक्री (क्विंटल) |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

२. जमिन प्रकल्पाला द्यावी यासाठी तुमच्या वर कोणी दबाव आणला का? होय नाही

होय असल्यास कोणी?

तरूण पिढी नातेवाईक गावकरी शासकीय अधिकारी अन्य

३. जमिनीस मिळणारी किंमत समाधानकारक वाटते का? होय नाही

४. आपण प्रकल्पाला विरोध कसा दर्शवलात? होय नाही

५. शासनाकडे तुमच्या प्रमुख मागण्या कोणत्या आहेत?

जमीनीच्या बदल्यात जमीन

बाजारभावापेक्षा जास्त दर

जमिनीचा योग्य दर ठरवावा

प्रकल्पाग्रस्तास नोकरी

जमीन व घराची किंमत बाजार भावाप्रमाणे

अन्य

६. सदर प्रकल्पाचा तुम्हाला किंवा नातेवाईकांना फायदा होईल असे वाटते का?

होय नाही

नसल्यास कारण ----------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------
------------

७. प्रकल्पामुळे खालील पैकी कोणत्या गोष्टी होतील? होय नाही

| जमिनीला योग्य किंमत | | |
|---|---|---|
| रोजगार मिळेल | | |
| रोजगारच्या संधी निर्माण होतील | | |
| सांगता येत नाही | | |

१२. प्रकल्पाकडून मिळालेल्या पैशातून तेवढीच जमीन किंवा त्याहून अधिक जमिन विकत घेणे शक्य होईल काय?

तेवढीच जमीन त्याहून जास्त त्याहून कमी

१३. प्रकल्पाच्या कामकाजाबाबत तुम्ही समाधानी आहात काय? होय नाही

१४. रस्त्याच्या कामात काही त्रुटी आहेत काय?

असल्यास कामात काय त्रुटी राहिल्या आहेत?

रस्त्याच्या कामातील त्रुटीमुळे तुमचे काही नुकसान झाले आहे काय? होय नाही

असल्यास काय नुकसान झाले?

एकंदरीत प्रकल्प पुनर्वसनासंबंधी/जमिन मोबदल्यासंबंधी तुमचे मत नोंदवा

--------------------------------------------
--------------------------------------------
--------------------------------------------
--------------------------------------------
------------

धन्यवाद संपर्क क्रमांक

सही

दिनांक

## Completed Studies

१. हिरण्यकेशी सर्फनाला मध्यम सिंचन प्रकल्पाचा सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल : २०१८ (नोव्हेंबर २०१८)

२. कडगांव रस्ता-पूल प्रकल्पाचा सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल : २०१९ (जून २०१९)

३. रूकडी रस्ता-पूल प्रकल्पाचा सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल : २०१९ (ऑगस्ट २०१९)

४. आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पाचा सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल : २०१९ (जानेवारी २०२०)

५. शिरवल लघु पाटबंधारे योजना ता. कणकवली जि. सिंधुदुर्ग पुच्छ कालव्याच्या बाजूने पर्यायी पोहोच रस्ता व पूल प्रकल्पाचा सामाजिक परिणाम अहवालः २०२०

६. कोल्हापूर जिल्ह्यातील सूक्ष्मसिंचनः वापर व आढावा

७. हिरण्यकेशी सर्फनाला आणि आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प संयुक्त सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल (ऑगस्ट २०२०)

८. सावंतवाडी शहर मंजूर सुधारित विकास आराखडा अंतर्गत बाह्य वळण रस्ता भूसंपादन प्रकल्पाचा सामाजिक परिणाम निर्धारण अहवालः २०२१

९. केर्ली तर्फवाडी रत्नागिरी जोतिबा रस्ता भूसंपादन प्रकल्पाचा सामाजिक परिणाम निर्धारण अहवालः २०२१

Estd.: 1962

Department of Economics
Shivaji University
(NAAC A++ Grade with CGPA 3.52)
Kolhapur - 416 004

Vidyanagar, Kolhapur,
Maharashtra 416004
www.unishivaji.ac.in

Contacts:
0231-2609177/79/80/81